CMYK
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, ९ एप्रिल २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक १३१ | पाने १२ | किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



# म्होरके अन् हजारो नागरिक गमावले

- अटी-शर्तींवर शस्त्रसंधीस पाडले भाग
- ३९ दिवसांच्या युद्धानंतर पुनर्विकासाचे आव्हान



**तेहरान, ८ एप्रिल**
गेल्या पाच आठवड्यांपासून सुरू असलेल्या अमेरिका-इराण युद्धाला अखेर ३९ व्या दिवशी पूर्णविराम मिळाला आहे. एकाच वर्षात इराणला दोनदा संघर्षाचा सामना करावा लागला. २८ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या युद्धात सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई आणि लष्कर, नौदल आणि गुप्तचर विभागाच्या अनेक अधिकाऱ्यांना इराणला गमवावे लागले.

दुसरीकडे अमेरिका-इस्रायलच्या हल्ल्यात अडीच हजारांपेक्षा अधिक नागरिकांचा मृत्यू झाला. मात्र, स्वतःच्या अटी-शर्तींवर शस्त्रसंधीसाठी अमेरिकेला भाग पाडले, ही इराणची जमेची बाजू ठरली. इराणने इस्रायल आणि अमेरिका या दोन्ही लष्करी शक्तींशी समर्थपणे सामना केला. अवघ्या काही दिवसात इराणला गुडघ्यावर आणण्याची भाषा करणाऱ्या अमेरिकेला ३९ दिवस झुंजवले.

युद्धविरामानंतर आता उद्ध्वस्त झालेल्या भागाचा पुनर्विकास करण्याचे मोठे आव्हान देशासमोर आहे. इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी म्हटले की, युद्धात अनेक निवासी इमारती, प्रकल्प आणि पायाभूत सुविधांचे नुकसान झाले असून त्यांची पुनर्बांधणी करणे आमच्यासाठी मोठे आव्हान आहे. जनतेची एकजूट आणि सैन्याच्या शौर्यामुळेच आमचा विजय झाला आहे. *(वृत्तसंस्था)*

## युद्धाचा घटनाक्रम आणि ठळक घडामोडी



- **२८ फेब्रुवारी** : अमेरिका आणि इस्रायलचा इराणवर भीषण हल्ला. यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांच्यासह अनेक उच्चपदस्थ लष्करी अधिकारी ठार झाले. याच दिवशी एका प्राथमिक शाळेवर झालेल्या हल्ल्यात १७५ विद्यार्थिनींचा मृत्यू झाला.
- **१ मार्च** : इराणच्या ड्रोन हल्ल्यात कुवेतमध्ये ६ अमेरिकन सैनिक ठार झाले. त्याचवेळी हिजबुल्लाहने लेबनॉनमधून इस्रायलवर क्षेपणास्त्राचा मारा केला.
- **८ मार्च** : मोजतबा खामेनेई यांची इराणचे नवे सर्वोच्च नेते म्हणून नियुक्ती करण्यात आली. ट्रम्प यांनी विरोध केला.
- **११ मार्च** : इराणने होर्मुझ सामुद्रधुनीमध्ये हल्ले तीव्र केले. किमान तीन जहाजांवर हल्ले करण्यात आले, ज्यामुळे जागतिक बाजारात तेलाचे दर गगनाला भिडले.
- **१३ मार्च** : अमेरिकेने इराणच्या खार्ग बेटावर मोठा बॉम्बहल्ला केला.
- **१७ मार्च** : इस्रायलने इराणच्या राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे प्रमुख अली लारीजानी आणि बासिज मिलिशियाचे प्रमुख घोलमरेझा सुलेमानी यांना ठार केले.
- **१८ मार्च** : इराणने कतारमधील जगातील सर्वात मोठा वायू प्रकल्प रास लाफानवर हल्ला केला, तर इस्रायलने इराणच्या दक्षिण पार्स प्रकल्पांवर प्रहार केला.
- **२३ मार्च** : ट्रम्प यांनी प्रथमच अमेरिका आणि इराणमध्ये युद्ध थांबविण्यासाठी राजनैतिक चर्चा सुरू असल्याचे संकेत दिले.
- **३ एप्रिल** : इराणने अमेरिकेचे तीन लढाऊ विमाने पाडली. यानंतर दोन वैमानिकांच्या सुटकेसाठी यशस्वी मोहीम राबविण्यात आली.
- **७ एप्रिल** : ३९ दिवसांच्या संघर्षानंतर अखेर ट्रम्प यांनी १५ दिवसांच्या शस्त्रसंधीची घोषणा केली. इराणने याला आपला विजय असल्याचे म्हटले आहे.

# जागतिक दबावामुळे युद्धविरामाचा निर्णय

तज्ज्ञांचे मत

## संघर्ष निवळण्यासाठी ट्रम्प यांचाच पुढाकार

**वॉशिंग्टन, ८ एप्रिल**
अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणचे अस्तित्व एका रात्रीत नष्ट करू, अशी दिलेली धमकी मागे घेतली. त्यांनी दोन आठवड्यांच्या युद्धविरामाला सहमती दर्शविली, ज्यामुळे ४० दिवसांपासून सुरू असलेला संघर्ष निवळण्यासाठी राजनैतिक चर्चेची एक संधी उपलब्ध झाली. जागतिक दबाव आणि देशातूनच होत असलेला विरोध पाहता ट्रम्प यांनी युद्धविरामासाठी पुढाकार घेतल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.



इराणनेही या युद्धविरामाला स्वीकारले आणि हार्मुझची सामुद्रधुनी काही अटींवर पुन्हा खुली करण्यास संमती दिली. इराणसोबतचा युद्धविराम स्वीकारणे ही ट्रम्प यांची गरज होती. कारण त्यांच्याकडे सध्या कोणताही ठोस पर्याय शिल्लक नव्हता, असे मत परराष्ट्र धोरण तज्ज्ञांचे मत आहे.

**इराणची लष्करी क्षमता उद्ध्वस्त : हेगसेथ**

ऑपरेशन एपिक फ्युरी अंतर्गत अमेरिकेने इराणवर ८०० हून अधिक हवाई हल्ले करून इराणच्या लष्करी पायाभूत सुविधांचे नुकसान केले. इराणचे अनेक कारखाने जमीनदोस्त झाले आणि त्यांचा क्षेपणास्त्र कार्यक्रम आता पूर्णपणे थांबला, त्यामुळेच आम्ही संघर्षविरामाचा निर्णय घेतल्याचे अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले. *(वृत्तसंस्था)*

### ट्रम्प यांच्या पदाला धोका

अमेरिका आणि इस्रायलने इराणसोबत पूर्णवेळ युद्ध पुकारले असते, तर ट्रम्प यांच्या पद धोक्यात येण्याची शक्यता होती. मोठ्या युद्धाचा अमेरिकन अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम ट्रम्प यांना परवडणारा नव्हता. युद्ध लांबले असते, तर मोठे ऊर्जा संकट उभे राहिले असते, ज्याची भीती संपूर्ण जगाला होती, त्यामुळेच ट्रम्प यांच्यावर युद्धविरामासाठी दबाव होता.

### आक्रमकतेचा दिखावा

ट्रम्प यांनी मंगळवारी इराणला शेवटचा इशारा दिला होता. हा इशारा केवळ दिखाव्यासाठी होता. संध्याकाळी होणारा करार हा स्वतःच्या अटींवर झाला, असे जगाला भासवण्यासाठी ट्रम्प यांनी आधी आक्रमक पवित्रा घेतला. प्रत्यक्षात ट्रम्प यांनी स्वतः कबूल केले की, पुढील चर्चा इराणने मांडलेल्या १० कलमी प्रस्तावावर आधारित असेल.

### आर्थिक कोंडीमुळे निवडला चर्चेचा मार्ग

ट्रम्प यांनी दिलेला इशारा आणि त्यानंतर लगेच स्वीकारलेला युद्धविराम हे एक राजनैतिक नाट्य असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. इराणने हार्मुझची सामुद्रधुनी बंद करून अमेरिकेची आर्थिक कोंडी केल्यामुळे, ट्रम्प यांना लष्करी कारवाईऐवजी चर्चेचा मार्ग निवडणे भाग पडले आहे. इराणच्या अटींवर चर्चा करण्यास ट्रम्प यांचे तयार होणे, हे दर्शवते की, अमेरिकेला या युद्धाची मोठी किंमत मोजावी लागत होती.

# ऑक्सिटोसिन इंजेक्शनची तस्करी

## दोघे गजाआड

**लखनौ, ८ एप्रिल**
उत्तर प्रदेश पोलिसांच्या विशेष कृती दलाने (एसटीएफ) लखनौमध्ये ऑक्सिटोसिन इंजेक्शनच्या अवैध तस्करी भंडाफोड केला. या तस्करीत सहभागी असलेल्या एका आंतरराज्यीय टोळीच्या दोन सदस्याला अटक करण्यात आली. तसेच त्यांच्याकडून या औषधाचा मोठा साठा जप्त केला आहे.

लखनौमधील रहिमाबाद पोलिस ठाण्याच्या हद्दीतील तिरवा निवासी रेहानला सोमवारी सायंकाळी काकोरी परिसरातील करीमाबाद भुयारी मार्गाजवळून अटक करण्यात आली. त्याच्या ताब्यातून ऑक्सिटोसिन इंजेक्शनच्या ५०२ कुप्या, दोन मोबाईल आणि एक मोटारसायकल जप्त करण्यात आली. चौकशीदरम्यान लखनौ आणि आसपासच्या जिल्ह्यांमध्ये ऑक्सिटोसिनचा अवैध पुरवठा करणाऱ्या एका टोळीचा आपण सदस्य असल्याची कबुली आरोपीने दिली. त्याने पोलिसांना सांगितले की, या टोळीचा आणखी एक सदस्य इरफान त्याला हे इंजेक्शन पुरवत असे. त्यानंतर शहराच्या विविध भागांत या इंजेक्शनचे वितरण केले जात असे. या माहितीच्या आधारे एसटीएफने इरफानलाही अटक केली. *(वृत्तसंस्था)*

# गोवा नाईट क्लब अग्निकांड : लुथरा बंधूंना जामीन

**पणजी, ८ एप्रिल**
गोव्यातील एका न्यायालयाने बुधवारी आगीच्या भक्ष्यस्थानी पडलेल्या बर्च बाय रोमिओ लेन या नाईट क्लबचे मालक सौरभ लुथरा आणि गौरव लुथरांना बनावट कागदपत्रांशी संबंधित फसवणुकीच्या प्रकरणात जामीन मंजूर केला. यामुळे त्यांच्या तुरुंगातून सुटकेचा मार्ग मोकळा झाला आहे. गत डिसेंबरमध्ये नाईट क्लबमध्ये लागलेल्या भीषण आगीच्या घटनेशी संबंधित एका प्रकरणात या बंधूंना यापूर्वीच जामीन मिळाला होता. या आगीत २५ जणांचा मृत्यू झाला होता.

लुथरा बंधूंची बाजू मांडणारे वकील पराग राव यांनी सांगितले की, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (मापुसा) ज्युड सिक्वेरा यांनी बनावट कागदपत्रांच्या प्रकरणात आरोपींना



नियमित जामीन मंजूर केला आहे. या निकालामुळे लुथरा बंधूंची तुरुंगातून सुटका होईल. त्यांच्या अशिलांना (लुथरा बंधूंना) पुढील पाच दिवस मापुसा पोलिस ठाण्यात हजेरी लावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आम्ही या प्रकरणातील सविस्तर निकालाची प्रतीक्षा करत आहोत, असेही ते म्हणाले.

**बळी प्रकरणात यापूर्वी मिळाला जामीन**

लुथरा बंधूंनी उत्तर गोव्यातील आरपोरा गावात नाईट क्लब चालविण्यासाठी आवश्यक परवानग्या आणि उत्पादन शुल्क परवाना मिळविण्यासाठी बनावट कागदपत्रांसह एका खोट्या ना-हरकत प्रमाणपत्राचा वापर केला होता. हे कथित बनावट ना-हरकत प्रमाणपत्र नंतर इतर नियामक मंजुऱ्या मिळविण्यासाठी वापरले गेले होते. सत्र न्यायालयाने १ एप्रिलला एका प्रकरणातील जामीन मंजूर केला होता. *(वृत्तसंस्था)*

## वाळू माफियांनी वनरक्षकाला चिरडले

**मोरेना, ८ एप्रिल**
मध्य प्रदेशातील मोरेना जिल्ह्यात बुधवारी सकाळी वाळूचे अवैध उत्खनन करणाऱ्यांनी एका वनरक्षकाला ट्रॅक्टर-ट्रॉलीखाली चिरडून ठार मारले. ही घटना राणपूर गावाजवळ राष्ट्रीय महामार्ग-५५२ वर घडली. हरकेश गुर्जर असे मृत कर्मचाऱ्याचे नाव आहे.

अतिरिक्त पोलिस अधीक्षक सुरेंद्र सिंग डावर यांनी सांगितले की, गस्ती पथकाचा भाग असलेले वनरक्षक हरकेश गुर्जर यांनी चंबळ नदीकाठावरील ऐसा घाट येथून वाळूची अवैध वाहतूक करणारा ट्रॅक्टर थांबविण्याचा प्रयत्न केला. परंतु, ट्रॅक्टरचालकाने त्यांना वाहनाखाली चिरडले. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर चालक घटनास्थळावरून पळून गेला. याप्रकरणी दिमनी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# तीन पासपोर्ट असल्याचा दावा खोटा

## काँग्रेसने सादर केलेली सर्व कागदपत्रे खोटी

**गुवाहाटी, ८ एप्रिल**
विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आसाममध्ये राजकीय वातावरण तापले आहे. काँग्रेसने मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या पत्नी रिंकी भुयान सरमा यांच्यावर तीन देशांचे पासपोर्ट बाळगल्याचा गंभीर आरोप केला आहे. आता केंद्र सरकारने या प्रकरणी प्रतिक्रिया दिली आहे. केंद्रीय परराष्ट्र राज्यमंत्री पवित्र मार्गेरिटा यांनी हे दावे पूर्णपणे खोटे आणि बनावट असल्याचे म्हटले आहे.

काँग्रेस नेते पवन खेडा यांनी नुकताच दावा केला होता की, रिंकी भुयान सरमा यांच्याकडे संयुक्त अरब अमिरात, अँटिग्वा-बार्बुडा आणि इजिप्तचे पासपोर्ट आहेत. मुख्यमंत्री हिमंता सरमा यांनी आपल्या निवडणूक प्रतिज्ञापत्रात या परदेशी पासपोर्ट आणि परदेशातील मालमत्तेबद्दलची माहिती लपवली, असा आरोपही काँग्रेसने केला होता.



काँग्रेसचे आरोप फेटाळत परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री मार्गेरिटा यांनी सांगितले की, काँग्रेसने सादर केलेली कागदपत्रे बनावट आहेत. काँग्रेस नेते पवन खेडा यांनी प्रदेशाध्यक्ष गौरव गोगोई यांच्यासह मुख्यमंत्र्यांच्या पत्नीविरोधात काही कागदपत्रे आणि पासपोर्ट सादर केले होते. हे पासपोर्ट तीन परदेशी देशांचे असल्याचा दावा केला होता.

मात्र, आमच्या राजनैतिक मार्गांनी आणि तपासाअंती ही कागदपत्रे बनावट आणि खोटी असल्याचे निष्पन्न झाले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. *(वृत्तसंस्था)*

### एआय आणि फोटोशॉपचा वापर

**मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी सांगितले की, काँग्रेसने दाखवलेल्या यूएई पासपोर्टच्या प्रतीचा स्रोत एक पाकिस्तानी सोशल मीडिया ग्रुप आहे. एआय आणि फोटोशॉपचा वापर करून या बनावट कागदपत्रांमध्ये त्यांच्या पत्नीचे नाव आणि फोटो टाकण्यात आले आहेत. या कागदपत्रांमध्ये अनेक तांत्रिक त्रुटी आहेत. त्यात सरमा ऐवजी शरमा, असे चुकीचे नाव वापरले आहे. तसेच क्यूआर कोड अवैध असून पासपोर्ट क्रमांक चुकीचा आहे, असा दावाही त्यांनी केला.**



अमेरिका-इराण यांच्यात दोन आठवड्यांची युद्धबंदी लागू झाली असली तरी इस्रायलचे लेबनॉनवरील हल्ले थांबलेले नाहीत. बुधवारी केलेल्या हवाई हल्ल्यात इमारतींचे झालेले नुकसान

# राजस्थानात रहस्यमय आजाराचे थैमान

## सख्ख्या भावंडांसह पाच जणांचा मृत्यू

**सात जिल्हे प्रभावित**

**सालुंबर, ८ एप्रिल**
राजस्थानच्या सालुंबर जिल्ह्यात एका रहस्यमय आजारामुळे पाच दिवसांत दोन सख्ख्या भावंडांसह पाच मुलांचा मृत्यू झाला आहे. दोन ते चार वर्षे वयोगटातील या मुलांना ताप आणि उलट्यांसारखी लक्षणे दिसू लागली आणि २४ तासांच्या आत त्यांचा मृत्यू झाला. नमुने गोळा करण्यासाठी आणि परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी प्रशासनाने आरोग्य विभागाची पथके तैनात केली आहेत. मृतांमध्ये लालपुरा गावातील दीपक, त्याचा भाऊ लक्ष्मण, सीमा, घाटा गावातील राहुल आणि काजल यांचा समावेश आहे. इतर आठ मुलांवर सध्या सालुंबर आणि उदयपूर येथील रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत.

अतिरिक्त जिल्हाधिकारी दिनेश राय सपेला यांनी सांगितले की, बाधित गावांमधील ५६० हून अधिक कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. वैद्यकीय पथकांनी सर्वेक्षण केले असून लक्षणे दिसणाऱ्या प्रत्येकावर उपचार करण्यात येणार आहे. मुख्य वैद्यकीय आणि आरोग्य अधिकारी महेंद्र परमार यांनी सांगितले की, नमुने तपासणीसाठी आरएनटी वैद्यकीय महाविद्यालयात पाठविण्यात आले असून अहवाल मिळाल्यानंतरच आजाराचे नेमके कारण कळेल. खबरदारीचा उपाय म्हणून पशुसंवर्धन विभागाच्या पथकांनी घाटा गावातील जनावरांच्या गोठ्यांमध्ये जंतुनाशक फवारणी केली आहे.

**सर्व सात जिल्ह्यांमध्ये आजार प्रतिबंधासाठी मोहीम**

वैद्यकीय आणि आरोग्य विभाग सलुंबर जिल्ह्यासह उदयपूर विभागातील सर्व सात जिल्ह्यांमध्ये आजार प्रतिबंधासाठी एक व्यापक मोहीम राबवत आहे. विभागाची पथके परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहेत. उदयपूर विभागात सुमारे ३,६९० पथकांनी ५२,००० हून अधिक घरांचे सर्वेक्षण केले. *(वृत्तसंस्था)*

# शस्त्रसंधीमुळे मध्यपूर्वेत चिरस्थायी शांतता

- भारताने जारी केले निवेदन
- चर्चेचा मार्ग निवडण्याचे स्वागत


**नवी दिल्ली, ८ एप्रिल**
इराणसोबत झालेल्या अमेरिका-इस्रायलच्या चर्चेनंतर, चार आठवड्यांपासून सुरू असलेले युद्ध थांबवत दोन आठवड्यांच्या शस्त्रसंधीची घोषणा करण्यात आली. यावर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने निवेदन जारी करत शस्त्रसंधीमुळे मध्यपूर्वेत चिरस्थायी शांतता प्रस्थापित होईल, अशा शब्दात निर्णयाचे स्वागत केले.

आम्ही या शस्त्रसंधीचे स्वागत करतो आणि आशा करतो की यामुळे पश्चिम आशियात चिरस्थायी शांतता प्रस्थापित होईल. आम्ही वारंवार सांगितल्याप्रमाणे, सध्याचा संघर्ष लवकर संपवण्यासाठी तणाव कमी करणे, संवाद आणि राजनैतिकता आवश्यक आहे. संघर्षामुळे लोकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला आहे आणि जागतिक ऊर्जा पुरवठा व व्यापारामध्ये व्यत्यय आला.


आम्हाला आशा आहे की होर्मुझच्या सामुद्रधुनीतून अखंड जलवाहतूक आणि जागतिक व्यापाराचा ओघ सुरू राहील. सध्याची परिस्थिती पाहता, इराणमधील भारतीय दूतावासाने भारतीय नागरिकांना तत्काळ देश सोडण्याचा सल्ला दिला आहे. दूतावासाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्यांनी दिलेल्या सुरक्षित मार्गांनीच इराणमधून बाहेर पडण्याचा सल्ला दिला आहे, असे मंत्रालयाने म्हटले आहे. *(वृत्तसंस्था)*



होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्यासाठी ऑस्ट्रेलिया आंतरराष्ट्रीय भागीदारांसोबत काम करत आहे, जेणेकरून अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा गरजूंपर्यंत पोहोचू शकेल. आम्ही युद्धविरामाचे स्वागत करतो आणि शांतता मार्गाने दोन्ही पक्षाने तोडगा काढण्याचा घेतलेला निर्णय कौतुकास पात्र आहे.
- **अँथनी अल्बानीज,** पंतप्रधान, ऑस्ट्रेलिया



ही एक अत्यंत महत्त्वाची संधी आहे, जिचा उपयोग संवाद, मुत्सद्देगिरी आणि विधायक चर्चेसाठी केला पाहिजे. हा युद्धविराम एका भक्कम पायावर उभारला गेला पाहिजे, ज्यामुळे लष्करी कारवाई पूर्णपणे थांबेल.
- **परराष्ट्र मंत्रालय,** इजिप्त



युद्धविरामाचा प्रस्ताव केवळ या प्रदेशातच नव्हे तर जगभरात शांतता आणि स्थिरता पुनर्संचयित करण्यासाठी शुभसंकेत आहे. ही प्रक्रिया फसवणूक आणि दुटप्पीपणाने भरलेली असेल, तर शांतता चर्चा यशस्वी होऊ शकत नाहीत. १० कलमी योजनेचे शांतता करारात रूपांतर होणे अत्यावश्यक आहे.
- **अन्वर इब्राहिम,** पंतप्रधान, मलेशिया



चिरस्थायी युद्धविराम सुनिश्चित करण्यासाठी येत्या काही दिवसांत अजून बरेच महत्त्वाचे काम करायचे आहे. पाकिस्तान आणि तुर्की व इजिप्तसारख्या इतर देशांनी या संकटावर तोडगा काढण्याचा प्रयत्न केल्याबद्दल आम्ही आभारी आहोत.
- **विन्स्टन पीटर्स,** परराष्ट्र मंत्री, न्यूझीलंड



सर्व पक्षांनी आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे आणि युद्धविरामाच्या अटींचा आदर केला पाहिजे, जेणेकरून या प्रदेशात चिरस्थायी आणि व्यापक शांततेचा मार्ग मोकळा होईल. नागरिकांचे प्राण वाचवण्यासाठी आणि मानवी दुःख कमी करण्यासाठी हिंसाचार थांबवणे आवश्यक आहे.
- **अँटोनियो गुटेरेस,** सरचिटणीस, संयुक्त राष्ट्रे

# कोटक महिंद्रा बँकेच्या अडचणीत वाढ

## कोट्यवधींच्या घोटाळ्याचा तपास ईडीकडे

**पंचकुला, ८ एप्रिल**
खाजगी क्षेत्रातील नामवंत कोटक महिंद्रा बँक एका मोठ्या घोटाळ्यात अडकली आहे. अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) आता कथित १५० कोटी रुपयांच्या एफडी (मुदत ठेव) घोटाळ्याची चौकशी सुरू केली आहे. हे प्रकरण हरियाणातील पंचकुला येथील आहे, जिथे एका महानगरपालिकेच्या एफडीची नोंद बँकेत आढळलीच नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, पंचकुला महानगरपालिकेने आपल्या एफडीची मुदतपूर्तीची रक्कम काढण्याचा प्रयत्न केला असता बँकेच्या नोंदींमध्ये ती एफडी अस्तित्वातच नव्हती. येथूनच हा संपूर्ण घोटाळा उघडकीस आला. प्राथमिक तपासात महानगरपालिकेच्या एफडी आणि बँकेच्या नोंदींमध्ये मोठी तफावत असल्याचे समोर आले.

अंदाजे १५० कोटी रुपये रहस्यमयरीत्या गायब झाल्याचे वृत्त आहे. बनावट कागदपत्रे आणि खात्यांच्या माध्यमातून पैशांचा अपहार करण्यात आल्याचा संशय आहे. हे प्रकरण केवळ एका एफडीपुरते मर्यादित नसून एका मोठ्या आणि दीर्घकाळ चाललेल्या घोटाळ्याचा भाग असल्याचे मानले जात आहे. *(वृत्तसंस्था)*

### कर्ज देण्यासाठी सरकारी एफडीचा वापर

**खाजगी कंपन्यांना कर्ज देण्यासाठी सरकारी एफडीचा वापर करण्यात आला, असा तपास यंत्रणांना संशय आहे. या कर्जांवर जास्त व्याजदर आकारण्यात आले. काही कर्जांची परतफेड झाली. परंतु, बहुतेक प्रकरणांमध्ये पैसे बुडाले. याचा अर्थ असा की, सरकारी निधी धोक्यात घालून खाजगी संस्थांना फायदा होत आहे.**

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, ९ एप्रिल २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


**आजचा सामना**
कोलकाता वि. लखनौ
वेळ : सायं.७.३० वाजता
ठिकाण : कोलकाता

## विचारपुष्प



भारतामध्ये सर्व जातिधर्माचे लोक राहतात. भारतीय संस्कृतीमध्ये समान व्यवहार ठेवला जातो. भारतीय संस्कृतीमध्ये माणसाला माणूस म्हणून स्थान आहे आणि तसाच व्यवहार आहे अन्यथा भारताची संस्कृती 'वसुधैव कुटुम्बकम्' या तत्त्वावर विकासमान झाली नसती.

**- भारतरत्न नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# विध्वंसक युद्ध तूर्त थांबले

## दोन आठवड्यांचा संघर्षविराम

- **१० कलमी करारावर सहमती**
- **अमेरिका-इराणचा विजयाचा दावा**

**वॉशिंग्टन/तेहरान, ८ एप्रिल**

३९ दिवसांपासून सुरू असलेल्या विध्वंसक युद्धामुळे घायकुतीला आलेले इराण आणि अमेरिका यांनी अखेर बुधवारी दोन आठवड्यांसाठी का होईना, संघर्षविरामावर सहमती दर्शविली. इराणच्या १०-कलमी करारावर सहमती दर्शवत अमेरिकेने इराणवरील हल्ल्याची मोहीम दोन आठवड्यांसाठी स्थगित केली. दोन्ही देशांमध्ये आता येत्या शुक्रवारी १० तारखेला इस्लामाबादमध्ये चर्चा होणार आहे.





अमेरिका आणि इराण या दोघांनीही कराराचे विजय म्हणून स्वागत केले आहे. अमेरिकेने याला संपूर्ण विजय म्हटले तर इराणनेही युद्धात विजय झाल्याची घोषणा केली. यानंतर इराणी नागरिकांनी रस्त्यावर उतरत जल्लोष केला. पाकिस्तानच्या मध्यस्थीनंतर आणि इराणच्या दहा कलमी प्रस्तावानंतर बुधवारी पहाटे ४ वाजताच्या (भारतीय वेळेनुसार) सुमारास दोन्ही बाजूंनी द्विपक्षीय युद्धविरामावर सहमती दर्शविल्याचे सांगण्यात येत असले, तरी वाटाघाटीत चीनची मध्यस्थी असल्याचे समोर आले आहे. संघर्षविरामाची घोषणा करताना राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले की, मध्यस्थी राष्ट्रांनी केलेल्या वाटाघाटीनंतर इराणने होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे खुली करण्यास सहमती दर्शविल्याने मी दोन आठवड्यांसाठी इराणवरील हल्ले थांबविण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिका आता इराणसोबत मिळून काम करेल. इराणमध्ये युरेनियमची समृद्धी होणार नाही, याची खात्री केली जाईल. त्या बदल्यात इराणवरील आयात शुल्क व आर्थिक निर्बंधांमध्ये सवलत देण्याबाबत चर्चा केली जाईल. इराणमधील जुलमी राजवटीचा अंत झाला. संघर्षात अमेरिकेने आपली लष्करी उद्दिष्ट्ये पूर्ण केली आणि इराणचा १०-कलमी प्रस्ताव हा कायमस्वरूपी करारासाठी एक व्यवहार्य आधार आहे. अमेरिका आणि इस्रायलने इराणविरुद्धच्या लढाईत मोठे यश मिळविले, असा दावा अमेरिकेचे संरक्षण मंत्री पीट हेगसेथ यांनी केला आहे. तसेच युद्धाचा शेवट झालेला नाही, असे इराणचे सर्वोच्च नेते मोज्तबा खामेनेई यांनी म्हटले. (वृत्तसंस्था)

### लेबनॉनमधील लढा सुरूच राहणार : नेतान्याहू



**इस्रायलचे पंतप्रधान म्हणाले, संघर्षविरामासाठी इराणने सादर केलेला १०-कलमी प्रस्ताव मान्य केला आहे. दोन आठवड्यांचा युद्धविराम लेबनॉनला लागू होणार नाही. लेबनॉनमधील हिजबुल्लाहच्या अड्ड्यांवर आमचे हल्ले सुरूच राहणार आहेत. आखाती देश आणि जगाला यापुढे आण्विक, क्षेपणास्त्र आणि दहशतवादाचा धोका राहणार नाही, हे सुनिश्चित करण्याच्या अमेरिकेच्या प्रयत्नांना इस्रायलचा पाठिंबा आहे.**



## 'होर्मुझ' पुन्हा बंद

**तेहरान, ८ एप्रिल**

संघर्षविरामानंतर इस्रायलने लेबनॉनमधील हिजबुल्लाहच्या अड्ड्यांवरील हल्ले सुरूच ठेवल्याने इराण संतापला. संघर्षविरामाच्या उल्लंघनाचा आरोप करीत होर्मुझ जलमार्ग जहाज आणि तेल टँकरसाठी पुन्हा बंद करण्याची घोषणा इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स अर्थात् आयआरजीसीने केली आहे. पूर्वपरवानगीशिवाय जाणाऱ्या कोणत्याही जहाजाला उडवून दिले जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

आयआरजीसीशी संबंधित फर्स न्यूज एजन्सीच्या वृत्तानुसार, इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी वाहतूक पुन्हा एकदा थांबवली असून, जहाजांना या महत्त्वाच्या जलमार्गातून जाण्यापासून रोखले आहे. लेबनॉनमधील हिजबुल्लाहवर इस्रायलने केलेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून हे पाऊल उचलण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे. या सामुद्रधुनीतून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या तेल टँकर्सवर हल्ला करण्याचा इशारा त्यांनी दिला. यामुळे मध्य आशियातील सागरी सुरक्षेबाबत नवीन चिंता निर्माण झाली आहे. अमेरिका-इराण युद्धविराम लागू झाल्यानंतर काही तासांतच ही घटना घडली आहे. सशर्त शस्त्रसंधीनंतर केवळ दोनच जहाजे या जलमार्गातून जाऊ शकली आहेत. (वृत्तसंस्था)

# एसटी महामंडळाचा प्रवाशांना दणका

## हंगामी भाडेवाढीतून खिशाला कात्री



**मुंबई, ८ एप्रिल**

राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागाला जोडणारी जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या एसटी महामंडळाने उन्हाळी सुट्ट्यांच्या तोंडावर प्रवाशांना महागाईचा मोठा झटका दिला आहे. वाढत्या गर्दीचा फायदा घेत प्रशासनाने प्रवासी भाड्यात १० टक्के हंगामी वाढ करण्याचा निर्णय घेतल्याने, गावाला जाण्याचे किंवा पर्यटनाचे नियोजन करणाऱ्या सर्वसामान्यांचे बजेट कोलमडणार आहे. येत्या १५ एप्रिलपासून ही नवीन दरवाढ अंमलात येणार असून, ऐन सुटीच्या हंगामात प्रवाशांच्या खिशावर अतिरिक्त भार पडणार आहे.

राज्य सरकारने महिलांना एसटी प्रवासात ५० टक्के सवलत देऊन दिलासा दिला असला, तरी आता सरसकट भाडेवाढ केल्यामुळे या सवलतीचा मूळ उद्देशच धोक्यात आल्याची भावना प्रवाशांमध्ये व्यक्त होत आहे. एका बाजूला सवलतीचा गाजावाजा करायचा आणि दुसऱ्या बाजूला हंगामी भाडेवाढीच्या नावाखाली प्रवाशांकडून जादा पैसे वसूल करायचे, हा सरकारचा दुटप्पीपणा असल्याची टीका होत आहे. विशेषतः ज्या कुटुंबांमध्ये अनेक सदस्य प्रवासाचे नियोजन करत आहेत, त्यांना या १० टक्के वाढीमुळे मोठा आर्थिक फटका सोसावा लागणार आहे.

**खासगी ट्रॅव्हल्सच्या स्पर्धेत सामान्यांची एसटी महागली**

नेहमीच आर्थिक तोट्याचे रडगाणे गाणाऱ्या एसटी महामंडळाला एप्रिल आणि मे या दोन महिन्यांत लग्नकार्ये तसेच उन्हाळी सुट्ट्यांमुळे सर्वाधिक उत्पन्न मिळते. मात्र, याच उत्पन्नावर डोळा ठेवून करण्यात आलेली ही दरवाढ सर्वसामान्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरत आहे. श्रीमंत वर्ग खाजगी वाहनांचा पर्याय निवडू शकतो, परंतु खेड्यापाड्यातील गरीब आणि मध्यमवर्गीय जनतेसाठी एसटी हाच एकमेव आधार आहे. प्रवाशांमध्ये तीव्र संताप असून, ही अन्यायकारक भाडेवाढ तातडीने मागे घेण्याची मागणी जोर धरत आहे. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### केरळम्, आसाम, पुडुचेरीत आज मतदान

**नवी दिल्ली :** केरळ, आसाम, पुडुचेरी विधानसभा निवडणुकीसाठी गुरुवारी मतदान होत असून, यासाठी निवडणूक आयोगाने जय्यत तयारी केली आहे. केरळम् आणि केंद्रशासित प्रदेश पुडुचेरीत मतदानासाठी शाळा आणि महाविद्यालयांना सुटी जाहीर करण्यात आली आहे. ही सुटी केवळ शैक्षणिक संस्थांपुरती मर्यादित न राहता, महत्त्वाच्या ठिकाणांरील कार्यालये, खाजगी संस्था आणि व्यावसायिक आस्थापनांपर्यंतही वाढवण्यात आली आहे. यामुळे निवडणुकीच्या दिवशी ही एक नागरी सुटी ठरली आहे. केरळ आणि पुडुचेरीत पूर्ण सुटी जाहीर करण्यात आली आहे. केरळमध्ये विधानसभेच्या सर्व १४० जागांसाठी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. सरकारी अनुदानित किंवा खाजगी अशा सर्व प्रकारच्या शैक्षणिक संस्था पूर्णपणे बंद राहतील. निवडणूक आयोगाने १२६ विधानसभा मतदारसंघांमध्ये होणाऱ्या निवडणुकांसाठीच्या सर्व व्यवस्थांना अंतिम स्वरूप दिले आहे.

### रामपालला देशद्रोहाच्या प्रकरणात जामीन

**चंदीगड :** देशद्रोहाच्या प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या सतलोक आश्रमाचा प्रमुख रामपालला पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाकडून जामीन मिळाला आहे. या प्रकरणात तो ११ वर्षे, ४ महिने आणि २० दिवसांपासून हिसार येथील कारागृहात आहे. रामपालला १९ नोव्हेंबर २०१४ रोजी हिसार जिल्ह्यातील बरवाला येथील सतलोक आश्रमातून अटक करण्यात आली होती. उच्च न्यायालयाने त्याला न्यायालयाच्या अवमानना प्रकरणात हजर राहण्याचे आदेश दिले होते, परंतु तो गैरहजर राहिला. पोलिस त्याला अटक करण्यासाठी पोहोचले, असता त्याच्या समर्थकांशी झटापट झाली. या संघर्षात ५ महिला आणि दीड वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाला होता. याच प्रकरणात रामपालवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. करौंथा आश्रमात झालेल्या हत्या प्रकरणात १४ जुलै २०१४ रोजी रोहतक न्यायालयात सुनावणी होती.

# अंधश्रद्धा ठरवण्याचा अधिकार आम्हाला

## शबरीमला प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण; केंद्र सरकारचा विरोध

**नवी दिल्ली, ८ एप्रिल**



धर्मातील कोणती प्रथा अंधश्रद्धा आहे, हे ठरवण्याचा अधिकार आणि अधिकारक्षेत्र न्यायालयाकडे आहे, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी नोंदविले. केंद्राने केलेल्या युक्तिवादाला उत्तर देताना न्यायालयाने हे निरीक्षण नोंदविले. न्यायाधीश हे कायद्याचे तज्ज्ञ असतात, धर्माचे नव्हे. त्यामुळे एखादे धर्मनिरपेक्ष न्यायालय या मुद्यावर निर्णय देऊ शकत नाही, असा सरकारने युक्तिवाद केला होता.

भारताचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेखालील नऊ न्यायाधीशांचे घटनापीठ सध्या विविध याचिकांवर सुनावणी करत आहे. या याचिकांमध्ये केरळमधील शबरीमला मंदिरासह विविध धार्मिक स्थळांवर महिलांवर होणारा भेदभाव तसेच विविध धर्मांनी आचरणात आणलेल्या धार्मिक स्वातंत्र्याची व्याप्ती आणि कक्षा यांसारख्या मुद्यांचा समावेश आहे.

# आठ पोलिसांवरील हत्येचा गुन्हा कायम

### मुंबई हायकोर्टाचा निर्णय

**मुंबई, ८ एप्रिल**

२०१४ मधील शहरातील तरुण ॲग्नेलो वाल्डारीस याच्या कथित पोलिस कोठडीतील मृत्युप्रकरणी आठ पोलिस कर्मचाऱ्यांवर खुनाचा आरोप निश्चित करण्याच्या कनिष्ठ न्यायालयाचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाने कायम ठेवला.

वाल्डारीस यांच्या मृत्यूशी संबंधित परिस्थिती पाहता, या प्रकरणाची पूर्ण सुनावणी आवश्यक आहे, असे न्या. ए. एस. गडकरी आणि श्याम चांडक यांच्या खंडपीठाने सोमवारी दिलेल्या एका आदेशात म्हटले आहे. ॲग्नेलो वाल्डारीसचा मृत्यू हत्या होती की अपघात यावरून गंभीर वाद असल्याचेही न्यायालयाने नमूद केले.

भादंविच्या कलम ३०२ आणि २९५-अ (नागरिकांच्या कोणत्याही वर्गाच्या धार्मिक भावना दुखावण्याच्या उद्देशाने केलेली जाणीवपूर्वक आणि द्वेषपूर्ण कृत्ये) अन्वये आपल्याविरुद्ध दिलेला आदेश रद्द केल्याची मागणी केली होती. (वृत्तसंस्था)

# सुहासिनी जेवणातून २४ महिलांना विषबाधा



**तुळजापूर तालुक्यातील कदमवाडी येथील घटना**

**एक महिला गंभीर; अन्नाचे नमुने तपासणीसाठी**

**तभा वृत्तसेवा,**
**धाराशिव, दि. ८ एप्रिल-**

सुहासिनी जेवण कार्यक्रमातून २४ महिलांना विषबाधा झाली. यातील एका महिलेची प्रकृती गंभीर आहे. तुळजापूर तालुक्यातील कदमवाडी येथे ही घटना घडली. रात्री उशिरापर्यंत अनेक महिलांची प्रकृती बिघडत गेल्याने ग्रामस्थांनी त्यांना तुळजापूर व धाराशिव येथील रुग्णालयात दाखल केले.

येथील एका कुटुंबात धार्मिक कार्यक्रमानिमित्त ६ एप्रिल रोजी महिलांसाठी सुहासिनी जेवणाचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी ३ वाजता पारंपरिक जेवण दिले गेले. मात्र जेवणानंतर काही तासांतच महिलांना मळमळ, उलट्या, पोटदुखी आणि अशक्तपणा यांसारखे त्रास जाणवू लागले.

सर्व रुग्णांवर वैद्यकीय उपचार सुरु असून बहुतांश महिलांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली. दरम्यान, आरोग्य विभागाने घटनास्थळी धाव घेत अन्नाचे नमुने तपासणीसाठी पाठवले आहेत. प्राथमिक अंदाजानुसार अन्न दूषित झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# अवैध मुरुम उत्खनन; दोषी अधिकाऱ्यांची बडतर्फी

- **सोलापूरमधील चिंचोली एमआयडीसीमधील प्रकार**
- **महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आदेश**
- **२०० कोटींच्या दंड वसुलीसाठी मालमत्तेवर बोजा चढविण्याचे निर्देश**

**मुंबई, दि. ८ एप्रिल**

चिंचोली एमआयडीसीमध्ये झालेल्या बेकायदा मुरूम उत्खनन आणि वाहतूक प्रकरणी महसूलमंत्र्यांनी अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला आहे. या घोटाळ्यात सहभागी असलेल्या आणि कर्तव्यात कसुरी करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर थेट बडतर्फीची कारवाई करण्याचे आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. तसेच, संबंधित कंपन्यांकडून २०० कोटी रुपयांचा दंड वसूल करण्यासाठी त्यांच्या मालमत्तेवर बोजा चढविण्याचे निर्देशही त्यांनी प्रशासनाला दिले आहेत.

आमदार राजू खरे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे चिंचोली एमआयडीसीतील अवैध उत्खननाचा मुद्दा उपस्थित केला होता. याबाबत महसूलमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत महसूलमंत्र्यांनी हे आदेश दिले. बैठकीला सोलापूरचे जिल्हाधिकारी कार्तिकेयन तसेच मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



२० लाख ब्रासचा अवैध उपसा आणि ५०० कोटींच्या महसुलाचे नुकसान बैठकीत आमदार राजू खरे म्हणाले की, "चिंचोली एमआयडीसीमध्ये तब्बल २० लाख ब्रास मुरुमाचा अवैध उपसा झाला आहे. मोठ्या प्रमाणात खड्डे खोदून मुरुम काढल्यामुळे नवीन उद्योगांना जागा मिळणे कठीण झाले आहे. यामुळे नियोजित १०० उद्योग येऊ शकले नाहीत आणि शासनाचा ५०० कोटी रुपयांचा अपेक्षित महसूल बुडाला आहे. विनापरवाना उत्खनन करणाऱ्या कंपन्यांवर गुन्हे दाखल करणे आवश्यक आहे."

### ४३ कोटींचा दंड १० लाखांवर कसा आला? मंत्र्यांकडून चौकशीचे आदेश

या प्रकरणातील धक्कादायक बाब म्हणजे, एका प्रकरणात ४३ कोटी रुपयांचा दंड निश्चित करण्यात आला असताना तो केवळ १० लाख रुपयांपर्यंत खाली आणला गेला. या संशयास्पद बाबीची सखोल चौकशी करण्याचे आदेश महसूलमंत्र्यांनी दिले आहेत. तसेच, या कालावधीत जे अधिकारी कार्यरत होते, त्यांची यादी सादर करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे संकेत त्यांनी दिले आहेत.




CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# पोषणमूल्यांचे विषम वास्तव

जे वढी पोषणमूल्ये श्रीमंतांच्या शाम्पूत असतात, त्याच्या एक दशांशही गरिबांच्या जेवणात नसतात, असे सामाजिक विषमतेचे भाष्यकार अनेक वेळा सांगत असतात. जगात आणि देशात वाढत चाललेल्या विषमतेचे हे विदारक सत्य. 'वर्ल्ड इनइक्वालिटी लॅब'चा समोर आलेला ताजा अहवाल असे सांगतो की, केवळ १० टक्के श्रीमंतांच्या ताब्यात तब्बल ४४ टक्के जमीन आहे! हा अहवाल खरोखर डोळ्यात अंजन घालणारा आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत किंवा प्रगतिशील समजल्या जाणाऱ्या राज्यात ४८.१ टक्के ग्रामीण कुटुंबांकडे जमीन नसणे, हे लोकशाहीतल्या समान संधीच्या संकल्पनेला हरताळ फासणारे आहे. जेथे 'अन्नदाता सुखी भव'ची कामना केली जाते, त्याच देशाच्या ग्रामीण भागातील ४६ टक्के कुटुंबे भूमिहीन आहेत, हा आणखी एक धक्का.

ग्रामीण भारताचा 'गिनी इंडेक्स' ७१ वर पोहोचला आहे. हे विषमता मोजण्याचे प्रमाण आहे. खरे तर, देशाच्या स्वातंत्र्याला ७९ वर्षे पूर्ण होत असताना विषमतेचे मोजमाप करावे लागत आहे, हेच मुळात दुर्दैव आहे. ही आकडेवारी सामाजिक विषमतेचा आरसा असून, त्याचा भयाण चेहरा बदलण्याची गरज आहे. देशातील सर्वांत श्रीमंत असलेल्या १ टक्का लोकांकडे १८ टक्के जमिनीचा मालकी हक्क आहे, तर दुसरीकडे शेतीवर आधारित अर्थव्यवस्था असतानाही निम्म्याहून अधिक जनता भूमिहीन आहे, हे चिंताजनक मानले पाहिजे. ग्रामीण भागात जाऊन शेती विकत घेण्यासाठी थोडी विचारपूस केली तर बहुतांश असे सांगितले जाते की, ही जमीन शहरात राहणाऱ्या अमुक अमुक श्रीमंत माणसाची आहे. कोणे एकेकाळी ती त्याच जमिनीवर राबणाऱ्या शेतमजुराची होती, अशीही माहिती समोर येते. एखाद्या गावात विकासाचा प्रकल्प येणार असेल, तर त्याची पूर्वकल्पना राजकीय नेत्यांना, श्रीमंतांना आधीच येत असल्याने आणि मूळ शेतकरी त्यापासून अनभिज्ञ असल्याने तो थोड्याशा वाढीव पैशात ती जमीन विकतो. कालांतराने त्याला कळते की तीच जमीन प्रकल्पात गेली आणि आता त्या जमिनीसाठी नव्या मालकाला लाखो किंवा कोट्यवधी रुपये मिळताहेत. टाळूवरचे लोणी खाणारा हा व्यवसाय. अशा विषमतांचे वास्तव 'वर्ल्ड इनइक्वालिटी लॅब'सारख्या संस्थांच्या अहवालात दिसते. काही गावांमध्ये तर ५० टक्क्यांच्याही वर जमीन एकाच मालकाच्या नावे आहे, असे हा अहवाल सांगतो. ज्या भागात एकेकाळी जमीनदारी किंवा संस्थानिकांची सत्ता होती, तेथे जमिनीचे केंद्रीकरण आजही जसेच्या तसे आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उलटूनही काळातही आपण गुलामगिरीच्या साखळदंडातून खरेच पूर्णपणे मुक्त झालो आहोत का, असा प्रश्न विचारायला भाग पाडणारी ही आकडेवारी आहे.

खरे तर, विषमतेचे हे लोण केवळ शेतजमिनीपर्यंत मर्यादित नाही. नैसर्गिक संसाधनांवरही काही ठरावीक घटकांचे वर्चस्व निर्माण झाले आहे. ज्यांना गरज नाही, त्यांच्या दारात चार-चार आलिशान गाड्या उभ्या आहेत, पण जो दिवसभर कष्ट उपसतो त्याला सायकल घेणेही दुरापास्त आहे. एकीकडे श्रीमंतांच्या बंगल्यातील जलतरण तलाव पाण्याने ओसंडून वाहत आहेत, तर दुसरीकडे गरिबांना पिण्याच्या पाण्यासाठी अनेक मैल पायपीट करावी लागत आहे. शहरी भागात राहणाऱ्यांना हे कटु वास्तव दिसणार नाही. थोडे गावात गेलो तर असे कसे काय सुरू आहे, असा प्रश्न उभा झाल्याशिवाय राहणार नाही. आज आपण अशा जगात जगत आहोत, जिथे पाळीव कुत्र्यांच्या बिस्किटांवर आणि त्यांच्या 'हेल्थ सप्लिमेंट्स'वर होणारा खर्च, एका शेतमजुराच्या महिनाभराच्या कमाईपेक्षा कितीतरी जास्त आहे. 'ऑक्सफॅम'च्या अहवालानुसार, भारतातील सर्वांत श्रीमंत १ टक्का लोक, खालच्या स्तरातील ५० टक्के लोकांच्या तुलनेत कितीतरी पटीने अधिक कार्बन उत्सर्जित करतात. ज्यांच्या घरात चार लोक आहेत, त्यांच्या दारी अर्धा डझन गाड्या. या गाड्यांसाठी लागणारी जागा, इंधन आणि त्यातून निर्माण होणारे प्रदूषण याचा भार निसर्गावर आणि पर्यायाने गरिबांवर पडतो. स्विमिंग पूल, गार्डन इत्यादी सुखसोईंनी युक्त असलेल्या शहरातल्या सुखवस्तू इमारतीत राहणाऱ्या एका कुटुंबाचा दिवसभराचा पाण्याचा वापर किमान ५००० लिटर असतो. त्याच शहराच्या एका लहानशा वस्तीत राहणाऱ्या कुटुंबाला ५० लिटर पाण्यासाठी दोन तास रांगेत उभे राहावे लागते. संसाधनांचे हे 'हायजॅकिंग' म्हणजेच आपल्या कथित कल्याणकारी लोकशाहीचे मोठे अपयश आहे.

'हुरून इंडिया'च्या आणखी एका अहवालानुसार, भारतातील अब्जाधीशांची संख्या सातत्याने वाढत आहे. मात्र, त्याचवेळी देशातील ७० टक्के लोकांकडे स्वतःचे हक्काचे घर किंवा पुरेशी जमीन नाही. कारण ती त्याच्या उत्पन्नाच्या आवाक्यातच येत नाही. त्यामुळे विशेषतः गावात किंवा शहरातही, जमिनीची मालकी ही बहुतांशी श्रीमंतांकडेच दिसते. जमिनीच्या वितरणाची विषमता वाढते तेव्हा अन्नाची सुरक्षाही धोक्यात येत असते. ज्याच्याकडे जमीन नाही, त्याला शेतमजूर म्हणून राबावे लागते. बाजारात महागाई वाढली की, सर्वांत आधी गरिबाच्या ताटातली भाजी गायब होते. बाजारात मिळणारी महागडी फळे अत्तराचे दिवे लावणाऱ्यांच्या 'फेस पॅक'मध्ये वापरली जातात आणि दुसरीकडे त्याच फळांकडे आ वासून पाहणाऱ्या गरिबांच्या पोरांना कुपोषणाशी लढावे लागते, हे या व्यवस्थेचे मोठे विडंबन आहे. ते गोंडस नावांखाली लपवले जात आहे, हे त्याहीपेक्षा चिंताजनक आहे. विषमतेची ही दरी संधींच्याही बाबतीत आहे. ज्यांच्याकडे संसाधने आहेत, त्यांच्या पाल्यांना परदेशातील शिक्षण सहज मिळते, तर भूमिहीन शेतमजुराचे लेकरू जिल्हा परिषदेच्या शाळेतील साध्या सोईसुविधांसाठीही आसुसलेले असते. श्रीमंत असणे चुकीचे नाही. पण सर्वांना संपन्न होण्याची समान संधी मिळाली पाहिजे. पैसा पैशाला ओढतो, ही संकल्पना खरी असेल, तर अशी संधी गरिबांना सापडणे दुरापास्तच. शेवटी तो आयुष्यभर चाचपडत जीवन जगतो आणि आपल्या पुढच्या पिढीलाही गरिबीचे देणे देत निघून जातो. पिढ्यान्‌पिढ्या हे असेच चालले आहे.

ज्या भागात जमिनी सुपीक आहेत, बाजारपेठा जवळ आहेत किंवा चांगले रस्ते आहेत, तेथेही विषमता कमी होण्याऐवजी वाढत आहे. विकासाचे 'मॉडेल' जर सर्वांना सामावून घेणारे नसेल, तर गुळगुळीत रस्त्यांना आणि बाजारपेठांना अर्थ काय? जमिनीचे न्याय्य वाटप हा केवळ आर्थिक मुद्दा नसून, तो सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत आणि गरीब लोक गरिबीच्या गर्तेत आणखीच रुतत चालले आहेत, ही अभिमान बाळगावा अशी गोष्ट खचीतच नाही. दुर्दैवाने, ती आपल्या व्यवस्थेची फलश्रुती आहे. जमीन सुधारणा कायद्यांची कडक अंमलबजावणी करून ही कोंडी फोडण्याची वेळ आली आहे. जमीन, पाणी, वीज आणि शिक्षण यासारख्या मूलभूत संसाधनांचे न्याय्य वाटप झाले पाहिजे. तळागाळातील माणसाला आर्थिक प्रवाहात आणण्यासाठीचे प्रयत्न खरे आहेत, याची खात्री त्याला पटली पाहिजे. शेवटी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, ज्या समाजाचा पाया विषमतेच्या विटांवर रचला जातो, तो समाज दीर्घकाळ तग धरू शकत नाही. आज आपण अशा वळणावर आहोत, जिथे एका बाजूला 'पॅकेज'ची चकाकी आहे आणि दुसरीकडे आत्महत्येच्या प्रश्नाचा भयाण काळोख आहे. सामाजिक न्यायासाठी मोफत योजना ठीक. पण अशा तात्पुरत्या योजना गरिबांचा, भूमिहिनांचा भाग्योदय करू शकत नाहीत. कष्टाने, स्वाभिमानाने उभा राहणारा समाज भारतात आहे. केवळ संधीची सुलभता तेवढी त्याला दिली जावी. संसाधनांचे न्याय्य वाटप व्हावे. येत्या काळात जनगणना होणार आहे. त्यातून समाजाच्या विभिन्न स्तराची प्रत्यक्ष आकडेवारी पुढे येईलच. त्याचे विश्लेषणही होईल. त्यानंतर तरी मागे पडलेल्यांना, भूमिहिनांना, शेतमजुरांना, गरिबांना यथायोग्य संधी आणि न्याय देण्याच्या दिशेने पावले उचलली जातील, अशी आशा करूया. श्रीमंतांच्या शाम्पूतली पोषणमूल्ये कुण्या गरिबाच्या ताटात टाकूया. ▮

## प्रासंगिक

# चला, स्त्री-शक्तीला सक्षम करूया!

**नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

ये त्या काही दिवसांत भारत सण-उत्सवांच्या वातावरणात न्हाऊन निघालेला असेल, यानिमित्ताने देशाच्या कानाकोपऱ्यात विविध सोहळे साजरे केले जातील. आसामचे लोक रोंगाली बिहू साजरा करतील, तर ओडिशामध्ये महा बिशुबा पान संक्रांती साजरी होईल. पश्चिम बंगालमध्ये पोईला बैशाखपासून बंगाली नववर्षाची सुरुवात होईल. तर केरलम्‌मध्ये अत्यंत उत्साहात विशु साजरा केला जाईल. तामिळनाडूमध्ये, पुथांदुची लगबग तर, पंजाब आणि एकूणच उत्तर भारतात बैसाखीचा उत्साह असेल. हे सगळे सण-उत्सव देशभरात आशा आणि सकारात्मकतेचे नवे चैतन्य निर्माण करणारे ठरतील. हे सणवार साजरे करणाऱ्या देशभरातील आणि देशाबाहेरच्याही भारतीयांना मी हार्दिक शुभेच्छा देतो. हे पवित्र उत्सव, सगळ्यांच्याच आयुष्यात आनंद आणि समृद्धी घेऊन येणारे ठरोत.

त्याशिवाय, ११ एप्रिलला, आपण महात्मा फुले यांची २०० वी जयंती साजरी करणार आहोत, तर १४ एप्रिलला आंबेडकर जयंतीनिमित्त, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहणार आहोत. या अशा विशेष प्रसंगांसह, जेव्हा पुनरुज्जीवनाची भावना आपल्या मनामनांत भरून वाहत असेल, अशाच वेळी आपण आणखी एका ऐतिहासिक घटनेच्या उंबरठ्यावर उभे असणार आहोत. हा प्रसंग म्हणजे, आपल्या लोकशाहीचा पाया अधिक सखोल करण्याची आणि समता तसेच सर्वसमावेशकतेविषयीच्या आपल्या सामूहिक संकल्पाला अधिक मजबूत करण्याची आपली संधी असेल.

येत्या १६ एप्रिलला, संसदेचे एक विशेष सत्र बोलावले जाणार असून, त्यात, महिला आरक्षणाला गती देणाऱ्या विशेष विधेयकावर चर्चा होऊन ते संमत केले जाणार आहे.

ही केवळ एक वैधानिक प्रक्रिया असेल, असे म्हणणे म्हणजे त्याचे महत्त्व कमी करण्यासारखे आहे. या विधेयकात, देशभरातील कोट्यवधी महिलांच्या आशा-आकांक्षांचे प्रतिबिंब पडलेले आहे. भारताचे सांस्कृतिक मर्म ज्या मार्गदर्शक तत्त्वांवर आधारलेले आणि चाललेले आहे, ते तत्त्व - जेव्हा स्त्री प्रगती करते, तेव्हा समाज प्रगती करतो - त्याचाच दृढनिश्चय यातून व्यक्त होत आहे

भारताच्या लोकसंख्येत, निम्मा वाटा महिलांचा आहे. देशासाठी त्यांनी दिलेले योगदान अत्यंत व्यापक आणि मौल्यवान आहे. आज आपण, प्रत्येक क्षेत्रात महिलांनी साध्य केलेल्या अद्वितीय कर्तृत्वाचा अनुभव घेत आहोत. विज्ञान असो की तंत्रज्ञान किंवा मग उद्यमशीलता. खेळ असो किंवा मग लष्करी दले, संगीतापासून कलेपर्यंत, सगळ्या क्षेत्रांत, भारताच्या प्रगतीत महिलांचा सिंहाचा वाटा आहे. गेल्या काही वर्षांत, महिलांच्या सक्षमीकरणासाठी पोषक वातावरण देशात निर्माण होईल, यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न जाणीवपूर्वक केले जात आहेत. शिक्षणाची वाढलेली उपलब्धता, आरोग्यात सुधारणा, वित्तीय समावेशनात वाढ, महिलांसाठीच्या पायाभूत सुविधांमधे वाढ, यामुळे आर्थिक आणि सामाजिक जीवनात, महिलांचा सहभाग वाढण्याचा पाया रचला गेला आहे.



मात्र, तरीही, राजकीय क्षेत्रात, विशेषतः विधिमंडळ संस्थांमध्ये त्यांचे प्रतिनिधित्व हे, महिलांची समाजातील संख्या आणि भूमिकेला अनुसरून कधीही राहिलेले नाही. त्यांचा सहभाग नसणे ही आपल्यासाठी दुर्दैवाची गोष्ट यासाठी आहे की जेव्हा महिला प्रशासन आणि निर्णयप्रक्रियेत सहभागी होतात, त्यावेळी, त्या त्यांचे स्वतःचे अनुभव त्यात जोडतात आणि धोरण/निर्णयाला एक वेगळा दृष्टिकोन देतात, जो सार्वजनिक आयुष्याला समृद्ध करतो आणि प्रशासनाची गुणवत्ताही वाढवतो. २०२९ च्या लोकसभा आणि विविध राज्यांतील विधानसभा निवडणुका महिला आरक्षणासह होणार आहेत, हे तर निश्चितच आहे. गेल्या काही दशकांत, आधीच्या सरकारांकडूनही, लोकशाही संस्थांमध्ये, महिलांना त्यांचे यथोचित स्थान देण्याचे प्रयत्न सातत्याने करण्यात आले. समित्या स्थापन केल्या गेल्या, विधेयकांचे मसुदे मांडले गेले, पण त्यांनी कधी दिवसाचा उजेड पाहिलाच नाही. मात्र, कायदेमंडळात महिलांचे प्रतिनिधित्व वाढले पाहिजे, यावर एक व्यापक सहमती कायम राहिली. सप्टेंबर २०२३ मध्ये, संसदेने याच सहमतीच्या भावनेतून नारी शक्ती वंदन अधिनियम संमत केला. या घटनेला मी माझ्या आयुष्यातील सर्वांत विशेष घटनांपैकी एक मानतो.

महिला आरक्षणाची सुनिश्चिती करणारी ही संधी आपल्या राज्यघटनेच्या भावनेशी देखील अत्यंत दृढतेने जोडलेली आहे. जिथे समानता केवळ राज्यघटनेतच अंतर्भूत नसेल, तर ती प्रत्यक्ष समाजाच्या आचरणात देखील अनुभवता येईल अशा प्रकारच्या समाजाची कल्पना आपल्या राज्यघटनाकारांनी मांडली होती. कायदेमंडळांमध्ये महिलांच्या सहभागाला बळकटी देणे हे त्या स्वप्नाच्या पूर्ततेच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊलच आहे. प्रत्येक नागरिकाचा देशाचे भवितव्य घडवण्याच्या प्रक्रियेत समान वाटा असेल, असा समाज घडवण्याच्या आपल्या वचनबद्धतेचे हे प्रतिबिंब आहे.

हा एक असा क्षण आहे ज्या बाबतीत आता अधिक काळ चालढकल करता येणार नाही. महिलांचे प्रतिनिधित्व वाढवण्याच्या बाबतीत होत असलेला प्रत्येक विलंब हा खरे तर आपल्या लोकशाहीचा दर्जा आणि सर्वसमावेशकतेला बळकटी देण्याला होत असलेला विलंब आहे. दशकानुदशके, कायदेमंडळांमध्ये महिलांचा अधिक सहभाग असायला हवा या गरजेची दखल घेतली गेली, त्यावर चर्चाही केल्या गेल्या, त्याबाबत वारंवार मांडणीही केली गेली. अशावेळी आता कृती करण्याला उशीर करणे म्हणजे आपल्याला ठावूक असलेला आपल्यातला असमतोल आणखी अधिक काळ लांबवण्यासारखे असणार आहे. महत्त्वाचे म्हणजे या असमतोलात सुधारणा घडवून आणण्याची क्षमता आपल्यात आहे. आज भारत आत्मविश्वास आणि ध्येयाने पुढे वाटचाल करतो आहे, अशा वेळी आपल्या संस्थांमध्ये सर्व नागरिकांच्या, विशेषतः आपल्या लोकसंख्येच्या अर्ध्या संख्येच्या आकांक्षांचे प्रतिबिंब उमटणे गरजेचे आहे. वेळेवर केलेल्या कृतीमुळे केवळ जुन्या वचनबद्धतेचा सन्मान राखला जाणार नाही, तर त्यासोबतच प्रगतीचा वेग देखील कायम राखला जाईल याची सुनिश्चिती होऊ शकणार आहे. आपली लोकशाही अधिक प्रातिनिधिक, प्रतिसाद देणारी आणि भविष्यासाठी सज्ज बनवण्याच्या दिशेने ही खरोखरच एक ऐतिहासिक संधी आहे.

हा क्षण सामूहिक कृतीची अपेक्षा करतो आहे. ही बाब कोणत्याही एका सरकारबद्दल, पक्षाबद्दल किंवा व्यक्तीबद्दल नाही. ही, आपण एक देश म्हणून, या पावलाचे महत्त्व ओळखून ते प्रत्यक्षात टाकण्यासाठी एकत्र येण्याची बाब आहे. हे आपण आपल्या महिला शक्तीला देऊ लागत असलेले देणे आहे. म्हणूनच, महिला आरक्षणाचे विधेयक हे जास्तीत जास्त व्यापक सहमतीने मंजूर झाले पाहिजे आणि मोठ्या राष्ट्रीय हिताने प्रेरित असले पाहिजे. अशा संधी आपल्याकडून स्वतःसाठी नाही, तर भावी पिढ्यांसाठी कृती करण्याची अपेक्षा करत असतात. लोकशाहीचे खरे सामर्थ्य हे काळाप्रमाणे बदलत जाण्याच्या आणि अधिक सर्वसमावेशक होण्याच्या क्षमतेमध्ये दडलेले असते, याचे स्मरणच त्या आपल्याला करून देत असतात.

संसदेच्या या ऐतिहासिक अधिवेशनाच्या पृष्ठभूमीवर, मी सर्व संसद सदस्यांना, सर्व पक्षाच्या सदस्यांना त्यांनी भारतातील महिलांसाठी उचलल्या जात असलेल्या या महत्त्वाच्या पावलाला पाठिंबा देण्यासाठी एकत्र यावे असे आवाहन करतो. चला, आपण उत्तरदायित्व आणि ध्येयनिष्ठतेच्या भावनेने या संधीचा लाभ घेऊया. चला, आपल्या लोकशाहीच्या अत्युच्च परंपरेचे प्रतिबिंब उमटेल अशा प्रकारची कृती आपण करूया.

जेव्हा जेव्हा राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या विषयांचा प्रश्न असतो, तेव्हा तेव्हा भारत, मतभेदांच्या पलीकडे जाऊन एकजुटीने कृती करतो ही बाब भारताने कायम दाखवून दिली आहे. हा एक तशाच प्रकारचा क्षण आहे. चला, आपण एकत्र पुढे वाटचाल करू या आणि घटनात्मक मूल्यांना बळकटी देऊया. तसेच, राष्ट्राच्या प्रगतीसाठी आपल्या महिला शक्तीला सक्षम करूया. ▮

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# आरोग्यसंपन्न गावाची हाक!

म हाराष्ट्र शासनाने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाचा शुभारंभ करून ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला नवी दिशा देण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालेला हा शुभारंभ आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार तसेच आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची उपस्थिती यामुळे या योजनेचे महत्त्व अधोरेखित होते. परंतु प्रश्न असा आहे की, या घोषणांमुळे खरोखरच ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था सुधारेल का? ग्रामीण महाराष्ट्रात आजही आरोग्य व्यवस्थेचे चित्र चिंताजनक आहे. अनेक दुर्गम भागांत प्राथमिक आरोग्य केंद्रे कागदावर आहेत, पण प्रत्यक्षात डॉक्टर नाहीत, औषधे नाहीत, आणि आवश्यक सुविधा नाहीत. गडचिरोली, चंद्रपूर, नंदुरबार यासारख्या जिल्ह्यांमध्ये तर परिस्थिती अधिक बिकट आहे. अनेक गावांमध्ये आजही रुग्णांना २० ते ३० किलोमीटर अंतर पार करून उपचारासाठी जावे लागते. वेळेत उपचार न मिळाल्यामुळे अनेक निरपराध जीव गमवावे लागतात, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. डॉक्टरांची कमतरता ही ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील सर्वांत मोठी अडचण आहे.

शहरांमध्ये अत्याधुनिक रुग्णालये आणि तज्ज्ञ डॉक्टर सहज उपलब्ध असताना, गावाकडे प्राथमिक आरोग्यसेवाही अपुरी आहे. डॉक्टरांना दुर्गम भागात राहण्याची अनिच्छा, अपुरी पायाभूत सुविधा आणि सुरक्षिततेचे प्रश्न यामुळे ही समस्या अधिक गंभीर बनते. परिणामी, अनेक वेळा अपघात, प्रसूती किंवा गंभीर आजारांमध्ये रुग्णांना वेळेत उपचार मिळत नाहीत आणि मृत्यूचे प्रमाण वाढते. याशिवाय, संसर्गजन्य आजारांचा प्रश्नही ग्रामीण भागात गंभीर आहे. डेंग्यू, मलेरिया, क्षयरोग यासारखे आजार आजही मोठ्या प्रमाणावर आढळतात. स्वच्छ पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि स्वच्छता या मूलभूत बाबींचा अभाव असल्यामुळे या आजारांना आळा बसत नाही. दुसरीकडे, बदलत्या जीवनशैलीमुळे मधुमेह, रक्तदाब यासारखे असंसर्गजन्य आजारही वाढत आहेत. परंतु त्यासाठी आवश्यक तपासण्या आणि उपचार ग्रामीण भागात सहज उपलब्ध नाहीत. अशा पृष्ठभूमीवर 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हे अभियान निश्चितच स्वागतार्ह आहे. विशेषतः उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपायांवर भर देणे, ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. स्वच्छता, पोषण, शुद्ध पाणी आणि आरोग्य जागरूकता या गोष्टींवर लक्ष केंद्रित केल्यास अनेक आजार टाळता येऊ शकतात. मात्र, केवळ जनजागृती करून चालणार नाही; त्यासाठी ठोस अंमलबजावणी आवश्यक आहे. या योजनेत गावपातळीपासून राज्यस्तरापर्यंत समित्या स्थापन करण्याची तरतूद आहे, तसेच उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना पुरस्कार देण्याची घोषणाही करण्यात आली आहे. पण यापूर्वीही अनेक योजना कागदावरच राहिल्या, हा अनुभव आहे. त्यामुळे यावेळी केवळ घोषणांवर न थांबता, प्रत्यक्ष कामावर भर देणे गरजेचे आहे. सरकारने जर खरोखरच ग्रामीण आरोग्य व्यवस्था सुधारायची असेल, तर डॉक्टरांची भरती आणि त्यांना दुर्गम भागात टिकवून ठेवण्यासाठी विशेष धोरण आखावे लागेल. टेलिमेडिसिनसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शहरातील तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा गावापर्यंत पोहोचवता येईल. तसेच, प्राथमिक आरोग्य केंद्रांना आवश्यक उपकरणे, औषधे आणि प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक आहे. 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' ही योजना केवळ सरकारी उपक्रम न राहता लोकचळवळ बनली, तरच तिचे खरे यश ठरेल. ग्रामपंचायत, स्थानिक संस्था आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग या योजनेला बळ देऊ शकतो. कारण आरोग्य ही केवळ सरकारची जबाबदारी नसून, प्रत्येक नागरिकाचीही आहे. यासोबतच, आरोग्यसेवेत पारदर्शकता आणि जबाबदारी निश्चित करणेही तितकेच गरजेचे आहे. अनेक वेळा निधी मंजूर होतो, योजना आखल्या जातात, पण त्याची अंमलबजावणी कितपत होते, याचा ठोस आढावा घेतला जात नाही. जर प्रत्येक गावात आरोग्य सुविधांचा नियमित आढावा घेऊन जबाबदार अधिकाऱ्यांवर उत्तरदायित्व निश्चित केले, तरच या मोहिमेचा खरा परिणाम दिसून येईल. अन्यथा निधी खर्च होईल, योजना पूर्ण झाल्याचे दाखवले जाईल, पण प्रत्यक्षात परिस्थिती तशीच राहण्याचा धोका कायम आहे. तसेच, ग्रामीण भागातील लोकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे ही देखील मोठी जबाबदारी आहे. अनेक वेळा अंधश्रद्धा, गैरसमज आणि पारंपरिक पद्धतींवर अवलंबून राहण्यामुळे लोक वेळेत उपचार घेत नाहीत. त्यामुळे सरकारी यंत्रणेसोबत स्वयंसेवी संस्था, आरोग्य कार्यकर्ते आणि स्थानिक नेत्यांनी एकत्रितपणे काम करून आरोग्य शिक्षणावर भर देणे आवश्यक आहे. जेव्हा नागरिक स्वत: आपल्या आरोग्याबाबत सजग होतील, तेव्हाच आरोग्यसंपन्न गाव ही संकल्पना प्रत्यक्षात उतरेल. ▮

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

# भाजपाचा ४६ वर्षांचा गौरवशाली प्रवास

**श्यामकांत जहागीरदार**

भा जपाचा ४६ वा स्थापना दिन समारंभ ६ एप्रिलला देशभर मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भाजपाचा गेल्या ४६ वर्षांचा हा प्रवास मोठा लक्षवेधी, उल्लेखनीय आणि अतिशय अभिमानास्पद असा आहे. २०१४ पासून सलग तीन लोकसभा निवडणुका भाजपाने जिंकल्या आहेत, देशातील २१ राज्यांत आज भाजपाची वा भाजपा आघाडीची सरकारे आहेत. भारतीय जनता पक्ष हा देशातीलच नाही तर जगातील सर्वांत मोठा राजकीय पक्ष झाला आहे, देशातील सर्वांत श्रीमंत राजकीय पक्ष म्हणूनही भाजप ओळखला जातो. भाजपाची सुरुवात ही जनसंघापासून झाली आहे. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि पंडित दीनदयाल उपाध्याय हे जनसंघाचे संस्थापक नेते होते. भाजपा कार्यालयातील बॅनरवर आजही डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि पं. दीनदयाल उपाध्याय यांची छायाचित्रे आहेत. यावरून आपल्या मूळ पक्षाच्या संस्थापकांबद्दल भाजपला आजही अतिशय आदर असल्याचे तसेच त्यांच्याबद्दल तो कृतज्ञ असल्याचे दिसून येते. १९५१ मध्ये भारतीय जनसंघाची स्थापना झाली, १९७७ मध्ये तत्कालीन राजकीय गरज म्हणून जनसंघ जनता पक्षात विलीन करण्यात आला. मात्र नंतर वैचारिक मतभेदांमुळे जनता पक्षातून बाहेर पडत जुन्या जनसंघाच्या लोकांनी भारतीय जनता पक्षाची स्थापना केली. जनसंघापासून सुरू झालेला या पक्षाचा राजकीय प्रवास व्हाया जनता पक्ष भाजपपर्यंत पोहोचला आहे. हा प्रवास सोपा नव्हता, तर अतिशय कष्टाचा, संकटाचा आणि हालअपेष्टांचा होता.

१९८० मध्ये भाजपाच्या स्थापनेच्या वेळी पक्षाने गांधीवादी समाजवाद ही मुख्य विचारधारा स्वीकारली होती, त्यानंतर १९८५ मध्ये पंडित दीनदयाल उपाध्याय यांचा एकात्म मानववादाचा मार्ग भाजपाने पत्करला, जो आजपर्यंत कायम आहे. जनसंघाच्या वेळेला दिवा हे पक्षाचे निवडणूक चिन्ह होते, पण तेव्हा हा दिवा पूर्ण क्षमतेने कधी पेटलाच नाही आणि पेटला तर दीर्घकाळ टिकला नाही. मात्र भाजपाच्या स्थापनेनंतर पक्षाने कमळ हे निवडणूक चिन्ह घेतले, कमळ मात्र देशभर अतिशय जोमाने फुलले. कमळाचा उगम हा चिखलातून होत असतो, भाजपाचे कमळ हे असेच चिखलातून फुलले.

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भाजपाला २०१४ नंतर सोन्याचे दिवस आले, पण भाजपाच्या आजवरच्या राजकीय प्रवासात अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवाणी यांचे योगदान अनन्यसाधारण म्हणावे लागेल. १९८० पासून २०१४ पर्यंत वाजपेयी आणि अडवाणी हे भाजपाचे देशभरातील लोकप्रिय चेहरा होते. भाजपाच्या या प्रवासात डॉ. मुरलीमनोहर जोशी, कुशाभाऊ ठाकरे, जन कृष्णमूर्ती, व्यंकय्या नायडू, राजनाथसिंह, नितीन गडकरी, अमित शाह, जे. पी. नड्डा यांचे योगदान तेवढेच महत्त्वाचे आहे. सध्या बिहारचे दमदार नितीन नवीन हे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे आणि भाजपाचे वय सारखेच आहे. दोघेही समवयीन आहेत. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर १९८४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला फक्त २ जागा मिळाल्या होत्या, ए. के. पटेल गुजरातमधून तर जंगा रेड्डी आंध्रप्रदेशच्या हनमकोंडामधून विजयी झाले होते. अटलबिहारी वाजपेयी आणि भाजपच्या अन्य सर्व प्रमुख नेत्यांचा तेव्हा पराभव झाला होता. त्यानंतर ४० वर्षांनी म्हणजे २०१४ मध्ये भाजपाने स्वळावर पहिल्यांदा स्पष्ट बहुमत मिळवले. अटलबिहारी वाजपेयी हे १९९६, १९९८ आणि १९९९ असे तीनदा देशाचे पंतप्रधान झाले, पहिल्यांदा ते १३ दिवसांसाठी, दुसऱ्यांदा १३ महिन्यांसाठी तर तिसऱ्यांदा पाच वर्षांसाठी पंतप्रधान होते. पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणारे वाजपेयी दे देशातील पहिले गैरकाँग्रेसी पंतप्रधान होते. नरेंद्र मोदी यांनी २०२४ मध्ये तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. आतापर्यंत दोन वेळा त्यांनी पंतप्रधान म्हणून पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला. पंतप्रधान म्हणून पाच वर्षांचा तिसरा कार्यकाळही ते पूर्ण करतील, असा देशातील लोकांचा विश्वास आहे.

देशातील २१ राज्यांत आज भाजपाची आणि भाजपा आघाडीची सरकारे आहेत. देशात सर्वाधिक म्हणजे ३१ वर्षांपासून गुजरातमध्ये भाजपाचे सरकार आहे. केशुभाई पटेल हे गुजरातमधील भाजपाचे पहिले मुख्यमंत्री होते. सुरेश मेहता, शंकरसिंह वाघेला आणि दिलीप पारेख हे भाजपाचे नंतरचे मुख्यमंत्री होते. १९९८ मध्ये केशुभाई पटेल दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. २००१ मध्ये नरेंद्र मोदी पहिल्यांदा गुजरातचे मुख्यमंत्री झाले, त्यानंतर सलग चारवेळा त्यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. काही दिवसांपूर्वी मोदी यांनी सरकारप्रमुख म्हणून सर्वाधिक काळ सत्तेवर राहण्याचा अरुणाचल प्रदेशचे माजी मुख्यमंत्री पवनकुमार चामलिंग यांचा ८९३० दिवसांचा विक्रम मोडला.

गुजरातनंतर मध्यप्रदेशात मधला काही अपवाद वगळता भाजपा २००३ पासून २० वर्षांपेक्षा जास्त काळापासून सत्तेत आहे. हरयाणातही भाजपाने सत्तेवर येण्याची हॅट्‌ट्रिक केली आहे. २०२७ मध्ये भाजपा उत्तरप्रदेशातही योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वात सत्तेवर येण्याची हॅट्‌ट्रिक करेल, यात शंका नाही. गोवा, दिल्ली, त्रिपुरा, आसाम, ओडिशा, हरयाणा, गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, छत्तीसगड, उत्तराखंड या राज्यांत भाजपाचे मुख्यमंत्री आहेत. बिहार, सिक्कीम, मेघालय, नागालॅण्ड. मिझोराम, मणिपूर, आंध्रप्रदेश आणि अरुणाल प्रदेश या राज्यांत भाजपाच्या मित्रपक्षांचे मुख्यमंत्री आहेत. बिहारमध्ये आता भाजपाचा मुख्यमंत्री शपथ घेण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाचे २४० सदस्य निवडून आले होते. २०१९ मध्ये भाजपाचे ३०३ तर २०१४ मध्ये २८२ खासदार निवडून आले होते. रालोआतील मित्रपक्ष मिळून सध्या लोकसभेत भाजपाचे संख्याबळ २९५ आहे. राज्यसभेतही भाजपाने खासदारांचे शतक पूर्ण केले असून तेथे १०३ खासदार आहेत. रालोआतील मित्रपक्ष पकडून भाजपा खासदारांची संख्या १३३ वर जाते. देशभरातील सर्व राज्य विधानसभांतील आमदारांची संख्या ४०३३ आहे, यात भाजपाचे सर्वाधिक म्हणजे १६५४ आमदार आहेत. २०१४ मध्ये देशभरातील भाजपा आमदारांची संख्या १०३५ होती, २०२५ मध्ये १६५४ झाली. २०१४ नंतर २०१५ चा अपवाद वगळता देभरातील भाजपा आमदारांच्या संख्येत दरवर्षी वाढच झाली आहे. पाच राज्यांतील विधानसभा निवडणुका आटोपल्यावर ही संख्या आणखी वाढेल, यात शंका नाही. देशातील सर्वांत वयस्कर पक्ष असलेली काँग्रेस शेवटचे आचके देत असताना ४६ वर्षांच्या तरुण भाजपाचा हा प्रवास नेत्रदीपक आणि सर्वांच्या दृष्टीने अभिमानास्पद असाच म्हणावा लागेल. ▮

९८८१७१७८१७

### सुंभ जळाला तरी काँग्रेसचा पीळ जाईना!

राजकारणात वैचारिक मतभेद असणे स्वाभाविक आहे, परंतु सध्याच्या काळात काँग्रेस पक्षाच्या नेत्यांकडून ज्या प्रकारे वैयक्तिक आणि खालच्या पातळीवर जाऊन टीका केली जात आहे, त्यावरून विनाशकाले विपरीत बुद्धी या म्हणीची प्रचीती येत आहे.



काँग्रेसचे प्रवक्ते पवन खेडा यांचे ताजे उदाहरण या राजकीय घसरणीचा पुरावाच आहे.

आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिस्वा सरमा यांच्या पत्नीवर पवन खेडा यांनी केलेले आरोप ज्यामध्ये यूएई, एन्टिग्वा आणि बार्बुडा अशा तीन देशांचे पासपोर्ट असल्याचा दावा करण्यात आला होता, हे पूर्णपणे बिनबुडाचे असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. विधानसभा निवडणुकीच्या काळात केवळ मुख्यमंत्र्यांची प्रतिमा मलिन करण्यासाठी अशा प्रकारची विधाने करणे ही काँग्रेसची जुनी खोड झाली आहे. मात्र, सरमा यांनी या आरोपांना चोख प्रत्युत्तर देत मानहानीचा गुन्हा दाखल केल्यामुळे आता काँग्रेसची चांगलीच भंबेरी उडाली आहे. मी अटकेला घाबरत नाही अशी मोठी विधाने करणाऱ्या पवन खेडा यांची खरी परीक्षा जेव्हा आली, तेव्हा ते चौकशीला सामोरे जाण्याऐवजी पळ काढताना दिसले. आसाम पोलिस जेव्हा दिल्लीत त्यांच्या घरी पोहोचले, तेव्हा ते काँग्रेसशासित तेलंगणा राज्यात आश्रयाला गेल्याचे समजले. यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या वडिलांबाबत अपमानास्पद विधान करतानाही त्यांनी अटकेच्या भीतीने आधीच वकिलांची फौज न्यायालयात उभी केली होती. यावरून हे स्पष्ट होते की, काँग्रेस नेत्यांकडे केवळ गरळ ओकण्याचे धाडस आहे, पण परिणामांना सामोरे जाण्याची हिंमत नाही. आज काँग्रेस पक्षाची अवस्था अत्यंत दयनीय आहे. अशा वेळी संघटनेला बळकटी देण्याऐवजी राहुल गांधींपासून ते प्रवक्त्यांपर्यंत सर्वजण केवळ वादात राहण्यासाठी विधाने करण्यात मश्गूल आहेत. हेमंत बिस्वा सरमा यांनी ज्या आक्रमकतेने कायदेशीर कारवाई केली आहे, त्याने काँग्रेस नेत्यांची बोलती बंद झाली आहे. मराठीत एक म्हण आहे, ''सुंभ जळाला तरी पीळ जात नाही.'' काँग्रेसच्या बाबतीत नेमके हेच घडताना दिसत आहे.

**अविनाश देशपांडे**/पुणे ९४२२९५०७५०

## वाचक पत्रे

### पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे हिमनद्या धोक्यात

हिमालयीन क्षेत्रातील हिमनद्या अत्यंत वेगाने वितळत असून २००० पासून बर्फ वितळण्याचा वेग दुप्पट झाला आहे. १९९० ते २०२० या काळात हिमालय पर्वतातील हिमनद्यांनी आपल्या क्षेत्राचा बारा टक्के भाग गमावल्याची धक्कादायक माहिती अलिकडेच एका आंतरराष्ट्रीय अहवालातून स्पष्ट झाली आहे. अलिकडेच नेपाळची राजधानी काठमांडू येथे जागतिक हिमनदी दिनाचे औचित्य साधून हिमनदी वितळण्याच्या वाढत्या धोक्याचा इशारा देणारे हे अहवाल प्रकाशित करण्यात आले. यातील प्रमुख अहवालानुसार १९७५ पासून आतापर्यंत हिमनद्यांच्या बर्फाची जाडी २७ मीटरपर्यंत कमी झाली असे म्हटले गेले. वेगाने बदलणाऱ्या बर्फाच्छादित प्रदेशाचे परिणाम कमी करण्यासाठी हिमनद्यांच्या निरीक्षणात मोठी वाढ करणे याशिवाय इतर उपायांची चर्चा केली गेली. हिमनद्या वितळण्याचा धोका केवळ भारतालाच नसून हिमालयाच्या कुशीत वसलेल्या नेपाळ, भूतान यासारख्या देशांनाही आहे. त्याचबरोबर पाकिस्तान, बांगलादेश यांच्यामध्ये हिमनद्यांचे पाणी वाहत जाते. त्यांनाही संभाव्य धोका असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. सिंधू, गंगा आणि ब्रह्मपुत्र या नद्यांच्या खोऱ्यांमधील हिमनद्या सर्वाधिक असुरक्षित असल्याचे स्पष्ट होत आहे. या नद्यांवरील संकट संपूर्ण आशिया खंडासाठी मोठे संकट ठरू शकते, असा इशाराही या अहवालांमध्ये देण्यात आला आहे. या नद्या कोट्यवधी लोकांच्या अन्न, पाणी, ऊर्जा आणि उपजीविकेचा आधार आहेत. आशियातील किमान दहा प्रमुख नद्यांचे उगमस्थान हिमालयातच आहे. वाढत्या पर्यावरण ऱ्हासाचा हिमनद्यांवर मोठा परिणाम होत आहे. त्यामुळेच नैसर्गिक संकटांच्या मालिका या भागातील जनतेवर ओढवत आहेत. त्यातून जीवित आणि वित्तहानी मोठ्या प्रमाणात वाढताना दिसते. त्यामुळेच हवामान अनुकूल नियोजनासाठी मोठी गुंतवणूक करणेदेखील आता काळाची गरज आहे.



**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/





# बोधिवृक्ष संस्थेची उत्सव समिती जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बोधीवृक्ष सामाजिक संस्थेच्या वतीने नूतन उत्सव समिती पदाधिकाऱ्यांची निवड व नियोजन बैठक पार पडली.

संस्थेचे मार्गदर्शक दत्तात्रय बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. बैठकीमध्ये उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सुरज गायकवाड यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्ष म्हणून अंबादास पेंटा, सचिवपदी दीपक चव्हाण, सहसचिवपदी शिवराज कांबळे तर खजिनदारपदी आदित्य आठवले यांची निवड करण्यात आली. यावेळी नगरसेवक सत्यजित वाघमोडे, ॲड. लौकिक इंगळे, सोनू दुपारगुडे, बापू मस्के, प्रकाश दिलपाके, शशिकांत पुरंदरे, सिध्दलिंग विजापूर, विकी ठेंगल, राज बनसोडे उपस्थित होते. आभार संस्थेचे संस्थापक ॲड. आकाश इंगळे यांनी मानले.

# भारत देश स्थिर आणि मजबूत राहील

## खर्गेमहाराज शिवपुजे यांची भाकणूक

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ८ एप्रिल-**

आंतर राष्ट्रीय युद्धजन्य परिस्थितीमुळे भारतावर कुठलाही परिणाम होणार नाही उलट याचा फायदा घेऊन भारतावर दबाव ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचे मनसुबे उधळून लावले जातील आणि या दबावाला झुगारून लावत भारत देश एक स्थिर आणि मजबूत कार्यरत राहील . जे त्रास देत होते त्यांना उचलून बाजूला फेकले जाईल अशी भाकणूक श्रीक्षेत्र वडवळ (ता. मोहोळ) येथील श्री नागनाथ महाराजांच्या यात्रेत खर्गाच्या दिवशी मुख्य मानकरी खर्गेमहाराज पोपटबुवा शिवपुजे यांनी वर्तविली.

भक्तिमय वातावरणात श्रीक्षेत्र वडवळ येथील श्री नागनाथ महाराजांच्या यात्रेस गुरुवारी २ एप्रिल रोजी तैलाभिषेकाने सुरुवात झाली असून रविवारी ५ रोजी श्रीक्षेत्र मोहोळ येथून श्रींची पालखी श्रीक्षेत्र वडवळ येथे रात्री १२ वा.आल्यानंतर सोमवार दि.६ रोजी पहाटे खर्गतीर्थावर गुरुशिष्य भेट झाली. हा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी हजारों भाविक उपस्थित होते.मोहोळ तालुक्यातील श्री क्षेत्र वडवळ येथील श्री नागनाथ महाराजांच्या यात्रेत दि.६ एप्रिल रोजी पहाटे चार वाजता खर्गाची मिरवणूक निघाली. टाळ अभंगाच्या गजरात खर्गतीर्थावर गुरु -शिष्य भेट झाली. सोलापूर जिल्ह्यासह महाराष्ट्रातील भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या श्री नागनाथ महाराजांच्या यात्रेत पहाटे चार वाजता खर्गे महाराज पोपटबुवा शिवपुजे यांच्याअंगात वायु रूपाने श्री नागनाथांचा संचार होवून पालखीसह सवाद्य साकी व अभंग म्हणत जयघोष करित मिरवणूक निघाली.



प्रत्येक भाविकांना वायु रूपाने संचार झालेली खर्गाची मिरवणूक व खर्गतीर्थ भेटीचा सोहळा पाहण्याची ओढ असते. श्री नागनाथांचे मुख्य मानकरी खर्गे महाराज व परमशिष्य हेग्रसाचे वंशज अरूणबुवा मोहोळकर (काका) या गुरु शिष्य भेटीचा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी गर्दी भाविकांनी केली होती. खर्गे महाराजांनी पाऊस काळाची भाकणूक वर्तवताना यंदाच्या वर्षी पाऊसकाळ व चारा समाधानकारक असेल, रोगराई होवून काही प्रमाणात जीवीतहानी होईल अशी भाकणूक वर्तवली.पालखीसह निघालेली खर्गाची मिरवणुक मंदिरात पोहचल्यानंतर महाआरती झाली. त्यानंतर प्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी नागनाथ देवस्थान पंचकमिटीतील सदस्य, यात्रा कमिटी,सर्व जाती धर्मातील मानकरी, सेवेकरी, नागेश भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंदिराच्या मुख्य दिल्ली दरवाजामध्ये खर्गे महाराजांच्या संचार अवतारातील सांकेतिक खुणा वरून देशातील राजकीय परिस्थितीवरचीभाकणूक वर्तविण्यात झाली.

# शिवसेना जिल्हाप्रमुखपदी केंगनाळकर, चव्हाण

## महानगरप्रमुखपदी महेश धाराशिवकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या जिल्हाप्रमुखपदी प्रताप चव्हाण (सोलापूर शहर उत्तर आणि सोलापूर शहर मध्य विधानसभा) आणि शरणराज केंगनाळकर (दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट विधानसभा) यांची निवड करण्यात आली तसेच सोलापूर महानगर प्रमुखपदी महेश धाराशिवकर यांची निवड करण्यात आली.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार सोलापूर जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. याबाबतची माहिती शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयातून प्रसिद्धी देण्यात आलेल्या पत्रकाद्वारे कळवण्यात आली आहे. निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, सोलापूरच्या संपर्कप्रमुख सुषमा अंधारे यांनी अभिनंदन केले तसेच या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

**नूतन पदाधिकारी असे**

जिल्हाप्रमुख -धनंजय डिकोळे (माढा, करमाळा), संभाजी शिंदे (सांगोला, पंढरपूर - मंगळवेढा), प्रवीण काकडे (बार्शी, मोहोळ, माळशिरस). लोकसभा प्रमुख - संजय पौळ (सोलापूर लोकसभा), हुकुम चंद राठोड (माढा लोकसभा), सोलापूर महिला संघटिका - मंगल थोरात.



# वारकरी मंडळातर्फे 'ज्ञानेश्वरी' देऊन जि.प.उपाध्यक्ष पवारांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

अखिल भाविक वारकरी मंडळाच्या वतीने सोलापूर जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य तसेच उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांचा नुकत्याच झालेल्या निवडीबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी मान्यवरांना 'ज्ञानेश्वरी' ग्रंथ भेट देऊन सन्मानित करण्यात आले.याप्रसंगी वारकरी संप्रदायातील विविध धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांबाबत सखोल चर्चा करण्यात आली. विशेषतः माघवारी पालखी सोहळा, आषाढी वारी तसेच वारकरी परंपरेशी निगडित इतर विषय मार्गी लावण्यासाठी सहकार्य करण्याबाबत संवाद झाला.

या सन्मानामुळे धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा जपण्यासाठी जिल्हा परिषद व वारकरी मंडळ यांच्यातील समन्वय अधिक दृढ होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.यावेळी अखिल भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुधाकर इंगळे महाराज, राष्ट्रीय सचिव बळीराम जांभळे, प्रदेश अध्यक्ष जोतिराम चांगभले, शहर अध्यक्ष संजय पवार यांच्यासह अजिंक्य मोरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.



**सोलापूर : नूतन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांची बुधवारी महापौर विनायक कोंड्याल यांनी भेट घेऊन त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. त्यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी सभागृह नेते नरेंद्र काळे उपस्थित होते.**



# ओंकार भजनी मंडळांचा भावगीतांचा जल्लोष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

श्री दिगंबर मुनीनाथ महाराज यांच्या ५० व्या पुण्यतिथी महोत्सवात ओंकार भजनी मंडळांनी केला भावगीतांचा जल्लोष केला. पुण्यतिथी महोत्सवानिमित्त चौथ्या दिवशी हरिसागर कार्यक्रम ओंकार भजनी मंडळांनी सादर केला.

रात्री १० ते १२ वाजेपर्यंत चाललेल्या हरिजागर कार्यक्रमात तेलगू मराठी, हिंदी, कन्नडा अशा सर्व भाषेत गवळण, आध्यात्मिक भावगीत, प्रबोधन गीत, अंधश्रद्धा निर्मूलन गीत,अशा विविध गीताने हरिनामाचा गजर व जयघोष केला. तत्पूर्वी पहाटे ५ ते सकाळी ९ वाजेपर्यंत हरीजागर, काकड आरती, हरिपाठ, हरी किर्तन, हरी पारायण, ज्ञानेश्वरी पारायण आदी कार्यक्रम करण्यात आले. रात्री ७ ते ९ वाजेपर्यंत अशोक चिट्याल महाराजांचे श्रीमद भागवत या विषयावर तेलगू प्रवचन सायंकाळी ६ वाजता महाराजांचे महारथी व महापूजा रात्री १० ते १२ पर्यंत हरिजागर कार्यक्रमाने सांगता झाले. या कार्यक्रमास आनंद गुजर, विठ्ठल वल्लमदेशी, मारुती जिंदम, नर्सिंग बिलकुल, मोहन कुरा पाटी, विष्णु कारमपुरी, श्रीनिवास कुसुरकर, श्रीनिवास चिलवेरी, नागनाथ कारमपुरी,नागार्जुन कुसुरकर, श्रीकांत कुसुरकर, मुनीनाथ कारमपुरी, विक्रम कारमपुरी, विशाल चिलवेरी, प्रशांत जक्का, बालाजी कोटा, नर्सिंग कारमपुरी, पवित्रा कारमपुरी, प्रियंका कुसुरकर, सुनंदा कुसुरकर, अनुसुर्या कारमपुरी, सुनीता कारमपुरी, कलावती कुसुरकर, जयश्री कुसुरकर आदींची उपस्थिती होती.

# पालकमंत्र्यांना दिले भीमजयंती मिरवणुकीचे निमंत्रण

**● बोधिसत्व डॉ. आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळातर्फे महापौरांचा सत्कार ●**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्ताने निघणाऱ्या मिरवणुकीचे निमंत्रण बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने पालकमंत्री जयकुमार गोरे यांना देण्यात आले. संविधान भवनसाठी एक कोटी निधी तरतूद केल्याबद्दल महापौर विनायक कोंड्याल यांचा भीमसैनिकांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने संविधान भवनासाठी १ कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याबद्दल महापौर विनायक कोंड्याल यांचा सत्कार करण्यात आला. मध्यवर्ती महामंडळाचे विश्वस्त अध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी उत्सव अध्यक्ष नागेश इंगळे, सचिव रॉकी बंगाळे, उपाध्यक्ष मिलिंद प्रक्षाळे, चाचा सोनवणे, अमोल कदम, संतोष घोलप उपस्थित होते.

महापौर कोंड्याल यांना विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणुकी संदर्भात विविध उपाययोजना करण्याबाबत निवेदन देण्यात आले.

मिरवणूक मार्गावरील स्वच्छता, झाडंच्या फांद्या छाटणी करणे, पाणीपुरवठा, प्रकाशयोजना, वाहतूक व्यवस्थापन तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती सर्व व्यवस्था करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. संविधान भवनासाठी मंजूर करण्यात आलेला निधी हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अभिवादन असून, शहरातील नागरिकांसाठी हा एक प्रेरणादायी उपक्रम ठरेल, असे महापौर कोंड्याल यांनी सांगितले. मिरवणुकीसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा महापालिकेच्या वतीने उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

# "विश्वशांतीचा महामार्ग; णमोकार मंत्राच्या स्पंदनातून सकारात्मकतेचा प्रकाश"

**आजचे जग वेगाने बदलत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान आणि आधुनिकतेच्या शिखरावर पोहोचलेला मानव आजही मन:शांतीसाठी भटकताना दिसतो. युद्ध, हिंसा, असहिष्णुता आणि अस्थिरतेने जग व्यापले आहे. अशा परिस्थितीत संपूर्ण मानवजातीला शांती, सद्भावना आणि सकारात्मक ऊर्जा देणारा एकच मंत्र आहे ''णमोकार महामंत्र'.**

दरवर्षी ९ एप्रिल रोजी विश्व णमोकार महामंत्र दिवस मोठ्या श्रद्धेने साजरा केला जातो. या दिवशी संपूर्ण देशात आणि जगभरात लाखो लोक एकत्र येऊन णमोकार मंत्राचे पठण करतात. हा दिवस केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, तो मानवतेच्या एकतेचा, शांततेचा आणि आत्मशुद्धीचा संदेश देणारा पवित्र दिवस आहे. णमोकार मंत्र हा जैन धर्मातील सर्वात प्राचीन आणि पवित्र मंत्र मानला जातो. या मंत्रात कोणत्याही देवतेचे नाव नसून, तो सर्व महान आत्म्यांना वंदन करणारा सार्वत्रिक मंत्र आहे.

**मंत्र :**

**णमो अरिहंताणं**
**णमो सिद्धाणं**
**णमो आयरियाणं**
**णमो उवज्झायाणं**
**णमो लोए सव्व साहूणं**

**अरिहंतांना नमस्कार**
**सिद्धांना नमस्कार**
**आचार्यांना नमस्कार**
**उपाध्यायांना नमस्कार**
**सर्व साधूंना नमस्कार**

हा मंत्र आपल्याला नम्रता, आदर आणि आत्मविकासाचा मार्ग शिकवतो. या मंत्राच्या शेवटी एक महत्त्वपूर्ण श्लोक आहे:
**एषो पंच नमोकारो, सव्व पावप्पणासणो।**
**मंगलाणंच सव्वेसिं, पडमं हवई मंगलं।।**
त्याचा अर्थ हे पंच नमस्कार सर्व पापांचा नाश करणारे आहेत आणि सर्व मंगलांमध्ये श्रेष्ठ मंगल आहेत.

**विश्व णमोकार महामंत्र दिवसाचे महत्त्व**

९ एप्रिल हा दिवस केवळ धार्मिक परंपरेचा भाग नसून, तो एक जागतिक चळवळ बनत आहे. या दिवशी लाखो लोक एकत्र येऊन णमोकार मंत्राचा जप करतात. आजच्या काळात जेव्हा जग युद्धाच्या छायेत




आहे. जसे की विविध देशांतील संघर्ष, दहशतवाद आणि सामाजिक तणाव तेव्हा हा मंत्र शांततेचा मार्ग दाखवतो. सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. णमोकार मंत्राच्या जपामुळे मन शांत होते, नकारात्मक विचार दूर होतात आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होते.

हा मंत्र कोणत्याही एका धर्मापुरता मर्यादित नाही. तो सर्व मानवजातीसाठी आहे. त्यामुळे तो जागतिक बंधुभाव वाढवतो. आजच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक ताण वाढला आहे. णमोकार मंत्र मनाला स्थिरता आणि समाधान देतो. आजच्या जगात हिंसा आणि अस्थिरता वाढली आहे. अशा वेळी णमोकार मंत्र हा एक आध्यात्मिक उपाय ठरतो. जगभरात अनेक देश युद्धाच्या विळख्यात अडकले आहेत.

**अहिंसेचा मार्ग दाखवतो**

भगवान महावीरांनी सांगितलेले तत्त्व:''अहिंसा परमो धर्म:'' हे तत्त्व णमोकार मंत्राच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे रुजते. आजचा माणूस भौतिक सुखांच्या मागे धावत असताना मानसिक शांती हरवून बसला आहे. णमोकार मंत्राच्या जपामुळे मन शांत होते आणि आत्मिक समाधान मिळते. मत्सर, द्वेष, राग या भावना समाजात वाढत आहेत. णमोकार मंत्र या भावनांवर नियंत्रण ठेवण्यास मदत करतो.

अनेक लोकांनी णमोकार मंत्राच्या नियमित जपामुळे आपल्या जीवनात सकारात्मक बदल अनुभवले आहेत. तणावग्रस्त व्यक्ती शांत आणि संयमी बनतात. सामाजिक एकता गावागावांत, शहरांमध्ये णमोकार मंत्राच्या सामूहिक जपामुळे समाजात एकता आणि प्रेम वाढते. वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहता, मंत्रजपामुळे मेंदूवर सकारात्मक परिणाम होतो. ध्यान आणि जप यामुळे मानसिक आरोग्य सुधारते. णमोकार मंत्र हा केवळ शब्दांचा समूह नाही, तर तो एक ऊर्जा आहे. या मंत्राच्या जपामुळे संपूर्ण वातावरण शुद्ध होते. आज जगाला शस्त्रांची नाही, तर शांतीची गरज आहे. णमोकार मंत्र हा त्या शांतीचा मार्ग आहे. ''शांतिः शांतिः शांतिः'' हा वैदिक संदेश णमोकार मंत्राच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे अनुभवता येतो.

९ एप्रिलचा विश्व णमोकार महामंत्र दिवस हा प्रत्येकासाठी एक संधी आहे स्वतःला ओळखण्याची, मन शांत करण्याची आणि जगासाठी सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्याची. आजच्या अशांत जगात णमोकार मंत्र हा आशेचा किरण आहे. जर प्रत्येकाने हा मंत्र आपल्या जीवनात स्वीकारला, तर जग नक्कीच शांत, सुंदर आणि समृद्ध बनेल. चला, ९ एप्रिल रोजी आपण सर्वजण एकत्र येऊन णमोकार मंत्राचा जप करूया आणि विश्वशांतीसाठी आपला हातभार लावूया.

**-प्रा. अजित देवसाळे**
**मो. ९८५००९२९७५**

# दत्तात्रय मेरगू यांचे निधन



**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

दाजी पेठ येथील रहिवासी व पूर्व भागातील प्रसिद्ध पद्मा रेस्टॉरंटचे मालक दत्तात्रय बालाजी मेरगू (वय ६४) यांचे बुधवार, दि. ८ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सून व नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा गुरुवार, दि. ९ एप्रिल रोजी सकाळी ९:३० वाजता राहत्या घरा पासून निघणार आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि || व सब डि || सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी महानगरपालिका हद्दवाढ मधील कसबे सोलापूर येथील पुणे गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळ पुणे यांचे मार्फत जुळे सोलापूर भाग-२ हैदराबाद रोड येथील विडी घरकुल ग्रुप जी मधील गाळा क्र. १४३७ यांसी सोडत नं. २१०६ अर्ज क्र. ३८१९ असे असून यांसी एकूण क्षेत्र ५५० चौ. फुट इतकी असून यांसी चतु:सिमा :- पुर्वेस - ६.०० मी. रुंदीचा रस्ता, पश्चिमेस - गाळा नं. १४३६, दक्षिणेस - ६.०० मी. रुंदीचा रस्ता, उत्तरेस - गाळा नं. १४३८ येणेप्रमाणे गाळा मिळकत ही **यशोदाबाई पेंटप्पा भंडारी** यांना मिळालेली असून त्यानुसार त्यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीची होती, सदरची मिळकत यशोदाबाई पेंटप्पा भंडारी यांनी विक्रीस काढण्याचे ठरवून त्यानुसार आमचे अशिलांकडून मोबदला स्विकारुन मिळकत विक्री केली होती. दि. १७/११/२००० रोजी यशोदाबाई पेंटप्पा भंडारी यांनी आमचे अशिलाच्या हक्कात खरेदीपावती लिहून दिलेले आहे.

त्यानुसार सदरहू खरेदीपावती प्रमाणे आमचे अशिल हे पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ सोलापूर येथिल दप्तरी आमच्या अशिलाच्या नावाची नोंद होणेकरीता म्हणून रितसर अर्ज दाखल करणार आहेत. तरी सदर घरकुल मिळकतीबाबत कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, दान, लिज, टाच, गहाण, जप्ती, बोजा, इसारापावती साठेखत, खरेदीखत, कब्जापावती, पोटगी, करार, मदार, इत्यादी प्रकारचे हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत कागदोपत्री. पुराव्यानिशी लेखीस्वरुपात खालील पत्यावर तसेच पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ सोलापूर यांच्या कार्यालयाकडे हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही, कसलीही हरकत/तक्रार न आल्यास सदरहू घरकूल मिळकत हि निर्वेध, निजोखीम आहे असे समजून पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ सोलापूर हे त्यांचे दप्तरी आमचे अशिलाच्या नावाची नोंद करतील. तद्नंतर येणाऱ्या हरकती चालणार नाहीत. कोणाचीही कसलीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहिर नोटीस देत आहे, याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली दि. ०८/०४/२०२६.

सही/-
**श्री. अश्विन एस. कोंगारी**
**बी.कॉम., एलएल.बी.**
**पत्ता - प्लॉट नं. २३, नवनाथ नगर, आकाशवाणी केंद्र रोड, सोलापूर**
**मो.नं. ९८९०५०३२८१**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## चौकशीची जाहीर नोटीस

**चौ.अ.क्र.** : मु.सा.वि.व्य.अ. १९५० चे कलम ५० (अ) (१) अन्वये ९०७/२०२५
**संस्थेचे नाव** : श्री सिध्दीविनायक सेवा मंडळ, आदर्शनगर, भगतसिंग मार्केटजवळ, सोलापूर.
**न्यास नोंदणी क्रमांक** : ई-४५७/सोलापूर.
**अर्जदार** - १. रविकुमार सदाशिव यलगुलवार
२. लक्ष्मीकांत अनंतराव गवई

सदरील अर्ज अर्जदार यांनी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ५०(अ)(१) प्रमाणे संस्थेस स्किम करून मिळणेबाबत अर्ज सादर केलेला असून त्यामध्ये न्यासाचे व्यवस्थापन सुरळीत चालण्याकरिता न्यासास स्किम तयार करण्यात आलेली आहे. या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, या न्यासाचे आपले काही संबंध असल्यास अथवा काही हरकत/तक्रार नोंद करावयाची असल्यास आपण स्वतः किंवा वकीलांमार्फत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत आपली हरकत लेखी स्वरूपात दाखल करावी. ३० दिवसाचे नंतर आपले कुठलेही प्रकारच्या हरकतीचा व कुठल्याही बाबींचा विचार केला जाणार नाही आणि एकतर्फी हुकुम करून सदरचे प्रकरण निकाली काढण्यात येईल.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उपआयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर यांचे शिक्यानिशी आज दिनांक ०७/०४/२०२६ रोजी दिली.

शिक्का

**सही/-**
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**सोलापूर विभाग, सोलापूर.**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील लोकांना आमच्या अशिलानी दिलेल्या माहिती व कागदपत्रावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि।। व सब डि।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका ग.व.सु. हद्दीतील पेठ-शास्त्री नगर व झोपडपट्टी या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील झोपडी घर नं. १७९ अ ही मिळकत घरजागा आमचे अशिल अखलाखअहमद महिबुब पटेल यांचे मयत वडील पै. महिबुब दर्वेशअली पटेल यांचे नांवावर असून याची नोंद सोलापूर महानगरपालिकेच्या ग.व.सु. विभागाचे कर आकारणी विभागास नोंद आहे. तसेच आमचे अशिलाचे आई पै. जुबेदा महिबुब पटेल यांचेही दि.०१/०४/२०२५ रोजी मृत्यु झालेला आहे. आमचे अशिलांचे आई वडिलांचे मृत्युपश्चात वर नमुद आमचे अशिल मयताचा मुलगा या नात्याने मुख्य वारस आहेत त्यांचे व्यतिरिक्त अन्य वारसांनी सदरची मिळकत आमचे अशिलाचे नांवे होणे विषयी दि. २४/०५/२०२४ रोजी सर्वानुमते संमती दिलेली आहे.

सदरहू घरजागेत आमचे अशिल अखलाखअहमद महिबुब पटेल हे त्यांचे कुटुंबासह कायमस्वरुपी राहणेस आहेत. सदरहू घर नं. १७९ अ शास्त्रीनगर व झोपडपट्टी या मिळकतीवरील आमचे अशिलाचे वडील पै. महिबुब दर्वेशअली पटेल यांचे नांव कमी करुन आमचे अशिल अखलाखअहमद महिबुब पटेल यांचे नांवाची वारस नोंद करणेकामी सो.म.पा.चे कर आकारणी ग.व.सु. विभागाचे दप्तरी वारस नोंद होऊन त्यांचे नांवे कर पावती मिळावे याकरिता आमचे अशिल म.न.पा. कडे अर्ज दाखल करणार आहेत.

तरी सदरहू घरजागेवर आमचे अशिला व्यतिरिक्त इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, खरेदीखत अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांचे नांवाची वारस नोंद सो.म.पा.चे कर आकारणी विभाग. ग.व.सु. विभागाचे दप्तरी त्याचे नावाची वारस नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख ०८/०४/२०२६

सही/-
**ॲड. एस.एम. ढेकणे**
**रा. १२६-अे वाणी गल्ली बाळे,**
**ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**मो. ८४५९४२०८०३**




## महत्त्वाचे

### विश्वचषक तिरंदाजी पात्रता; ओजस देवतळे, प्रगतीची छाप



**प्युएब्ला :** मेक्सिकोमधील प्युएब्ला येथे सुरू असलेल्या तिरंदाजी विश्वचषक पहिल्या टप्प्याच्या पात्रता फेरीत नागपूरचा ओजस देवतळे आणि प्रगतीने अनुक्रमे भारतीय पुरुष व महिला गटात अव्वल स्थान पटकावले. एकूण क्रमवारीत देवतळे ७०५ गुणांसह १२ व्या स्थानावर राहिला. प्रगती ६९४ गुणांसह सहाव्या स्थानावर होती. चारही भारतीय पुरुष तिरंदाजांनी ७०० हून अधिक गुणांची नोंद केली.

पात्रता फेरी - कम्पाऊंड तिरंदाजी - वैयक्तिक : पुरुष - ओजस देवतळे (१२ वे, ७०५), अभिषेक वर्मा (१६ वे, ७०२), साहिल जाधव (१८ वे, ७०१), कुशल दलाल (१९ वे, ७००); महिला: प्रगती (सहावी, ६९४), व्ही. ज्योती सुरेखा (१० वी, ६९१), मधुरा धामणगावकर (१५ वी, ६८९), अदिती स्वामी (१७ वी, ६८९); सांघिक: भारत: पुरुष (पहिले, २१०८), महिला (पहिले, २०७४), मिश्र (चौथे, १३९९).

### नेमबाजी विश्वचषक एअर पिस्तूलमध्ये भारताची निराशा

**नवी दिल्ली :** बुधवारी पार पडलेल्या आयएसएसएफ पिस्तूल/रायफल विश्वचषकातील पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूल स्पर्धेत भारतीय नेमबाजांना निराशाजनक कामगिरीचा सामना करावा लागला. जागतिक विक्रमासह मिश्र सांघिक सुवर्णपदक जिंकल्याच्या अवघ्या एका दिवसानंतर, या स्पर्धेतील तिन्ही भारतीय स्पर्धकांना अंतिम फेरीत स्थान मिळवण्यात अपयश आले. मात्र, महिलांच्या २५ मीटर पिस्तूल स्पर्धेत ऑलिम्पियन रिदम सांगवान हिने प्रिसिजन राऊंडमध्ये २९२ (९९, ९६, ९७) गुणांची नोंद करीत पहिल्या दिवसानंतर सहावे स्थान पटकावले; तर दिव्या टी हिनेही २९१ (९६, ९८, ९७) गुणांसह प्रभावी कामगिरी करत आठवे स्थान निश्चित केले. तिसरी भारतीय नेमबाज, सिमरनप्रीत कौर ब्रार हिने २८२ (९३, ९४, ९५) गुणांची नोंद करत ४५वे स्थान मिळवले. स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक गटात सुवर्णपदक जिंकताना जागतिक विक्रम मोडणाऱ्या युवा नेमबाज मुकेश नेलावल्लीला या स्पर्धेत १४ व्या स्थानावर समाधान मानावे लागले. त्याने एकूण ५७९ गुणांची नोंद केली आणि आठ नेमबाजांचा समावेश असलेल्या अंतिम फेरीत प्रवेश मिळवण्यापासून तो बऱ्याच फरकाने वंचित राहिला.

### इक्बाल बांगलादेश क्रिकेटची प्रतिष्ठा सुधारणार

**ढाका :** कथित घोर अनियमितता प्रकरणी बांगलादेश क्रिकेट कार्यकारिणी बरखास्त झाल्यानंतर, मंडळाचे अंतरिम अध्यक्ष तमीम इक्बाल यांनी क्रिकेटमधील देशाची मलिन झालेली प्रतिष्ठ सुधारण्याची शपथ घेतली आहे. बांगलादेशमध्ये क्रिकेट व राजकारण एकमेकांशी जोडलेले आहेत. २०२४ मध्ये झालेल्या उठावानंतर अशांततेमुळे देशाच्या क्रिकेट खेळावर परिणाम झाला आहे. फेब्रुवारीमध्ये नवीन सरकार निवडून आले व मंगळवारी राष्ट्रीय क्रीडा परिषदेने सांगितले की, २०२५ च्या निवडणुकीत 'घोर अनियमितता' आढळल्याने त्यांनी बांगलादेश क्रिकेट मंडळ (बीसीबी) बरखास्त केले आहे.

### धोनीविना चेन्नई कामगिरीत अपयशी

**चेन्नई :** चेन्नई सुपर किंग्जसाठी आयपीएल २०२६ च्या हंगामाची सुरुवात अत्यंत कठीण झाली आहे व परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच बिकट होत असल्याचे दिसत आहे. सलग तीन पराभवांमुळे, पाच वेळा विजेतेपद पटकावणारा हा सीएसके संघ गुणतालिकेत तळाशी अडकून पडला आहे. २००९ पासून सीएसकेचा अविभाज्य भाग राहिलेले मुख्य प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग आता टीकेच्या केंद्रस्थानी आले आहेत. अनेक वर्षांपासून, महेंद्रसिंग धोनीच्या सोबतीने सीएसकेच्या इतिहासातील सर्वात यशस्वी भागीदारींपैकी एकाचा ते भाग राहिले आहेत. या दोघांनी मिळून एक बलाढ्य संघ उभारला व सीएसकेला पाच विजेतेपदे मिळवून देण्यात मोलाचे मार्गदर्शन केले. परंतु, आता धोनी संघाचे नेतृत्व करीत नसल्यामुळे, संघातील उणिवा स्पष्टपणे दिसू लागल्या आहेत व यामुळे सीएसकेच्या यशात धोनीचा वाटा नेमका किती होता, यावर पुन्हा एकदा नव्याने चर्चा सुरू झाली आहे. फ्लेमिंगचे यश हे धोनीच्या कर्णधारपदाशी घट्टपणे जोडलेले आहे व २०२४ मध्ये ऋतुराज गायकवाडने संघाची सूत्रे हाती घेतल्यापासून, हा संघ पूर्वीसारखा प्रभावी वाटत नाही.

## ईडनच्या हिरवळीवर 'ग्रीन'ला गोलंदाजी करण्याची आशा



कॅमेरॉन ग्रीन

◆ **कोलकाता, ८ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट हंगामात गुरुवारी ईडन गार्डन्सवर कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) आणि लखनौ सुपर जायंट्स (एलएसजी) यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. या सामन्यात कॅमेरॉन ग्रीन केकेआरकडून सातत्याने पाठिंबा दिला असला तरी, पावसामुळे रद्द झालेल्या सामन्यात त्याच्या जागी रोव्हमन पॉवेलला संघात स्थान देण्यात आले होते.

या आयपीएल हंगामातील पहिल्या दोन सामन्यांमध्ये मुंबई इंडियन्स व सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध ग्रीनने अजिबात गोलंदाजी केली नव्हती व हे दोन्ही सामने केकेआरने गमावले होते. त्यानंतर पंजाब किंग्सविरुद्धचा त्यांचा तिसरा सामना ३.४ षटकांनंतर पावसामुळे रद्द झाला होता. ग्रीन आयपीएल २०२६ ची सुरुवात केवळ एक विशेष फलंदाज म्हणून कामगिरी करेल. कॅमेरॉनच्या पाठीच्या खालच्या भागात दुखापत झाली

## कोलकाता पहिल्या विजयासाठी उत्सुक

### केकेआर शमीच्या आव्हानासाठी सज्ज

◆ **कोलकाता, ८ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट हंगामात गुरुवारी ईडन गार्डन्सवर संघर्षरत कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) आणि लखनौ सुपर जायंट्स (एलएसजी) यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. केकेआर या हंगामातील आपल्या पहिल्या विजयासाठी संघात मोठे बदल करू शकतो. त्यांना लखनौचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीच्या आव्हानासाठी सज्ज रहावे लागणार आहे.

केकेआरने आतापर्यंत तीन सामने खेळले, त्यापैकी दोन सामने गमावले व पंजाबविरुद्धचा सामना पावसामुळे रद्द झाला. या रद्द झालेल्या सामन्यातून मिळालेल्या एका गुणाने त्यांनी आपले खाते उघडले. लखनौने




अजिंक्य रहाणे ऋषभ पंत

आतापर्यंत दोन सामने खेळले व त्यातील एक सामना जिंकला व एका सामन्यात पराभव पत्करला. लखनौ २ गुणांसह गुणतालिकेत सहाव्या स्थानावर आहे, तर केकेआर एका गुणांसह आठव्या स्थानावर आहे.

सनरायझर्स हैदराबादविरुद्ध चार षटकांत ९ धावांत २ बळी अशी उत्कृष्ट गोलंदाजी करून शमी नुकताच परतला आहे. त्याने अभिषेक शर्मा व ट्रॅव्हिस हेडला सलग षटकांत बाद केले होते. ईडन गार्डन्सच्या खेळपट्टीचा तो पुरेपूर फायदा घेईल व तीन सामन्यांनंतरही विजयाविना असलेल्या केकेआरसाठी तो एक प्रमुख धोका ठरू शकतो.

पंजाब किंग्सचा ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज झेव्हियर बार्टलेटने ईडन गार्डन्सच्या गवताळ खेळपट्टीवर सरळ सीम गोलंदाजी किती प्रभावी ठरू शकते हे दाखवून दिले. त्याने परदेशी खेळाडू फिन ॲलन व कॅमेरॉन ग्रीनला अवघ्या तीन चेंडूंच्या अंतरात बाद करून केकेआरच्या आघाडीच्या फळीला खिंडार पाडले.

जरी पॉवरप्लेमध्ये लखनौसाठी शमी हा एक मोठा धोका ठरणार असला, तरी प्रिन्स यादव व जादुई फिरकीपटू दिग्विजय राठी यांच्यासह लखनौच्या उर्वरित गोलंदाजी आक्रमणाचा सामना करणेही निर्णायक ठरू शकते. लखनौची ताकद त्यांच्या पॉवरप्लेमधील गोलंदाजीत सामावलेली आहे.

केकेआरने अजिंक्य रहाणे व फिन ॲलन या सलामीच्या जोडीला कायम ठेवले आहे.

(वृत्तसंस्था)

## भारतीय संघांचे निर्णायक विजय

### आशियाई युवा टेबल टेनिस

◆ **शिमला, ८ एप्रिल**

आशियाई युवा टेबल टेनिस स्पर्धेच्या मोहिमेची विजयी सुरुवात करताना भारतीय मुलींच्या संघाने श्रीलंकेवर ३-० असा दणदणीत विजय मिळवून आपले वर्चस्व सिद्ध केले, तर मुलांच्या संघानेही मालदीवचा तितक्याच मोठ्या फरकाने पराभव केला.

स्पर्धेत उच्च मानांकन मिळाल्यामुळे, १९ वर्षांखालील भारतीय मुलींच्या संघाने सुरुवातीपासूनच आपला प्रभाव पाडला. जेनिफर वर्गीस, अनन्या मुरलीधरन व प्रिशा गोयलने आपापल्या सामन्यांमध्ये सरळ सेट्समध्ये किंवा चार सेट्समध्ये विजय मिळवित श्रीलंकेविरुद्ध निर्विवाद वर्चस्व गाजवले. भारतीय मुलींचा संघ सध्या आशियाई युवा अजिंक्यपद स्पर्धेसाठी पात्रता मिळवण्याच्या शर्यतीत सहभागी आहे. तथापि, मूळतः जून महिन्यात मस्कत येथे नियोजित असलेली ही खंडस्तरीय स्पर्धा, पश्चिम आशियातील संकटामुळे पुढे ढकलण्यात आली आहे.

१९ वर्षांखालील मुलांच्या गटाप्रमाणेच, १५ वर्षांखालील मुलांच्या गटातही भारताने आपला दबदबा कायम राखला आणि दुसऱ्या फेरीत मालदीवचा ३-० असा धुव्वा उडवला. आदित्य दास, अक्षय किरिकारा आणि आकाश राजवेलूने आपापल्या सामन्यांमध्ये प्रतिस्पर्ध्यांना पराभूत केले. (वृत्तसंस्था)

## आरसीबी महिला क्रिकेट संघाची कोच सुनेत्रा परांजपे यांची ह.दे.प्रशालेत सदिच्छा भेट

**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

भारताची माजी महिला क्रिकेट खेळाडू तसेच बी.सी.सी.आय.आयोजित वुमन्स प्रीमियर लीग मधील चॅम्पियन संघाचा म्हणजेच रॉयल चॅलेंजर्स बेंगलोर संघाचे सहाय्यक प्रशिक्षक सुनेत्रा परांजपे यांनी हरिभाई देवकरण प्रशाला तसेच अकॅडमीतील क्रिकेट खेळाडूना मार्गदर्शन केले.

या मार्गदर्शनात त्यांनी खेळाडूंना खेळाबरोबर अभ्यास तसेच खेळातील सातत्य व नियमित सराव याचा संगम करून सराव करावयास सांगितले. सुनेत्रा परांजपे यांनी खेळाडूंना शुभेच्छा देताना असे सांगितले की हरिभाई देवकरण प्रशालेमध्ये अनेक आंतरराष्ट्रीय खेळाडू घडविलेले आहेत. सोलापुरातील आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळाडू पॉली उम्रीगर,अझीम खान व अनघा देशपांडे हे हरिभाई मध्येच घडलेले खेळाडू आहेत.या हरिभाई शाळेतील मैदानाचा व प्रशिक्षणाचा आपण पुरेपूर फायदा घेऊन आपले भविष्य उज्वल करावे व आपण देखील आंतरराष्ट्रीय पातळीवर मजल मारावी अशी इच्छा व्यक्त केली.

सुरुवातीला प्रशालेच्या मुख्याध्यापिका स्मिता कांगुणे यांच्या हस्ते सुनेत्रा परांजपे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपप्राचार्य शांतप्पा कुंभार, ज्येष्ठ पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड, डा. मारुती शहाणे, क्रीडा शिक्षक प्रमोद चुंगे ,अक्षय गवळी व प्रकाश कंपली हे उपस्थित होते.






## महाराष्ट्राच्या सुवर्ण विजेत्या खो-खो संघातील रवी दरगोंडा याचा सन्मान

### आ. विजयकुमार देशमुख व जिल्हा क्रिडाधिकारी श्रीकांत हरनाळे यांच्या हस्ते सत्कार

**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

ओडिसा येथे ३० मार्च ते ३ एप्रिल या कालावधीत झालेल्या खो-खो इंडियाच्या कुमार राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने सुवर्ण पदक पटकाविले. या संघातून खेळताना सोलापूर जिल्ह्याचा खेळाडू रवी दरगोंडा याने अष्टपैलू खेळ केला.

विशेषतः अंतिम सामन्यात कर्नाटक संघाविरुद्धच्या त्याने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्याने या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडूचे पारितोषिक मिळविले

यनिमित्त त्याचा आमदार विजयकुमार देशमुख व जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांनी रवी दरगोंडा याच्या खेळाचे कौतुक केले.

यावेळी नगरसेवक किरण देशमुख, नगरसेवक संजय कोळी आणि खो-खो महाराष्ट्रचे कार्यकारिणी सदस्य सत्येन जाधव भाजप जिल्हा प्रकोष्ट उपाध्यक्ष संतोष कदम, राष्ट्रीय पंच आनंद जगताप, श्रीकांत चव्हाण आणि संजय बनसोडे आदी उपस्थित होते.

## सोलापूरचे श्रीरंग बनसोडे राज्य खो खो निवड समितीवर, सुनील चव्हाण सहाय्यक प्रशिक्षक

**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे खजिनदार श्रीरंग बनसोडे यांची राज्य कुमार व मुली खो खो संघ निवडीसाठी निवड समितीवर तर असोसिएशनचे उपाध्यक्ष सुनील चव्हाण यांची सहाय्यक प्रशिक्षकपदी निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या पुणे येथे झालेल्या सभेत सन २०२६-२७ मध्ये होणाऱ्या राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी कुमार व मुली राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी ही नियुक्ती असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी जाहीर केली. त्यांच्या निवडीबद्दल महाराष्ट्र खो खो असोसिएशचे उपाध्यक्ष महेश गादेकर, सरचिटणीस प्रा. डॉ. जाधव, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते श्रीकांत ढेपे, सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस उमाकांत गायकवाड व सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले. श्री. चव्हाण हे खो-खोचे माजी राष्ट्रीय खेळाडू असून उत्कर्ष क्रीडा मंडळाचे कार्याध्यक्ष आहेत. ते शहर पोलीस दलात हवालदार म्हणून कार्यरत आहेत.

श्री. बनसोडे हे जि. प. शाळा अंत्रोळी येथे शिक्षक आहेत. ते खोखोचे राष्ट्रीय पंच तसेच ते कास्ट्राईब शिक्षक संघटना दक्षिण सोलापूर शाखेचे अध्यक्ष आहेत. त्याचे शिक्षणाधिकारी कादर शेख, गटशिक्षणाधिकारी जयश्री सुतार, विस्तार अधिकारी गुरुबाळा सनके, विस्तार अधिकारी आयुब कलबुर्गी, कास्ट्राईब संघटनेचे राज्य उपाध्यक्ष श्रीशैल कोरे, मुख्याध्यापक युवराज राठोड यांनी अभिनंदन केले.



श्रीरंग बनसोडे



सुनील चव्हाण



## द वॉरियर्स तायक्कांदो ॲकॅडमीचे प्रशिक्षण शिबिर आणि बेल्ट परीक्षा संपन्न

**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

येथील द वॉरियर्स तायक्कांदो अकॅडमीचे पाच दिवसांचे ॲडव्हान्स तायकांदो प्रशिक्षण शिबिर आणि कलर बेल्ट परीक्षा उत्साहात संपन्न झाली.

ही परीक्षा वर्ल्ड तायकांदोच्या नियमानुसार इंडिया तायकांदो, तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आणि तायक्कांदो असोसिएशन ऑफ सोलापूर यांच्या मान्यतेने घेण्यात आली.परीक्षक सोमनाथ बनसोडे यांनी उपस्थित राहून खेळाडूंना मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण शिबिरात आणि कलर बेल्ट परीक्षेला बसणाऱ्या विविध गटातील खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत यश संपादन केले.

बेल्ट परीक्षेमध्ये तसेच मागील वर्षी शालेय व विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा नगरसेवक समाधान आवळे आणि मुख्य प्रशिक्षक सोमनाथ बनसोडे यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

### कलर बेल्ट परीक्षेतील यशस्वी

युविका होटकर, कृतिका केकडे, मौर्य केकडे, आदिनाथ तीर्थ, नित्या तीर्थ, कृष्णा वाघमारे, अथर्व बरडे, शुभम माने, वैष्णवी शिंदे, सृष्टी शिंदे, कार्तिक पवार, विनीत शिवशरण, कृष्णाली होटकर, देवराज रणशुगारे, त्रिशा होटकर, आराध्या ओहाळ, प्रबुद्ध नागटिळक, श्लोक चारे आणि तेजस्विनी शिंदे यांनी यश मिळवले.

## 'रॉयल्स इंडियन्स' व 'माऊली मास्टर' संघांची विजयी घोडदौड

### इंडियन मॉडेल पेरेंट्स क्रिकेट लीग : विनय कत्ते, चेतन व्हनकुंटे सामनावीर



विनय कत्ते

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टेडियम येथे सुरू असलेल्या 'इंडियन मॉडेल पेरेंट्स क्रिकेट लीग १६व्या पर्वाममध्ये मंगळवारी रॉयल्स इंडियन्स आणि माऊली मास्टर या संघांनी प्रतिस्पर्धी संघांवर मात करत विजय संपादन केला.

पहिल्या सामन्यात रॉयल्स इंडियन्स टायगर्सवर ७ गडी राखून विजय मिळविला. 'टायगर्स' संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, रॉयल्स इंडियन्सच्या अचूक गोलंदाजीसमोर टायगर्सचा संघ ११.४ षटकांत ७८ धावांवर गारद झाला. ७९ धावांचे लक्ष घेऊन मैदानात उतरलेल्या 'रॉयल्स इंडियन्स' संघाने अवघ्या ११.३ षटकांत २ गडी गमावून ८१ धावा करत विजय मिळवला. विनय कत्ते याला त्याच्या अष्टपैलू कामगिरीसाठी 'सामनावीर' घोषित करण्यात आले.

दुसऱ्या सामन्यात माऊली मास्टर संघाने व्ही.जी. ग्रुपवर ३१ धावांनी मात केली. 'व्ही. जी. ग्रुप'ने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. फलंदाजीसाठी उतरलेल्या 'माऊली मास्टर' संघाने निर्धारित १२ षटकांत ६ बाद १२२ धावांचा डोंगर उभा केला. प्रत्युत्तरादाखल खेळताना 'व्ही.जी. ग्रुप'चा संघ १० षटकांत ९१ धावांवर आटोपला. फलंदाजी आणि गोलंदाजी अशा दोन्ही आघाड्यांवर चमकणाऱ्या चेतन व्हनकुंटे याला 'सामनावीर' पुरस्कार देण्यात आला.

**संक्षिप्त धावफलक**

**टायगर्स:** ११.४ षटकांत सर्वबाद ७८ (भूषण खैराटकर २६, विशाल बनसोडे १४, विनय कत्ते ४ बळी, प्रितिश कुलकर्णी ३ बळी) **पराभूत विरुद्ध रॉयल्स इंडियन्स:** ११.३ षटकांत २ बाद ८१ धावा. (राघवेंद्र जोशी ४१*, राजाकिरण वडनाळे १९, प्रितिश कुलकर्णी १८*, उमाशंकर जावेळकर २ बळी).



चेतन व्हनकुंटे

**माऊली मास्टर:** १२ षटकांत ६ बाद १२२ धावा (चेतन व्हनकुटे ५८, जाविद नाईकवाडी ४३, तुषार मेहत्रे व कुमार केंगनाळकर २ बळी) **विजयी विरुद्ध व्ही. जी. ग्रुप:** १० षटकांत सर्वबाद ९१ धावा. (तुषार मेहत्रे ३५, जुबेर तांबोळी २६, चेतन व्हनकुटे ३ बळी, पी.एस.आय. पारडे २ बळी).

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### नृत्य ही साधना : श्रध्दा हर्डीकर-शिंदे

**अक्कलकोट, दि. ८ एप्रिल-**

गुरुच्या साधनेशिवाय कला साधणे अशक्य आहे. नृत्य ही शारिरिक हालचाल नसून ती साधना आहे. अक्कलकोट हे चैतन्य पीठ आहे असे गौरवोद्गार कथक नृत्यांगना श्रद्धा हर्डीकर शिंदे यांनी काढले. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान येथे समर्थाच्या १४८ व्या पुण्यतिथी निमित्त आयोजित धर्म संकीर्तन महोत्सवात प्रसिद्ध कथक नृयागंना श्रध्दा हर्डीकर-शिंदे व सहकाऱ्यांनी स्वामी चरणी कथक नृत्य साधना सादर केली. यावेळी श्रद्धा हर्डीकर शिंदे यांनी गौरवोद्गार काढले. प्रारंभी श्रध्दा हर्डीकर शिंदे यांचा परिचय ओंकार पाठक यांनी करून दिला. श्रध्दा हर्डीकर शिंदे व सहकाऱ्याचा सत्कार वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान मंदिर समिती चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वत महेश गोगी, उज्वला सरदेशमुख, प्रथमेश इंगळे, प्रा. शिवशरण अचलेर, प्रसाद पाटील, श्रीशैल गंवडी, निंगुताई हिंडोळे, मनोज जाधव, ऋषी लोणारी, स्वामी लोणारी : काशीनाथ इंडे, मनोज देगावकर, राजू भोसले, महादेव तेली, लक्ष्मण पाटील, प्रसाद सोनार, अशोक कडगंची, ओंकार पाठक, अक्षय सरदेशमुख, गिरिष पवार, संजय पवार, रमेश शिंदे, सुनिल पवार, बाळासाहेब एकबोटे उपस्थित होते.



### गुळपोळीच्या कन्येचा पोलिस दलात निवड; महामानव संस्थेकडून विद्या काळेचा सत्कार

**बार्शी, दि. ८ एप्रिल-**

गुळपोळी गावची कन्या विद्या दत्तात्रय काळे हिची सोलापूर शहरातील महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाल्याबद्दल तिचा महामानव बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्यावतीने पुष्पहार, शाल आणि महापुरुषांचे पुस्तक देऊन तिचा सन्मान करण्यात आला. हा सत्कार संस्थापक अध्यक्ष भैरवनाथ चौधरी आणि दिपाली चौधरी यांच्या हस्ते पार पडला. या कार्यक्रमाला गुळपोळी गावचे पोलीस पाटील बाळकृष्ण पिसे, युवा उद्योजक किरण खुरंगळे, श्रेयश काळे, दत्तात्रय काळे, वंदना काळे, सुभद्रा चौधरी, रंजना खुरंगळे, दिपाली चौधरी उपस्थित होते.



### बीएमआयटीमध्ये लाजऱ्या मुलींपासून सबळ महिलांकडे या विषयावर व्याख्यान

**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

ब्रह्मदेवदादा माने इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील महिला सेलतर्फे दि. ८ एप्रिल रोजी लाजऱ्या मुलींपासून सबळ महिलांकडे या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्त्या म्हणून मानसोपचार तज्ज्ञ डॉ. रम्या कन्नन उपस्थित होत्या. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ. कन्नन यांनी विद्यार्थिनींना आत्मविश्वास, मानसिक स्वास्थ्य आणि व्यक्तिमत्व विकासाचे महत्त्व सांगितले. लाजाळूपणा दूर करून आत्मविश्वास वाढवणे, स्वतःवर विश्वास ठेवणे आणि जीवनातील आव्हानांना धैर्याने सामोरे जाणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थिनींनी या संवादात्मक सत्रात उत्साहाने सहभाग घेतला. हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष दिलीप माने, उपाध्यक्ष पृथ्वीराज माने आणि सचिव जयश्री माने यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रा. प्रतिभा माने, प्रा. उषा दोडमिसे आणि प्रा. निदा शेख उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे समन्वयक महिला सेल समन्वयक प्रा. स्नेहल परदेशी होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. स्नेहल परदेशी, प्रा. वर्षा बिनगे, प्रा. वैष्णवी सिर्सीकर तसेच इतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. मनीषा गायकवाड यांनी केले.

## निधन वृत्त...

### डॉ. प्रभाकर झांबरे



**सोलापूर दि. ८ एप्रिल-**

येथील ईएसआय रुग्णालयातील डॉ. प्रभाकर झांबरे (वय ८६) यांचे बुधवारी, दि. ८ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने राहत्या घरी निधन झाले. डॉ. झांबरे हे रेल्वे लाइन्स परिसरात वास्तव्यास होते. ईएसआय रुग्णालयात त्यांनी प्रदीर्घ काळ सेवा बजावली होती. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सून, दोन मुली, जावई आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. येथील सेवासदन संस्थेच्या लिपिक सोनाली कुलकर्णी यांचे ते वडील होते. डॉ. झांबरे यांच्यावर उद्या गुरुवारी, दि. ९ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत.


### विमल गुरव



**माळशिरस, दि. ८ एप्रिल-**

विमल औदुंबर गुरव यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे (वय ५६) होते. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, जावई, नातवंडे व आई असा परिवार आहे.

### तुकाराम क्षीरसागर



**मंगळवेढा, दि. ८ एप्रिल-**

ओझेवाडी येथील तुकाराम म्हाकू क्षिरसागर यांचे बुधवार, दि. ८ एप्रिल रोजी वाजणेच्या सुमारास निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, सुन, नातू असा परिवार आहे. मंगळवेढ्यातील धन्वंतरी हॉस्पीटलचे डॉ. दतात्रय क्षीरसागर यांचे ते वडिल होत.

# सरकारी जागा शोधा, पंढरपूर कॉरिडॉर टाळा

### पंढरपुरात बचाव समितीच्या रॅलीस नागरिकांचा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.८ एप्रिल-**

पंढरीतील सरकारी मोकळ्या जागांच्या शोधासाठी पंढरपूर तिर्थक्षेत्र बचाव समितीकडून बुधवारी (ता.८) मोटरसायकल रॅलीस संभाव्य कॉरिडोर बाधित नागरिकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. यावेळी शहरातील अनेक सरकारी मोकळ्या जागा शासनाच्या निदर्शनास आणून दिल्याची माहिती तीर्थक्षेत्र बचाव समितीचे प्रमुख अभयसिंह कुलकर्णी (इचगावकर) यांनी दिली.




कुलकर्णी म्हणाले, पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीचे वतीने महिन्यापूर्वी कोरिडोर विरोधात मोठा मोर्चा काढला होता. त्या मोर्चात, घरेदारे पाडून विध्वंसक विकास करण्यापेक्षा वर्षानुवर्षे मोकळ्या पडलेल्या सरकारी जागांवर कोरिडोरसारखी विकास कामे करावीत, अशा प्रमुख मागण्या होत्या.

दरम्यान अनेक जागरूक नागरिक, पत्रकार, जिज्ञासू बाधित यांची त्यावेळेस मागणी होती की, या पडाक सरकारी जागा उजेडात आल्या पाहिजेत. आजवरच्या झालेल्या प्रचंड सरकारी खर्चाची उपयोगिता तपासली पाहिजे. यासाठी पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीचे वतीने पंढरीच्या शाश्वत विकासासाठी सरकारी मोकळ्या जागांच्या शोधासाठी मोटरसायकल रॅली काढण्यात आली.

बुधवारी सकाळी ९.३० वाजता येथील खादी ग्रामोद्योग, स्टेशन रोड येथून ही भव्य बाईक रॅली मार्गस्थ झाली. त्यानंतर ही रॅली सावरकर पुतळा, जुने बसस्टॅण्ड, भोसले चौक, जुने कोर्ट, हनुमान मैदान, नगरपालिका दवाखाना, जळका वाडा, कालिकादेवी चौक, सीपीडब्ल्युडी, मध्यप्रदेश भवन पासून सांगोला चौक, इंदिरा गांधी भाजी मंडई, चौफाळा, छत्रपती शिवाजी महाराज चौक, गजानन महाराज पिछाडी, संत गाडगे महाराज चौक, यमाई तलाव खालचे पार्किंग, एमटीडीसी भक्तनिवास, ब्लड बँक, पद्मावती उद्यान पिछाडी मार्गे येथील प्रांत कार्यालया मध्ये येवून त्या ठिकाणी रॅलीतील सहभागी नागरिकांकडून आपल्या विविध मागण्यांचे तसेच शहरातील मोकळ्या शासकीय जागा संदर्भातील माहितीचे निवेदन प्रांताधिकारी यांना देण्यात आले. त्यानंतर या बाईक रॅलीची सांगता झाली.

## महेश बँकेच्या ढोबळ नफ्यात ७२ टक्क्यांची वाढ तर नेट एनपीए शून्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेने सरत्या आर्थिक वर्षात म्हणजेच २०२५ -२६ मध्ये प्रभावी आर्थिक कामगिरी केली आहे. बँकेने ढोबळ नफ्यामध्ये ७२ टक्क्यांची वाढ केली आहे. तर नेट एनपीए शून्य टक्क्यांवर आणला आहे, अशी माहिती बँकेचे अध्यक्ष अनिल सिंदगी यांनी दिली.

सिंदगी म्हणाले, महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेने यंदाच्या वर्षभरात ठेवी, कर्जवाटप आणि नफा या तीनही मुद्द्यांवर चांगली कामगिरी केली आहे. बँकेच्या ठेवींमध्ये लक्षणीय वाढ झाली असून बँकेच्या ठेवी १५३ कोटी ५८ लाख रुपयांवरून १७७ कोटी ४१ लाख रुपयांवर पोहोचल्या आहेत. कर्ज वाटपाच्या बाबतही बँकेने संतुलित आणि धोरणात्मक दृष्टिकोन ठेवून मागील आर्थिक वर्षात दिलेल्या १०८ कोटी ९० लाख रुपयांच्या कर्ज वाटपात वाढ करून सरत्या आर्थिक वर्षात १२७ कोटी ८७ लाख रुपयांचे कर्ज वाटप केले आहे. परिणामी बँकेचा एकूण मिश्र व्यवसाय ३०५ कोटी २७ लाख रुपये झाला आहे. बँकेचे भाग भांडवल देखील वाढले असून ५ कोटी ८४ लाखांवरून भागभांडवल ६ कोटी ४१ लाख रुपये झाले आहे. त्याचबरोबर राखीव निधी व इतर तरतुदी १३ कोटी ४२ लाखांवरून १५ कोटी ५७ लाख रुपयांवर पोहचल्या आहेत. यामुळे बँकेची आर्थिक स्थिरता आणखी बळकट झाली आहे. आर्थिक वर्ष २०२५ - २६ मध्ये बँकेचा ढोबळ नफा २ कोटी ४० लाखांवरून ४ कोटी १५ लाखांवर पोहचला आहे. यात ७२ टक्क्यांची वाढ झाली आहे. बँकेचा ढोबळ एनपीए २.९२ टक्के असून नेट एनपीए शून्य टक्के आहे.

> बँकेवर ग्राहकांचा असलेला विश्वास आणि कर्मचाऱ्यांनी केलेल्या शिस्तबद्ध सांघिक कामाचे हे यश आहे. महेश अर्बन को. ऑप. बँकेकडून आगामी काळात यूपीआय, आयएमपीएस आणि एटीएम या अत्याधुनिक सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ग्राहकांना अधिक जलद आणि सोयीस्कर बँकिंग सुविधा देण्यावर आमचा भर राहणार आहे.
>
> **- अनिल सिंदगी,**
> अध्यक्ष, महेश अर्बन को ऑप. बँक लि.




## 'आपुलकी'कडून मातोश्री वृध्दाश्रमाला बेड भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ८ एप्रिल-**

सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने येथील मातोश्री वृद्धाश्रमाला एक बेड, गादी भेट देण्यात आली. मातोश्री वृद्धाश्रमात सध्या अनेक ज्येष्ठ नागरिक वास्तव्याला आहेत. या जेष्ठ नागरिकांची सोय व्हावी म्हणून ही भेट देण्यात आली.

यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, महादेव दिवटे, सुरेश चौगुले, राहुल दिवटे, इंजि.विजय नागणे, डॉ. अनिल कांबळे, वृद्धाश्रमाचे सचिव अशोक जाधव उपस्थित होते.

## जमिनीच्या वादातून वृद्धाला मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ एप्रिल-**

जमिनीचा विकास करण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका ६५ वर्षीय वृद्धाला लाकडी दांडक्याने आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना बार्शी येथे घडली आहे. या हल्ल्यात वृद्ध गंभीर जखमी झाले असून, मारहाणीनंतर त्यांच्या गळ्यातील ३ तोळ्यांची सोन्याची साखळीदेखील लंपास करण्यात आल्याची तक्रार पोलिसांत दाखल करण्यात आली आहे. फिर्यादीनुसार आबासाहेब शामराव जराड (वय ६५, रा. फुले प्लॉट, बार्शी) यांची ढगे मळा भागात गट नं. ५१३/अ मध्ये ११ गुंठे मालकीची जमीन आहे. ही जमीन त्यांचे पुत्र राजकुमार जराड यांच्या नावावर असून ती अद्याप विकसित केलेली नाही.

सोमवार, दि. ६ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास आबासाहेब जराड हे त्यांचे ओळखीचे चंदन मनगिरे यांच्यासह जमिनीची पाहणी करण्यासाठी गेले होते. जराड जमिनीवर गेले असता, त्या ठिकाणी सतीश श्रीमंत आरगडे व संजय आरगडे (दोघे रा. बार्शी) हे बुलेटवरुन आले. तू इथे काय करतोय? ही जागा माझी आहे, असे म्हणत त्यांनी जराड यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. जराड यांनी ही जागा आपलीच असल्याचे ठामपणे सांगितल्याने आरोपींनी त्यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत मारहाण सुरु केली. आरोपी सतीश आरगडे याने बाजूला पडलेल्या लाकडी दांडक्याने जराड यांच्या हातावर, पायावर आणि पाठीवर गंभीर प्रहार केले. तर संजय आरगडे याने त्यांना जमिनीवर पाडून पोटात व गुप्तांगावर लाथांनी मारहाण केली. या झटापटीत जराड यांच्या गळ्यातील ३ तोळे वजनाची सोन्याची चैन गहाळ झाली असून ती सतीश आरगडे यानेच घेतल्याचा संशय फिर्यादीने व्यक्त केला आहे. जाताना आरोपींनी पोलिसांत तक्रार दिली तर तुला आणि तुझ्या कुटुंबाला जिवंत मारुन टाकू, अशी धमकीही दिली.

जखमी आबासाहेब जराड यांना तातडीने बार्शीतील सुविधा हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी रुग्णालयात जाऊन त्यांचा जबाब नोंदवला असून, सतीश आरगडे व संजय आरगडे या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## डॉ. निरंजन वर्मा यांचे आज व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

गोसेवा विभाग सोलापूर जिल्हा पंचगव्य डॉक्टर असोसिएशन सोलापूर जिल्हा यांच्यातर्फे पंचगव्य गुरुकुलम कांचीपुरम (तमिळनाडू) चे कुलपती डॉ. निरंजन वर्मा गुरुजी यांचे व्याख्यान सायंकाळी ६ वाजता नवी पेठ येथील शिवस्मारक सभागृहात होणार आहे.



यावेळी डॉ. निरंजन वर्मा 'देशी गाय आणि मानवी आरोग्य' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. या व्याख्यानास काशी पिठाचे जगद् गुरू श्रीमद काशी ज्ञानसिंहासनाधीश्वर श्री श्री श्री १००८ जगद् गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या व्याख्यानास सोलापूरकरांनी उपस्थित रहावे असे आवाहन गोसेवा विभाग सोलापूर जिल्हा पंचगव्य डॉक्टर असोसिएशन सोलापूर जिल्हा यांनी केले आहे.

## मार खाऊन ॲट्रॉसिटीची केस; अखेर मिळाला मोटे यांना न्याय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

नरखेड (ता. मोहोळ) येथे दि. २९/०५/२०२४ रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास अक्षय कसबे रा. नरखेड यास जातीवाचक शिवीगाळ केली आणि मारहाण केली या आरोपावरुन नरखेडचे तलाठी चंद्रकांत मारुती मोटे रा. वाळुज (ता. मोहोळ) विरुध्द भरण्यात आलेल्या खटल्याची सुनावणी सोलापूर सेशन्स कोर्टात होऊन न्यायालयाने तलाठी मोटे यांची निर्दोष मुक्तता केली.



फिर्यादी अक्षय कसबे याचा मित्र मनोज मोटेच्या शेताचा वादळामुळे झालेल्या नुकसानीचा पंचनामा का केला नाही अशी विचारणा केले असता मोटे यांनी त्यास जातीवाचक शिवीगाळ केली व मारहाण केली असे सरकारपक्षाचे म्हणणे होते.

सकाळी तलाठी ऑफिसमध्ये आणि पेट्रोलपंपासमोर दयानंद राऊत, योगेश राऊत आणि मनोज राऊत यांनी आपणास मारहाण केली, खोटा ट्रॉसिटी गुन्हा दाखल करुन नोकरी घालवण्याची धमकी दिली अशी तक्रार तलाठी मोटे यांनी मोहोळ पोलीस स्टेशनला केल्यानंतर त्यांना औषधोपचारासाठी सरकारी दवाखान्यात देखील दाखल करण्यात आले होते. त्याबाबतचे सर्व कागदपत्र मोटे यांच्यावतीने न्यायालयात दाखल करण्यात आले होते. तलाठी मोटे यांनी त्यांना झालेल्या मारहाणीबाबत व खोटया ट्रॉसिटी केसमध्ये गुंतवण्याच्या मिळालेल्या धमकीबाबत मोहोळ पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीस शह देण्यासाठी दयानंद राऊत याने मित्र अक्षय कसबे यास पुढे करुन तलाठी मोटे यांना ट्रॉसिटी खटल्यात खोटेपणाने गुंतवले आहे. विलंबाने दिलेल्या फिर्यादीवर व विसंगतीपुर्व पुराव्यावर विश्वास ठेवणे धोक्याचे आहे असा युक्तिवाद बचाव पक्षातर्फे न्यायालयात करण्यात आला. या खटल्यात आरोपीतर्फे ॲड. धनंजय माने, ॲड. जयदीप माने, ॲड प्रणित जाधव, ॲड. श्रीहरी कुरापाटी, ॲड. किरण गवळी यांनी काम पाहिले.



## मोडनिंबमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची एका रात्रीत उभारणी

**मोडनिंब, दि. ८ एप्रिल-**

मोडनिंब (ता. माढा) येथे आज पहाटे एकच्या सुमारास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याची उभारणी करण्यात आली. ग्रामपंचायत कार्यालयासमोर पुतळा उभारणीनंतर रात्री दीडच्या सुमारास फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.

पुतळा उभारणीनंतर अवघ्या तासाभरातच करमाळा सहाय्यक पोलीस अधीक्षक अंजना कृष्णा, पंढरपूर सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राहुल आत्राम, कुर्डुवाडी पोलीस निरीक्षक अतुल मोहिते, टेम्भूर्णी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहिदास पवार, पोलीस उपनिरीक्षक प्रशांत मदने यांनी घटनास्थळी भेट दिली. पहाटेपासूनच आरसीपी, दंगल नियंत्रण पथक व क्यूआरटी पथक बंदोबस्तात तैनात करण्यात आले. सकाळी दहाच्या सुमारास भीमसैनिक व सर्वपक्षीय नेते व ग्रामस्थांच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

गेल्या महिन्यात ग्रामपंचायत कार्यालया समोर छत्रपती शिवाजी महाराज यांचा आश्वारूढ पुतळा उभारण्यात आला होता. यानंतर आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा याच परिसरात उभा केला गेला आहे. दोन्ही महापुरुषांच्या या पुतळ्यांच्या स्वागतासाठी शहरवासीय व सर्वपक्षीय नेतेमंडळी उपस्थित असल्याने कोणताही वादविवाद उद्भवला गेला नाही. दरम्यान मोडनिंब ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत हद्दीत अनधिकृत पणे पुतळा उभारल्या प्रकरणी अज्ञात विरोधात टेंभुर्णी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असल्याची माहिती मिळत आहे.

**सर्व पक्षीय नेते, समाज बांधव उपस्थित**

पुतळा उभारण्यात आल्याची माहिती मिळताच सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी हजेरी लावली. विविध समाजातील नागरिकांनी एकत्र येत पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी एकोपा व शांततेचे दर्शन घडले असून सर्वांनी मिळून हा क्षण साजरा केला.

## मंगळवारपासून सांगोला ते कराड मार्गे दापोली बससेवा

### शहीद अशोक कामटे संघटनेच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ८ एप्रिल-**

सांगोल्यातून कोकणामध्ये जाण्याकरिता सांगोला ते कराड मार्गे दापोली बस सेवा सुरू करावी अशी आग्रही मागणी सांगोल्यातील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांच्याकडे केली होती. ही बस सेवा सुरू करण्यास मंजुरी मिळाली असून मंगळवार दि.१४ एप्रिल पासून नियमित सुरू होणार आहे. या बस सेवेचे ऑनलाइन आगाऊ आरक्षण महामंडळाच्या संकेतस्थळावर सुरू करण्यात आले आहे.

सदर बस सेवेमुळे कोकण व पश्चिम महाराष्ट्राला जोडणारी अतिशय महत्त्वपूर्ण बससेवा ठरणार असल्याने प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. सदर बस सेवा सुरू होण्याकरता परिवहन मंत्री, विभागातील परिवहन राज्य महामंडळाचे सर्व अधिकारी, आगार प्रमुख विकास पोफळे सांगोला यांचेकडे सातत्याने शहीद अशोक कामटे सामाजिक संघटनेने मागणीचा पाठपुरावा केला होता. तरी या मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी या बसने प्रवास करावा असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

सांगोला ते दापोली ही एसटी बस स.८ वा. सांगोल्यातून प्रस्थान करेल व दापोलीतून स.६ वा. निघेल. या बसचे थांबे व मार्ग नाझरे, आटपाडी, करगणी, भिवघाट, खानापूर, विटा, कडेगाव, कराड, पाटण, कोयनानगर, चिपळूण, खेड, दापोली असणार आहे.



# शिवसेना 'उबाठा'मधील 'त्या' पोस्टसंदर्भात तर्कवितर्कांना उधाण

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे

## पदाधिकाऱ्यांच्या निवडी करणे कठीण होते

## नेहमीच चुकीचे संपर्कनेते, संपर्कप्रमुख लाभले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ एप्रिल-**

शिवसेनेत दोन उभे गट पडल्यापासून आणि भारतीय जनता पार्टीपासून फारकत घेतल्यापासून शिवसेना 'उबाठा'मध्ये अंतर्गत वाद-विवाद, दावे-प्रतिदावे आरोप-प्रत्यारोपांचा सिलसिला थांबता थांबेनासे झाले आहे. सोलापूर जिल्हा संपर्क प्रमुख सुषमा अंधारे यांनी सोलापूर शहर-जिल्हा स्तरावरील पदाधिकाऱ्यांची निवडी करणे कठीण होते, असे समाजमाध्यमाद्वारे म्हटले आहे. तर दुसरीकडे सोलापूरचे मावळते जिल्हाप्रमुख डॉ. प्रा.अजय दासरी यांनी सोलापूर शिवसेनेला नेहमीच चुकीच्या संपर्कनेते व संपर्कप्रमुखांचा अनुभव आला आणि यंदाही तेच पुन्हा घडलं, असे अशा आशयाचे 'पोस्ट' शेअर केले आहे. सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुखा सुषमा अंधारे आणि मावळते जिल्हाप्रमुख डॉ.प्रा.अजय दासरी यांच्या 'या' दोन पोस्टसंदर्भात शिवसेना उबाठा पक्षसंघटनेसह राजकीय वर्तुळातून तर्कवितर्कांना उधाण आल्याचे दिसून येत आहे.

शिवसेना 'उबाठा'च्या सोलापूर जिल्हा संपर्क प्रमुख सुषमा अंधारे यांनी आपल्या 'पोस्ट'मध्ये म्हणाल्या, दोन महिन्यापूर्वी मी सोलापूर जिल्ह्याच्या संपर्कप्रमुख पदाची सूत्रे हातात घेतली. दोन महिन्यात तीन वेळा सोलापूर दौरे झाले. सोलापूर मधल्या प्रत्येक पदाधिकाऱ्यांशी बोलायचे म्हणून एक बैठक तर सकाळी १० ते रात्री ११.३० पर्यंत झाली. प्रत्येक तालुकानिहाय म्हणणं ऐकून घेतल्यानंतर आणि प्रत्येक पदाधिकाऱ्याची बाजू समजून घेतल्यानंतर ज्यांची जबाबदारी घेण्याची इच्छा आहे त्या प्रत्येकाने मुलाखतीला उपस्थित राहावे असे म्हणत मुलाखत प्रक्रिया सगळ्यांसाठी खुली केली. या मुलाखतीमध्ये जे जे लोक उपस्थित राहिले ते सगळेच संघटनेशी अतिशय प्रामाणिक बांधिलकी जपणारे आणि हिरीरीने काम करणारे शिवसैनिक आहेत याचा मला कायम अभिमान आहे. त्यामुळे या निवडी करणे तसे कठीण होते.



जिल्हाप्रमुख पदाची निवड करताना सन्माननीय पक्षप्रमुखांनी काही निकष सांगितले होते त्यातला पहिला निकष होता शक्यतो नवीन आणि तरुण चेहरे पुढे आणा. जे संघटनेसाठी वेळ देऊ शकतात. सोलापूर जिल्ह्यातील भौगोलिक सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्नांची जाण आहे. ज्यांचं संपर्क आणि संभाषण कौशल्य आहे. आणि जे वर्षानुवर्ष संघटनेची प्रामाणिक आहेत. यात काही चेहरे असे होते की ज्यांनी वर्षानुवर्ष काम केलं आहे मात्र त्यांना संधी मिळाली नाही. मला प्रादेशिक समतोल साधने सुध्दा तितकेच महत्त्वाचे होते. यानिमित्ताने ही सुध्दा स्पष्ट केले पाहिजे की या निवडी फक्त एक वर्षासाठी आहेत. एक वर्षाच्या कार्य अहवालावर हे अवलंबून असेल की या जबाबदारीचे सातत्य असेल की नाही. मला विश्वास आहे शिवसेनाप्रमुख हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे शिलेदार म्हणून त्यांच्या जन्मशताब्दी वर्षात हे सगळेच लोक प्रचंड ताकदीने काम करतील, असा विश्वासही त्यांनी या 'पोस्ट'मध्ये व्यक्त केला. तर दुसरीकडे मावळते जिल्हाप्रमुख डॉ. प्रा.अजय दासरी आपल्या 'पोस्ट'मध्ये म्हणतात की, दोन वर्षांपूर्वी आदरणीय उध्दवसाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वावर आणि आदेशावर पूर्ण विश्वास ठेवून माझ्यावर जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी सोपवण्यात आली हा माझ्यासाठी केवळ एक पद नव्हतं, तर पक्ष संघटन मजबूत करण्याचं ध्येय होतं. या दोन वर्ष,पाच महिने आणि सात दिवसाच्या या प्रवासात साहेबांनी दिलेला प्रत्येक आदेश मी शब्दशः पाळला कोणतीही अपेक्षा न ठेवता, तन-मन-धन अर्पण करुन, दिवस-रात्र एक करून पक्ष वाढीसाठी काम केलं. महापालिका निवडणुकीत हाराकिरी झाली. तरीही आपल्याच लोकांचे घाव सहन करीत, मोजक्या निष्ठावंत सैनिकांना सोबत घेवून निकराने लढा दिला. हे संपूर्ण सोलापूरकरांनी पाहिले. या प्रवासात मला अनेक मोठ्या नेत्यांचं मार्गदर्शन मिळालं.



सोलापूरमध्ये शिवसेना मजबूत करण्यासाठी मी पूर्ण ताकद लावली जे शिवसैनिक काही पदाधिकाऱ्यांच्या वागणुकीमुळे किंवा परिस्थितीमुळे बाजूला गेले होते, त्यांना पुन्हा प्रवाहात आणलं नवीन ऊर्जा निर्माण केली संघटनेला एक वेगळी ओळख देण्याचा प्रयत्न केला. पण दुर्दैव असं की, सोलापूर शिवसेनेला नेहमीच चुकीच्या संपर्कनेते व संपर्कप्रमुखांचा अनुभव आला आणि यंदाही तेच पुन्हा घडलं. ज्या लोकांमुळे पक्ष वाढत नव्हता, शिवसैनिक दूर जात होते, जे कालच्या निवडणुकीत पक्ष सोडले,त्यांच्यासोबत उघडपणे व छुपा कमळाबाई आणि मिंधेचा चा प्रचार केला,पक्ष विकलेत्यांनाच पुन्हा महत्त्वाच्या पदांवर बसवण्यात आलं. काही व्यक्तींच्या चुकीच्या निर्णयांमुळे पक्षाची प्रतिमा आणि साहेबांचं नाव मात्र नकळत खराब झाले, ही खंत मनात कायम राहील. आज मला त्या पदावरुन पदमुक्त करण्यात आलं ही गोष्ट नक्कीच म नाला वेदना देणारी आहे, असेही यात म्हटले आहे.

# एलपीजी पुरवठा ठप्प; रिक्षाचालक आले अडचणीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ एप्रिल-**

सोलापूर शहरात एलपीजी पुरवठा पुर्णतः ठप्प झाल्याने सुमारे १६ हजार रिक्षाचालक अडचणीत आले आहेत. त्यामुळे वाहतूक व्यवस्थेवर परिणाम होत आहे. रिक्षाचालकांसम ोर रोजीरोटीचा प्रश्न आऽवासून उभा राहिल्याचे दिसून येत आहे. शहरातील ऑटो रिक्षांना एलपीजी पुरवठा करणारे १० खासगी पंप पूर्णपणे बंद पडले आहेत.



या परिस्थितीची दखल घेत जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी राज्य पुरवठा विभागाचे समन्वयक चंद्रकांत डांगे यांच्याशी दूरध्वनीवरुन चर्चा केली. सोलापुरातील रिक्षाचालकांची वाढती अडचण त्यांनी यावेळी निदर्शनास आणून दिली. थांबलेला एलपीजी पुरवठा तातडीने पूर्ववत सुरू करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांनी केली.

राज्य पुरवठा विभागाचे चंद्रकांत डांगे यांनी हा विषय राज्य व केंद्र सरकारसमोर मांडून लवकरात लवकर मार्ग काढण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. रिक्षाचालकांच्या या गंभीर प्रश्नाकडे शासनाने तातडीने पाऊल उचलून हा राज्यव्यापी प्रश्न सोडवावा, अशी मागणी रिक्षाचालक, मालक संघटनेने केली.

दरम्यान, घरगुती गॅस ग्राहकांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून तक्रार निवारण केंद्र स्थापन करण्यात येत आहे. नागरिकांनी गॅस संबंधित अडचणींसाठी अन्नधान्य वितरण कार्यालयाच्या ०२१७-२७३१००८ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. गॅस कनेक्शन सुरू ठेवण्यासाठी ई-केवायसी आवश्यक असून, यासाठी प्रशासनाकडून क्यूआर कोड उपलब्ध करून देण्यात येत आहे. इंडेन ग्राहकांनी 'इंडियन ऑईल वन', भारत गॅस ग्राहकांनी 'बीपीसीएल फॉर बिझनेस' आणि एचपी गॅस ग्राहकांनी 'एचपी पे' अॅप डाउनलोड करावे, असेही सांगण्यात आले.

# सोलापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा!

## 'बीआरडीएस'च्या १८ विद्यार्थ्यांचे निफ्ट परीक्षेत घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

डिझाइन क्षेत्रातील देशातील सर्वोच्च संस्था मानल्या जाणाऱ्या 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी' प्रवेश परीक्षेत सोलापूरच्या 'बीआरडीएस' संस्थेच्या विद्यार्थ्यांनी यशाचा नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेल्या प्रवेश परीक्षेत संस्थेच्या २० पैकी तब्बल १८ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत दुसऱ्या टप्प्यातील 'सिच्युएशन टेस्ट'साठी आपली निवड निश्चित केली आहे.

या परीक्षेत श्रावणी अंभुरे, स्मृती जाजू, दिविजा भानप, समीक्षा मोटगी, आरुषी राचेती, श्रेया कोरे, तेजस्विनी देशमुख, सौम्या कोल्हापुरे, साई कुलकर्णी, साक्षी हिंदोळे, प्रसन्न बडगु, अयान शेख, अमृता दळवी, म ेघना गवळी, समृद्धी इंगळे, तनिष्का बालदवा, ओमसाई बराड आणि ऋषिकेश गंगनावर या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

सात रस्ता परिसरातील बीआरडीएस सोलापूर केंद्राने यापूर्वीही ३० हून अधिक विद्यार्थ्यांना भारतातील विविध निफ्ट महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळवून दिला आहे. केंद्राचे प्रमुख धर्मेश सर यांच्या मार्गदर्शनाखाली यंदाही ८० टक्क्यांहून अधिक निकाल लागला असून, यशस्वी विद्यार्थ्यांची आता एप्रिलमध्ये होणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातील परीक्षेसाठी तयारी सुरू झाली आहे.

### डिझाइन क्षेत्रातील संधींचे दालन

भारतात सध्या डिझाइनर्सची प्रचंड कमतरता आहे. दरवर्षी ६२,००० हून अधिक डिझाइनर्सची गरज असताना केवळ १७,००० डिझाइनर्स तयार होतात. निफ्टच्या देशभरातील १९ केंद्रांमधून बॅचलर ऑफ डिझाइन आणि मास्टर्स ऑफ डिझाइन असे कोर्सेस चालवले जातात. या क्षेत्रातील पदवीधरांना केवळ उच्च पगाराच्या नोकऱ्याच मिळत नाहीत, तर ते स्वतः चे उद्योग सुरू करून 'जॉब क्रिएटर्स' बनत आहेत.

### एआयच्या युगात सुरक्षित करिअर

आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या वाढत्या प्रभावामुळे अनेक क्षेत्रांतील नोकऱ्यांवर गदा येण्याची शक्यता असताना, 'डिझाइन' हे क्षेत्र एआय-फ्रेंडली (ख-षीळशपवश्र) मानले जाते. सर्जनशीलता आणि मानवी दृष्टीकोन यामुळे या क्षेत्रातील मागणी भविष्यात अधिक वाढणार आहे.

# महात्मा बसवेश्वर जयंती मिरवणुकीसाठी रात्री १२ वाजेपर्यंत मिळाली परवानगी

## मध्यवर्ती श्री महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव महामंडळाची पोलिस प्रशासनासोबत चर्चा

## परवानगीसाठी एक खिडकी योजना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल -**

जगतज्योती श्री महात्मा बसवेश्वर जयंती मिरवणुकीसाठी रात्री १२ वाजेपर्यंत पोलीस प्रशासनाकडून परवानगी देण्यात आली आहे, अशी माहिती मध्यवर्ती श्री महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव व समाजसेवा महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष जगदीश पाटील आणि मध्यवर्ती महामंडळाचे समिती अध्यक्ष शरणराज केंगनाळकर यांनी बुधवारी दिली.



बुधवारी सकाळी मध्यवर्ती श्री महात्मा बसेश्वर जन्म ोत्सव महामंडळाचे पदाधिकारी आणि पोलीस प्रशासनाची पोलीस आयुक्तालयात चर्चा झाली. यावेळी महात्मा बसवेश्वर जयंती आणि मि रवणूक काढण्याबाबत येणाऱ्या अडचणी आणि उपाय यांवर चर्चा करण्यात आली. यावेळी ट्रस्टी अध्यक्ष जगदीश पाटील यांनी मिरवणुकीची वेळ रात्री १२ वाजेपर्यंत वाढवून देण्याची मागणी केली. तसेच श्री महात्मा बसवेश्वर जयंती मिरवणूक काढणाऱ्या मंडळांनी प्रशासनाकडे परवानगी मागताना मध्यवर्ती महामंडळाचे शिफारस पत्र जोडावे आणि जी मंडळे मिरवणूक न काढता केवळ मंडपात मूर्ति प्रतिमा स्थापन करून जयंती साजरी करतात अशा मंडळांनीही परवानगी काढताना मध्यवर्ती महामंडळाचे शिफारस पत्र सोबत जोडावे, असे ट्रस्टी अध्यक्ष जगदीश पाटील यांनी सांगितले. मंडळांच्या सोयीसाठी पोलीस प्रशासनाने महात्मा बसवेश्वर जयंती उत्सवासाठीच्या परवानगीकरिता एक खिडकी योजना सुरू करावी अशी मागणी समितीचे अध्यक्ष शरणराज केंगनाळकर यांनी यावेळी केली. या सर्व मागण्यांना पोलीस प्रशासनाने हिरवा कंदील दाखवत सकारात्मक प्रतिसाद दिला.

यावेळी मध्यवर्ती श्री महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव व समाजसेवा महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष जगदीश पाटील, म ध्यवर्ती महामंडळाचे समिती अध्यक्ष शरणराज केंगनाळकर, कार्याध्यक्ष विजय कुलथे, सचिव बसवराज सावळगी, उपाध्यक्ष केदार वनारोटे, खजिनदार अनिल परमशेट्टी, ट्रस्टी गणेश चिंचोळी, आनंद मुस्तारे, सिद्धेश थोबडे, सचिन शिवशक्ती, गुरुशांत मोकाशी, मल्लिनाथ सोलापूरे, नगरसेवक अक्षय अंजीखाने, विशवनाथ प्याटी, सागर अतनुरे, गुरुराज पद्मगोंडा, ओंकार विभूते यांची प्रमुख उपस्थिती होती.

# 'अन्नछत्र'मुळे विकासाला मिळाली चालना : खा. प्रा.ज्योती वाघमारे

**तभा वृत्तसेवा-**
**अक्कलकोट, दि. ८ एप्रिल-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अम ोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली तीर्थक्षेत्र अक्कलकोटच्या विकासाला चालना मिळाली असून, श्री स्वामी सम र्थ महाराजांची महती सातासम ुद्रापार अन्नछत्र मंडळामुळे झाली आहे. न्यास हे धार्मिक क्षेत्रातील उत्कृष्ट व्यवस्थापन असल्याचे मनोगत नूतन राज्यसभा सदस्या खासदार डॉ.प्रा.ज्योती वाघमारे यांनी व्यक्त केल्या.



श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त न्यासाच्या वतीने अभीष्टचिंतन करण्यात आले. याप्रसंगी नगरसेवक अमोल शिंदे, प्रियदर्शन साठे, महेश साठे, अमर पाटील, दिपक पाटील, भीमा वाघम ारे, गणेश तुपडळे, लक्ष्मण वाघम ारे, गणेश जंगडेकर, भैया माने, सागर नवत्रे, सिध्दार्थ गायकवाड, विश्वनाथ हडलगी, सुनिल कटारे, प्रा.सुर्यकांत कडबगावकर आदी उपस्थित होते.

# डॉ.आंबेडकर जयंती मिरवणूक : 'नो डीजे, नो डॉल्बी'संदर्भात शपथ

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल -**

नो डीजे, नो डॉल्बी ही योजना सोलापूर जिल्ह्यात राबविण्याबाबत कार्तीकेयन एस. जिल्हाधिकारी व अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक यांनी आग्रही भुमिका मांडली. शांतता समिती सदस्यांनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मंडळाचे अध्यक्ष व सदस्य यांनी नो डीजे नो डॉल्बी ही योजना राबवत असल्याचे आश्वासन देत नो डीजे, नो डॉल्बी ही शपथ सुध्दा घेतली आहे.



दिनांक १४/०४/२०२६ रोजी साजऱ्या होणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच्या अनुषंगाने जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे तसेच सामाजिक सलोखा दृढ करणे या उद्देशाने दि. ०८/०४/२०२६ रोजी कार्तीकेयन एस. जिल्हाधिकारी सोलापूर व अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक यांच्या अध्यक्षेतेखाली जिल्हास्तरीय शांतता समितीची बैठक घेण्यात आली. यावेळी अप्पर पोलिस अधीक्षक प्रितम यावलकर, पोनि बाळासाहेब भरणे, पोनि संजय जगताप यांच्यासह जिल्हयातील शांतता समितीचे सदस्य, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मंडळाचे अध्यक्ष, सदस्य, डॉल्बी धारक, प्रतिष्ठीत व्यक्ती व पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी उपस्थित होते. सदर बैठक ही संवाद हॉल, पोलीस मुख्यालय सोलापूर ग्रामीण येथे घेण्यात आली.

या बैठकीमध्ये जिल्हा शांतता समितीच्या काही सदस्यांनी आपल्या सुचना मांडुन आपले मनोगत व्यक्त केले. डॉल्बी सिस्टीममुळे होणारे धोके, व त्यामुळे लहान मुले, वृध्द यांचे मानसिक व शारीरीक, होणारे परिणाम तसेच ध्वनीप्रदुषणामुळे आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम यांची माहिती दिली तसेच ध्वनीप्रदुषण कायदयाचे/नियम ांचे काटेकोरपणे पालन करणेबाबत सुचना ही दिल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती अनुषंगाने पारंपरिक मार्गाने मिरवणूक काढावी, गणेशोत्सवापासून आतापर्यंत झालेल्या सर्व जयंती व उत्सवामध्ये कोणत्याही प्रकारचा डीजे व डॉल्बी लावण्यात आलेला नसून सोलापूर जिल्हा हा पुर्णपणे डीजे व डॉल्बी बंद केलेला महाराष्ट्रातील प्रथम जिल्हा आहे याबाबत माहिती दिली. ज्या मंडळाकडून मिरवणुकीमध्ये डीजे व डॉल्बीचा वापर करण्यात येईल अशा ठिकाणी ध्वनी मापक यंत्रामधून ध्वनी प्रदुषाणाची पातळी मोजण्यात येईल व ही ध्वनी प्रदुषाणाची पातळी मर्यादेपेक्षा जास्त असणा-या मंडळावर कायदेशीर कारवाई करून गुन्हे दाखल करण्यात येईल, असेही सांगण्यात आले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

## जय भारत शाळेत कै. नितीन हळ्ळी यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

जय भारत प्राथमिक शाळेत संस्थेचे कै. नितीन हळ्ळी यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. नितीन हळ्ळी हे एक अभ्यासू, आदर्श शिक्षक होते. इंडियन मॉडेल इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये गणित आणि इंग्रजी विषयाचे अध्यापन करत होते. यावेळी संस्थेचे चेअरमन सिद्राम फुले, सचिव दिपक फुले, मारुती माळगे, मुख्याध्यापक नारायण सूर्यवंशी उपस्थित होते.

## ▶▶ थोडक्यात...

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालय पुन्हा झाले सुरु

**सोलापूर, दि. ८ एप्रिल**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या आवारातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालय सर्वसामान्यांसाठी पुन्हा खुले करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसह वाचनप्रेमींना मोठा दिलासा मिळणार आहे. समाजकल्याण सभापती संस्कृती सातपुते यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे वाचनालय पुन्हा सुरू होत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून बंद असलेल्या या वाचनालयाबाबत नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत होती. वाचनालय सुरु करण्यापूर्वी त्याची स्वच्छता आणि दुरुस्तीची कामे वेगाने सुरु आहेत. विद्यार्थ्यांना अभ्यास व स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे वाचनालय उपयुक्त ठरणार आहे. समाजकल्याण विभागाच्या या पुढाकाराचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.



### सभापती सातपुते यांचा ‘कास्ट्राईब'कडून सत्कार

**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण समितीच्या सभापती संस्कृती सातपुते यांचा जिल्हा परिषद कास्ट्राईब संघटनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष अरुण क्षीरसागर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनेचे कार्याध्यक्ष उमाकांत राजगुरु, मुख्य संघटक चंद्रकांत होळकर, संघटन सचिव रामदास गुरव, प्रशांत चाबुकस्वार आदी उपस्थित होते.

### किरकोळ कारणावरुन पत्नीचा अपमान; पतीविरोधात गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

घरातील किरकोळ कारणावरुन पत्नीचा अपमान करण्यात आल्याची घटना घडली. याप्रकरणी श्रीदेवी अमोल दळवी (वय-३९, रा.शंकर नगर, होटगी रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अमोल दळवी (रा.देना हाऊसिंग सोसायटी, रेणुका नगर, विडी घरकुल, सोलापूर) यांच्या विरोधात एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. लग्नात संसारोपयोगी सामान दिले नाही. मानपान केले नाही. कर्ज फेडण्यासाठी माहेरुन ४ लाख रुपये घेऊन ये असे म्हणत श्रीदेवी दळवी हिला पती अमोल दळवी यांनी सन २०१२ ते १८ मार्च २०२६ या कालावधीत सतत अपमानित करत शिवीगाळ व मारहाण केली. तसेच जिवे मारण्याची धमकी दिली, असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास कांबळे हे करत आहेत.

# जिल्हा परिषदेत नव्या गाड्यांचा ताफा; पदाधिकाऱ्यांचा वाहनतिढा अखेर संपला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ एप्रिल-**

सोलापूरजिल्हा परिषदेतील पदाधिकाऱ्यांच्या वाहनांबाबत निर्माण झालेला तिढा अखेर सुटला. अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांच्या चर्चेनंतर नव्या गाड्यांची निवड निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे लवकरच जिल्हा परिषदेत नव्या गाड्यांचा ताफा दाखल होणार आहे.

जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर दीपक वैद्य यांना देण्यात आलेली जुनी ‘सफारी' गाडी वापरण्यास त्यांनी नकार दिला होता. उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनाही देण्यात आलेली ‘फोक्सवॅगन' कार जीर्ण अवस्थेत असल्याने त्यांनी ती स्वीकारली नाही. प्रशासकीय काळात नवीन गाड्यांसाठी तरतूद करण्यात आल्यामुळे हा प्रश्न काही काळ प्रलंबित होता.

गाड्यांच्या खरेदीसंदर्भात अर्थ व बांधकाम विभागाच्या अखत्यारित चर्चा होऊन अंतिम निर्णय घेण्यात आला. ग्रामीण भागात सतत दौरे करावे लागत असल्यामुळे अध्यक्ष आणि उपाध्यक्षांसाठी महिंद्रा ७०० या एसयुव्हीची निवड करण्यात आली. विषय समिती सभापतींसाठी महिंद्रा स्कॉर्पिओ एन या चार गाड्या घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. पंचायत समिती सभापतींसाठी महिंद्रा बोलेरो या गाड्या खरेदी करण्याचा निर्णय झाला आहे.







### पीए नियुक्तीचा मुद्दा अद्याप प्रलंबित

जिल्हा परिषदेतील पदाधिकाऱ्यांना अद्याप वैयक्तिक सहाय्यक (पीए) नियुक्त करण्यात आलेले नाहीत. विशेष म्हणजे, अध्यक्ष दीपक वैद्य यांनाही पीए उपलब्ध झालेला नाही. या संदर्भात माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्याशी चर्चा झाली. यावर लवकरच निर्णय होण्याची शक्यता आहे.

### पक्षनेत्या रश्मी बागल यांना अधिकार

जिल्हा परिषदेच्या विषय समिती सदस्य निवडीसाठी १५ एप्रिल रोजी विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे. सदस्य निवडीचे अधिकार पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पक्षनेत्या रश्मी बागल यांना दिले आहेत.

## रा. स्व. संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त रविवारी हिंदू संमेलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त हिंदू संमेलन समितीच्यावतीने रविवार दि. १२ एप्रिल रोजी हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती समितीचे अध्यक्ष योगेश सलगर व कार्याध्यक्ष सचिन कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

रविवारी सायंकाळी ६ वाजता बाळीवेस चौक, सोलापूर येथे हे संमेलन होणार आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त हिंदू समाजाला संघटित, सशक्त व जागृत करण्याच्या पवित्र उद्देशाने विविध ठिकाणी भव्य हिंदू संमेलनांचे आयोजन करण्यात येत आहे. या संमेलनांद्वारे समाजामध्ये एकात्मता, संस्कार, राष्ट्रीय भावना व सामाजिक बांधिलकी दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. श्रीनाथ संस्थानचे ह.भ.प.श्रीरंग गहिनीनाथ महाराज औसेकर, हिंदू राष्ट्र सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष धनंजय देसाई, डॉ.सचिन लादे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

या कार्यक्रमामध्ये लाठी-काठी व दांडपट्टा या पारंपरिक युद्धकलेची प्रात्यक्षिके सादरीकरण करण्यात येणार असून, महापुरुषांच्या वेशभूषेत लहान बालकांचा सहभाग देखील आकर्षण ठरणार आहे, असेही त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला योगेश सलगर, शिवानंद सावळगी, देविदास चेळेकर, रवी गोणे आदी उपस्थित होते.

# सोलापूर रेल्वे स्थानकावर आज ५ तासांचा ‘ट्रॅफिक ब्लॉक'

### रेल्वे गाड्यांच्या वेळापत्रकात बदल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ एप्रिल-**

रेल्वे स्थानकावर स्टेबलिंग सायडिंग क्रमांक १ व २ कार्यान्वित करण्यासाठी सिग्नल व दूरसंचार विभागामार्फत विशेष काम हाती घेण्यात आले आहे. यासाठी गुरुवार दि.९ एप्रिल रोजी ट्रॅफिक ब्लॉक घेण्यात येणार आहे. यामुळे अनेक गाड्यांच्या वाहतुकीवर परिणाम होणार असून काही गाड्यांचे मार्गांतर तर काही गाड्या उशिराने धावणार आहेत.

गुरुवारी मुख्य कामासाठी दुपारी १.१५ ते ४.१५‘अंडर ट्रॅफिक ब्लॉक' आणि सायंकाळी ४.१५ ते ६.१५ ‘ट्रॅफिक ब्लॉक' घेण्यात येणार आहे. या काळात गाडी क्रमांक ५७६६२ विजापूर-रायचूर पॅसेंजर ही होटगी-सोलापूर दरम्यान धावणार नाही. ही गाडीविजापूर-होटगी-वाडी मार्गे वळवण्यात आली आहे.

५७६६१ रायचूर-विजापूर पॅसेंजरही वाडी-होटगी मार्गे वळवण्यात येणार असून होटगी-सोलापूर दरम्यान धावणार नाही. प्रवाशांनी प्रवासापूर्वी संबंधित गाड्यांची अद्ययावत माहिती तपासूनच प्रवास करावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे





## ‘उद्योजक राष्ट्रपिता महात्मा फुले' या विषयावर पहिले पुष्प

### ११ ते १४ एप्रिलपर्यंत मिलींद व्याख्यानमाला

### सम्यक विचार मंचचा बौध्दिक उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

येथील सम्यक विचार मंचच्या वतीने गेल्या २६ वर्षांपासून मिलींद व्याख्यानमालारुपी बौध्दिक उपक्रम राबविण्यात येत आहे. दि.११ ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत दररोज सायंकाळी ६.३० वाजता डॉ.निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे आयोजित केलेल्या या व्याख्यानमालेत विक्रम सोनवणे हे ‘उद्योजक राष्ट्रपिता महात्मा फुले' या विषयावर पहिले पुष्प गुंफणार आहेत, अशी माहिती मंचचे अध्यक्ष विजयानंद भालशंकर, कार्याध्यक्ष सुधीर चंदनशिवे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शनिवार, दि.११ एप्रिल रोजी सायंकाळी ६:३० वाजता आमदार राजू खरे यांच्या हस्ते, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अरुणकुमार इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली आणि महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांच्या प्रमुख उपस्थितीत या व्याख्यानमालेचे उद्घाटन करण्यात येणार आहे. रविवार, दि.१२ एप्रिल रोजी प्रा.पंकज भारतीय यांचे भारतीय संविधान आणि राष्ट्रीय एकात्मता या विषयावर व्याख्यान होणार आहे. डॉ. औदुंबर मस्के हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. यावेळी जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

सोमवार, दि.१३ एप्रिल रोजी चंद्रप्रकाश शिंदे यांचे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक क्रांतीचे सिध्दांत या विषयावर व्याख्यान होणार आहे. ॲड. संजीव सदाफुले हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

मंगळवार दि. १४ एप्रिल रोजी भन्ते सुगत शांतेय यांचे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेली धम्मक्रांती या विषयावर व्याख्यान होणार आहे. सेवानिवृत्त मुख्य अभियंता प्रभाकर भालेराव हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. महापौर विनायक कोंड्याल यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे, असेही त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला रविकांत ढावरे, शांतीकुमार कांबळे, अनिल जगझाप, रमेश सुरवसे, चंद्रकांत कोळेकर आदी उपस्थित होते.

## मिलिटरी कॉलेज प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

**सोलापूर दि. ८ एप्रिल-**

पुणे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत ‘‘राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून'' प्रवेशपात्रता परीक्षा दिनांक ०७ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे. सदर परीक्षेसाठी आवेदनपत्र स्वीकारण्याच्या अंतिम मुदतीत बदल करण्यात आला आहे. पूर्वी आवेदनपत्र स्वीकारण्याची अंतिम तारीख दिनांक ०५ एप्रिल २०२६ होती. सदर मुदत वाढवून आता दिनांक १५ एप्रिल २०२६ पर्यंत करण्यात आली आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे आयुक्त महेश चोथे यांनी दिली आहे. तरी इच्छुक व पात्र उमेदवारांनी सुधारित मुदतीत आपली आवेदनपत्रे सादर करावीत, असेही त्यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

# जिल्हा परिषदेत बदली प्रक्रिया; सीईओनी केले वेळापत्रक जाहीर



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ एप्रिल-**

सोलापूर जिल्हा परिषदेत ५ आणि ६ मे २०२६ असे दोन दिवस बदली प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेतील गट-क व गट-ड संवर्गीय कर्मचाऱ्यांच्या सन २०२६ मधील सर्वसाधारण बदल्यांचे वेळापत्रक सीईओ अर्थात मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी जाहीर केले आहे. १८ मे २०२६ रोजी तालुकास्तरीय बदल्या होणार आहेत, असे सांगण्यात आले. दरम्यान, कर्मचाऱ्यांची तात्पुरती व अंतिम ज्येष्ठता यादी २० एप्रिल २०२६ पूर्वी प्रसिध्द करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

५ मे २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ यावेळेत सामान्य प्रशासन विभाग, ग्रामपंचायत, आरोग्य, महिला व बाल कल्याण आणि शिक्षण विभागातील विविध संवर्गाच्या बदल्या. ६ मे २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ यावेळेत अर्थ, कृषी, बांधकाम (१ व २), जलसंधारण, ग्रामीण पाणीपुरवठा आणि पशुसंवर्धन विभागातील बदल्या. १८ मे २०२६ रोजी पंचायत समिती स्तरावरील ग्रामपंचायत अधिकारी, परिचर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या बदल्यांची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे.

सामान्य प्रशासन विभागातील सहायक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, वरिष्ठ व कनिष्ठ सहायक, परिचर, वाहनचालक, ग्रामपंचायत विभागातील विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, आरोग्य विभागातील औषध निर्माण अधिकारी, आरोग्य पर्यवेक्षक, आरोग्य सेवक, सेविका, सहायक, सहायिका, महिला व बालकल्याण विभागातील सहा. बालविकास प्रकल्प अधिकारी, अंगणवाडी पर्यवेक्षिका, शिक्षण विभागातील विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, अर्थ विभागातील सहा. लेखाधिकारी व अन्य, कृषी, जलसंधारण, ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील कृषी अधिकारी, बांधकाम विभागातील अभियंता, आरेखक, पशुसंवर्धन विभागातील सहा. पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षकांच्या प्रशासकीय व विनंती बदल्या होणार आहेत.

# समृध्द पंचायतराज अभियानाची चौकशी

### उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांच्यासह बीडीओ इतर अधिकाऱ्यांची लातूर जिल्ह्यासाठी निवड

### वीस दिवस जिल्ह्यात मुक्काम; गावागावांत जाऊन कामांचे प्रत्यक्ष मूल्यांकन

### इतर जिल्ह्यातील अधिकाऱ्यांचे पथक १५ एप्रिलपासून सोलापुरात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.८ एप्रिल-**

राज्यात राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या अंमलबजावणीची आता कसून तपासणी होणार असून, सोलापूर जिल्ह्यात १५ एप्रिलपासून बाहेरील अधिकाऱ्यांचे विशेष पथक दाखल होणार आहे. हे पथक तब्बल वीस दिवस जिल्ह्यात ठाण मांडून विविध ग्रामपंचायतींमध्ये राबविण्यात आलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करणार आहे. या तपासणीमुळे जिल्ह्यातील ग्रामविकास कामांची खरी गुणवत्ता समोर येणार असून, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्राम पंचायतींना राज्यस्तरावर मानांकन मिळण्याची संधी आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून राज्यभर राबविण्यात आलेल्या या अभियानाची अंमलबजावणी सोलापूर जिल्ह्यात पूर्ण झाली असून, आता त्याच्या गुणवत्तेची आणि परिणामकारकतेची पडताळणी होणार आहे. यासाठी जिल्ह्याबाहेरील जिल्हा परिषदेतील अधिकारी विशेष तपासणी पथक म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत.

दरम्यान, सोलापूर जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांच्यासह अकरा तालुक्यातील सर्व बीडीओ तसेच मुख्यालयातील इतर अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांची लातूर जिल्ह्याच्या तपासणीसाठी निवड करण्यात आली आहे. १५ ते २० दिवसांच्या कार्यकाळात प्रत्येक गावाची तपासणी करून त्याचा अहवाल शासनाला सादर केला जाणार आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान
जागर बदलाचा, समृद्ध महाराष्ट्राचा

### गावागावांत प्रत्यक्ष पाहणी

या पथकातील अधिकारी प्रत्येक तालुक्यातील किमान २० गावांना भेट देऊन तेथील विकासकामांची सखोल पाहणी करणार आहेत. प्रत्यक्ष कामांची गुणवत्ता, अंमलबजावणीची पद्धत आणि लाभार्थ्यांवर झालेला परिणाम याच्या आधारेच गुणांकन दिले जाणार आहे.

### नोंदवलेल्या माहितीची पडताळणी

ग्रामपंचायतींनी अभियानाच्या अधिकृत वेबसाईटवर लॉगिन करून सादर केलेल्या स्वमूल्यांकन प्रस्तावांचीही कसून तपासणी केली जाणार आहे. जिल्हा परिषदेच्या विविध विभाग प्रमुखांनी सादर केलेली माहिती अचूक आहे की नाही, याची खातरजमा देखील हे पथक करणार आहे.

### प्रशासन सतर्क; सीईओंचा सतत आढावा



सध्या जिल्हा परिषदेतील विभागप्रमुखांकडून ग्रामपंचायतींनी अपलोड केलेल्या माहितीची प्राथमिक तपासणी सुरू आहे. या संपूर्ण प्रक्रियेवर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम सातत्याने लक्ष ठेवून असून, वेळोवेळी आढावा बैठका घेत आहेत.

### कामांची पाहणी करुन गुणांकन दिले जाणार

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या मूल्यांकनासाठी १५ एप्रिलपासून इतर जिल्ह्यातील पथक सोलापुरात दाखल होणार आहे. प्रत्येक तालुक्यातील निवडक गावांमध्ये जाऊन कामांची पाहणी करून त्यानुसार गुणांकन दिले जाईल. आमच्या विभागाची निवड लातूर जिल्ह्यासाठी करण्यात आले असून तेथील कामकाजाची पाहणी या २० दिवसात केली जाणार आहे.

**- सूर्यकांत भुजबळ, डेप्युटी सीईओ, ग्रामपंचायत विभाग, जि.प. सोलापूर**


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४०७

**तुका म्हणे मोल।
गुणा मिथ्या फिके बोल।।**

चांगले आणि वाईट हे मानवातील दोन अविभाज्य भाग आहेत. चांगल्याला गुण व वाईटाला अवगुण म्हटले जात असले तरी चांगला माणूसही वाईटपणाचा अवगुण सहजासहजी सोडत नाही. अवगुणांना झाकून चांगल्या गुणांची प्रसिध्दी मिळवण्याचा माणूस प्रयत्न करतो. विशेष म्हणजे अनेक अवगुणी लोकांचे अनेक ठिकाणी कौतुकही होते. भितीपोटी किंवा स्वार्थापोटी अनेक लोक खऱ्या गुणी लोकांना डावलून अवगुणी लोकांचे कौतुक करतात. कसल्याही प्रकारचा गुण नसतांनाही त्यांचे गुणवान म्हणून कौतुक करणे म्हणजे गुणांचा अवमान करणे होय. अशा अवगुणी माणसालाही आपले कौतुक करून घेताना लाज वाटत नाही, याचे आश्चर्य वाटते. अशा अवगुणी लोकांचे कौतुक होत असले तरी माघारी का असेना पण लोक यांच्या अवगुणाबद्दल बोलत असतात. गुण हे गुणच असल्याने खऱ्या अर्थाने त्याचेच मोल, कौतुक होते, आणि जे खोटे आहे, ते फोलकट, खोटारडेच आहे. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, **तुका म्हणे मोल। गुणा मिथ्या फिके बोल।।**



अशी अनेक व्यासपीठं आहेत किंवा असे अनेक पुरस्कार देणारे आहेत की जे केवळ व्यवहारापोटी कोणाचेही कौतुक करतात. पात्रता नसतांनाही त्यांचे कौतुक, गुणगाण करतात. आपले कौतुक व्हावे म्हणून अनेक लोक धडपडतही असतात. आपल्यात गुणांची वाढ ही आपले कौतुक व्हावे म्हणून करायची नसते तर आपण आपल्या नजरेत चांगले स्थान मिळावे म्हणून करायची असते. त्याचबरोबर आपण क्षणा-क्षणाला माणूस म्हणून जगत आहोत याचे समाधान वाटण्यासाठी गुणांचा सांभाळ करायचा असतो. जो व्यक्ती प्रत्येक क्षणाला माणूस म्हणून जगतो त्याला कोणाच्या कौतुकाची गरज नसते. सूर्याला तू प्रकाशमान आहेस, असे म्हणण्याची आवश्यकता नाही. कोणी त्याला काहींही म्हटले तर तो प्रकाशमान आहे, हे जगत मान्य आहे. त्याची सत्यता कोणी लपवू शकत नाही. त्याचप्रमाणे आपणाला कोणी कांहीही म्हटले तरी आपल्या कर्तव्याचे आपण साक्षीदार झालो तरी पुरेसे असते. आपले गुण हीच खऱ्या अर्थाने आपल्या आपुलकीची पुंजी असते. लोकांच्या उसण्या मोठेपणावर जगण्याची अपेक्षा माणसाने कधीच करू नये. समोर जरी लोक बरे बोलून गेले तरी सत्याची चर्चा माघारी का असेना पण झाल्याशिवाय राहत नाही. कधी-कधी लोक आपल्या चांगुलपणालाही नांव ठेवतात. त्यामुळे नाराज होण्याचे कारण नसावे. लोकांसाठी चांगुलपणा किंवा गुण जोपासायचे नसतात, जर ते आपल्यासाठी जोपासायचे असतात. आपण कसेही वागलो तरी सासू-सासरे नांव ठेवतातच म्हणून सुनेने गुण सोडून अवगुणाच्या मार्गावर जाणे चुकीचे असते. इतर लोक गुण जोपासोत किंवा नाही, आपण मात्र गुण जोपासलेच पाहिजेत. त्याचबरोबर त्यात सातत्याने वाढ होईल याकडेही लक्ष दिले पाहिजे. जय जय राम कृष्ण हरी।

**ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : गुरूवार,**
**दि. ८ एप्रिल २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - चैत्र शु. द्वादशी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- मघा (९.५६)**
**योग - गंड (१८.२४)**
**करण - बव (१०.००)**
**राहू काल : गुरूवार**
**दु. १.२० ते ३.००**


**दिनविशेष : १६९५: पंडितकवी वामनपंडित यांनी भोगाव येथे समाधी घेतली.**
**१८२८: थोर समाजसुधारक गणेश वासुदेव जोशींचा जन्म.**
**१९४८: हिंदी चित्रपट अभिनेत्री जया भादुरी यांचा जन्म.**
**२००१: पत्रकार आणि स्तंभलेखक बेहराम कॉंट्रॅक्टर ऊर्फ बिझी बी यांचे निधन.**
**२००९: लोककलांचे अभ्यासक आणि गीतकार अशोकजी परांजपे यांचे निधन.**

# शिक्षकांवर टांगती तलवार; मार्चचे वेतन थांबणार?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

जिल्ह्यातील ३८२ माध्यमिक शाळांच्या हलगर्जीपणामुळे हजारो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मार्च महिन्याचे वेतन रोखण्याचा निर्णय माध्यमिक शिक्षण विभागाने घेतला आहे. अतिरिक्त शिक्षक व कर्मचाऱ्यांची माहिती वेळेत न सादर केल्याने ही कारवाई करण्यात आली आहे.२०२५-२६ वर्षाच्या संचमान्यतेनुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांची माहिती ऑनलाईन पद्धतीने भरण्याचे स्पष्ट आदेश शिक्षण विभागाने दिले होते. वारंवार सूचना, तसेच विशेष शिबिराचे आयोजन करूनही अनेक शाळांनी या प्रक्रियेकडे दुर्लक्ष केले.

जिल्ह्यातील एकूण १,००४ माध्यमिक शाळांपैकी ६२२ शाळांनी आवश्यक माहिती वेळेत सादर केली; मात्र उर्वरित ३८२ शाळांनी अंतिम मुदत (६ एप्रिल) उलटूनही माहिती भरली नाही. परिणामी, संबंधित शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शिक्षण विभागाच्या सूचनांनुसार, ज्या शाळांमध्ये अतिरिक्त पदे आहेत त्यांची माहिती समायोजन प्रक्रियेसाठी अत्यावश्यक आहे. मात्र, मुख्याध्यापकांकडून याकडे दुर्लक्ष झाल्याचे स्पष्ट झाले आहे.




वारंवार सूचना देऊनही माहिती सादर करण्यात आली नाही. त्यामुळे मार्च महिन्याचे वेतन रोखण्याचा निर्णय घेतला आहे. सोमवारी विशेष शिबिर आयोजित करूनही प्रतिसाद मिळाला नाही.

**–सचिन जगताप,**
शिक्षणाधिकारी माध्यमिक विभाग

**परिणाम शिक्षकांवर, जबाबदारी प्रशासनावर**

या निर्णयामुळे थेट परिणाम शिक्षक व कर्मचाऱ्यांवर होणार असला, तरी त्यामागे शाळा प्रशासनाची निष्काळजी भूमिका कारणीभूत असल्याची चर्चा शिक्षण क्षेत्रात सुरू आहे. आता संबंधित शाळांनी तातडीने माहिती सादर केल्यास पुढील कारवाई टळण्याची शक्यता आहे.

# अमृतवचन : जैन मुनी वीरसागर महाराज

## बाहेरचा डामडौल सोडा, अंतर्मन शुध्द करा



मंदिरातील मूर्ती ही केवळ दर्शनासाठी नसून ती आत्मचिंतनाचे माध्यम आहे. श्रावकांनी मूर्तीकडे पाहताना त्यात स्वतःचे प्रतिबिंब शोधण्याचा प्रयत्न करावा. अभिषेक, पूजन आणि दर्शन या सर्व क्रियांचा खरा उद्देश अंतःकरणाची निर्मळता साधणे हाच आहे. बाह्य आडंबरापेक्षा मनाची शुद्धता महत्त्वाची असून, त्याद्वारेच खऱ्या अर्थाने धर्म साधना शक्य असल्याचे निर्यापक श्रमण मुनिश्री १०८ वीरसागरजी महाराज यांनी स्पष्ट केले.

वालचंद शिक्षण समूहाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या मंगल प्रवचनात मुनिश्रींनी जैन दर्शनाचे वैज्ञानिक आणि आध्यात्मिक स्वरूप अत्यंत प्रभावीपणे मांडले. भक्तीमय वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यात श्रावकांना मार्गदर्शन करताना त्यांनी बाह्य क्रियांपेक्षा आंतरिक शुद्धतेवर अधिक भर दिला. जैन धर्मातील अरिहंत, सिद्ध, साधू आणि केवली या चार मंगल तत्त्वांचे विवेचन करताना त्यांनी सांगितले की, जो स्वतःच्या आंतरिक शत्रूंवर विजय मिळवतो, तोच खरा विजेता होय. आत्मकल्याणासाठी स्वार्थत्याग, नम्रता आणि अंतरंगातील श्रद्धा या गुणांची जोपासना करणे आवश्यक आहे.याप्रसंगी मुनिश्रींनी विद्यार्थी आणि तरुण पिढीला तंत्रज्ञानाच्या वापराबाबत विशेष संदेश दिला. मोबाईल आणि इंटरनेटच्या अतिरेकामुळे जीवनशैली विस्कळीत होत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. तंत्रज्ञानाचा उपयोग प्रगतीचे एक साधन म्हणून करावा, मात्र त्याचे गुलाम होऊ नये, असा मोलाचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. संयमित जीवनशैली स्वीकारूनच आत्मपरिवर्तन घडवता येते, या विचाराने उपस्थित श्रावकांमध्ये आध्यात्मिक ऊर्जेचा संचार झाला.

# सर्वोदयी श्री महावीर विधान भक्तिभावात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

वालचंद शिक्षण समूहाच्या नूतन परिसरात 'सर्वोदयी श्री महावीर विधान' हा आध्यात्मिक व संस्कारमूल्यांनी समृद्ध कार्यक्रम भक्तिभावात पार पडला.

जैन तत्त्वज्ञानावर आधारित अशा विधानातून आत्मशुद्धी, संयम आणि अंतर्मुखता यांचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमात आचार्य विद्यासागर महाराज यांच्या तैलचित्राचे अनावरण डॉ. रणजित गांधी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार विजयकुमार देशमुख, वैभव गांधी, पृथ्वीराज गांधी, ब्रिजेश गांधी, भूषण शहा, पराग शहा, यश गांधी उपस्थित होते.





आ. देशमुख यांनी मुनीश्रींचे दर्शन घेऊन श्रीफळ अर्पण केले व उपस्थितांना संबोधित करताना मुनी, गुरू समाजाला भक्ती व सदाचाराचा मार्ग दाखवत आहेत; त्यांच्या शिकवणीप्रमाणे जीवन जगणे हीच खरी साधना आहे, असे त्यांनी सांगितले. मुनीश्री वीरसागरजी महाराज यांनी आ. देशमुख यांना सोलापुरात जीवदया क्षेत्रात प्रेरणा मिळावी यासाठी गोशाळा उभारणीसारखे कार्य हाती घेण्याचे आशीर्वचन दिले.

**शिक्षणासोबत धार्मिक संस्कारांच्या जोडीचा अभाव**

मुनीश्री धवलसागरजी महाराज म्हणाले, श्रावकांनी स्वतःचा आध्यात्मिक व सांस्कृतिक वारसा जाणून घेण्याची आवश्यकता आहे. पूर्वी शिक्षणासोबत धार्मिक संस्कारांची जोड दिली जात होती; मात्र आज त्याचा अभाव जाणवतो. शिक्षणाचा खरा उद्देश केवळ बुद्धीविकास बरोबर जीवनमूल्यांची जडणघडण आहे. धर्म समजून घेतल्याशिवाय त्याचे आचरण शक्य नाही. आचार्य विद्यासागर महाराज यांच्या हायकू स्वरूपातील काव्यपंक्तींचा उल्लेख करताना, ''धर्म का फल बाद में नहीं, अभी; कर्म का क्षय, या ओळींम धून वर्तमानातच आत्मशुद्धी साधण्याचा संदेश त्यांनी दिला.''

# जागेची मोजणी करत असताना मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

वडिलोपार्जित जागेची मोजणी करीत असताना त्या जागेच्या कारणावरून एका व्यक्तीला शिवीगाळ करून सळईने व दगडाने मारहाण करण्यात आली आहे. या ते जखमी झाले आहेत.

या हकीकत अशी की, दि. ७ एप्रिल रोजी खाटीक गल्ली येथे फिरोज म.रफिक कुरेशी, वय ३२, रा. ६६५ मतीन अपार्टमेंट, बुधवार बाजार, सोलापूर यांच्या वडिलोपार्जित जागेची मोजणी करीत असताना त्या जागेच्या कारणावरून सरफराज कुरेशी, पीर अहमद कुरेशी, सलमा सर्फराज कुरेशी यांनी फिरोज कुरेशी याला मोजणी करून न देता, शिवीगाळ करून सळईने व दगडाने मारहाण करून जखमी केले. याबाबत जेलरोड पोलीस ठाण्यात दि. ७ एप्रिल रोजी तिघां विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास मस्के करत आहेत.



# पंढरपुरात नवीन आयकर कायद्यावर मार्गदर्शन

**पंढरपूर, दि. ८ एप्रिल-**

पंढरपूर व्यापारी महासंघ व व्यापारी कमेटी यांच्या वतिने नविन आयकर कायदा २०२५ हा १ एप्रिल २०२६ पासून लागू झाला असून या नविन कायद्याची माहीती व्यापारी, उद्योजक, नोकरदार यांना व्हावी यासाठी कर्मयोगी सभागृह अर्बन बँक पंढरपूर येथे मार्गदर्शन शिबिर आयोजीत केले होते.

पुणे विभागाचे ॲडीशनल कमिशनर (इन्कम टॅक्स) राजेश गवळी (आयआरएस) यांनी सुमारे एक तासांहून अधिक वेळात नविन कायद्या बाबत मार्गदर्शन केले. तरूण व्यापारी उद्योजकांनी आयकर विभागाच्या वेबसाईट व पोर्टल वरून आपल्याला हव्या त्या भाषेमधुन माहीती घेऊन राष्ट उभारणीच्या कार्यात आपले योगदान द्यावे असे आवाहन राजेश गवळी यांनी केले. कार्यक्रमास पंढरपूर अर्बन बँकेचे चेअरमन सतिश मुळे, उमेश विरधे, सुभाष पाटील, सत्यविजय मोहोळकर, शिरीष पारसवार, सी.ए. संजिव कोठाडीया, संजय अभ्यंकर, सोमनाथ डोंबे, महावीर फडे, रा.पा.कटेकर, राजगोपाल भट्टड, दिपक शेटे उपस्थित होते.

# झेडपीच्या उत्पन्नवाढीसाठी नेहरु वसतिगृहाच्या जागी बहुमजली संकुल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

शहराच्या हार्ट ऑफ सिटीमध्ये म्हणजेच पार्क चौकात असलेले नेहरु वसतिगृहाची इमारत पाडून तेथे बहुमजली संकुल उभारण्याचा प्रस्ताव तयार करा, अशा सूचना सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूर जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे नेहरु वसतिगृह आता इतिहासजमा होणार आहे.



जिल्हा परिषदेच्या नवनिर्वाचित पदाधिकारी व सदस्यांची पालकमंत्री गोरे यांनी बैठक घेतली. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इत पवार, समाजकल्याण सभापती संस्कृती सातपुते, आरोग्य व शिक्षण सभापती चेतनसिंह केदार, पक्षनेत्या रश्मी बागल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, म हापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे उपस्थित होते.

जिल्हा परिषदेत कामानिमित्त येणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला मान द्या. त्याचे काम होईल याकडे पहा, अशा सूचनाही पालकमंत्री गोरे यांनी यावेळी दिल्या. दरम्यान, जि.प.चे अध्यक्ष दिलीप वैद्य यांनी विकास कामासाठी निधी द्या, अशी मागणी केली. उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी झेडपीचे उत्पन्न वाढले पाहिजे याबाबत उपाययोजना सुचवल्या. दिव्यांग कल्याण विभागाचे कार्यालय पहिल्या मजल्यावर आहे. दिव्यांग बांधवांच्या दृष्टीने हे अडचणींचे ठरत आहे. त्यामुळे लिफ्टची सोय करावी, अशी म ागणी समाजकल्याण विभागाच्या सभापती संस्कृती सातपुते यांनी केली. आरोग्य व शिक्षण सभापती चेतनसिंह केदार यांनी शहरातील शाळांचा स्मार्ट स्कूलच्या धर्तीवर विकास करणे गरजेचे असल्याचे सांगितली. जिल्हा परिषदेच्या शहरात १२ शाळा आहेत. या शाळा मोक्यांच्या जागी आहेत. यापूर्वी महापालिकेने या शाळांची मागणी केली आहे. पण जागेची किंमत मोठी असल्यामुळे महापालिकेकडे या शाळा कोणत्याही परिस्थितीत वर्ग केल्या जाणार नाहीत. या शाळांचा दर्जा वाढविण्यासाठी सुविधा दिल्या जातील, असेही पालकमंत्री गोरे यांनी सांगितले.

**जि.प.सदस्यांना वर्षाला प्रत्येकी १ कोटींचा निधी**

जिल्हा परिषदेच्या सर्व जागांना कुंपण बांधावे. जिल्हा परिषदेचे उत्पन्न वाढविण्यासाठी जागांचा विकास केला जाईल. पण बीओटीवर या जागा दिल्या जाणार नाहीत. माझ्याकडे ग्रामविकास खाते असल्यामुळे जिल्हा परिषदेच्या विकास कामाला निधी कमी पडू दिला जाणार नाही. प्रत्येक सदस्याला वर्षाला एक कोटी रुपयांचा विकास निधी मिळेल, असेही पालकमंत्री गोरे यांनी सांगितले. दरम्यान, सोलापूर शहरासह विविध तालुक्यात मोक्याच्या ठिकाणी जिल्हा परिषदेच्या जागा आहेत. या जागांचा विकास केल्यावर जिल्हा परिषदेच्या तिजोरीत भर पडण्यास मदत होईल.



# बनावट दारू तयार करणाऱ्या कारखान्यावर पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

बनावट दारू तयार करणाऱ्या कारखान्यावर पोलिसांनी मोठी कारवाई केली असून या कारवाईदरम्यान जप्त करण्यात आलेले मुद्देम ाल म्हणजेच दारू हे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली नष्ट करण्यात आले आहे.

यातील दाखल गुन्हा क्रमांक ३५/२०२६ बनावट दारू तयार करणाऱ्या कारखान्यावर वळसंग पोलिसांनी मोठी कारवाई केली असून सदर कारवाईदरम्यान जप्त करण्यात आलेले मुद्देमाल म्हणजेच दारू हे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली नष्ट करण्यात आले आहे. दरम्यान ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक यावलकर, एच डी पी ओ यामावर, यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. एक्साईज पोलीस इन्स्पेक्टर अविनाश घाटे यांनी दोन पंचासमक्ष सदर गुन्ह्यातील मुद्देमाल नष्ट केले सदर प्रक्रिया ही पूर्णतः कायदेशीर तरतुदीचे पालन करून पार पडण्यात आले असून अशा प्रकारच्या अवैध दारू निर्मितीवर कठोर कारवाई करणार असल्याचा इशारा यावेळी पोलिसांच्या वतीने देण्यात आले. दरम्यान सदरची यशस्वी कामगिरीही वळसंग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल डोंगरे, मुद्देमाल कारकून महिला हवालदार अनिसा पटेल, पोलीस हवालदार अशोक पाटील, पोलीस हवालदार श्रीशैल माळी, पोलीस हवालदार संतोष चव्हाण,पोलीस कॉन्स्टेबल अंबादास दूधभाते पोलीस हवालदार रामदास मालचे, तसेच पोलीस कॉन्स्टेबल प्रसाद मांढरे, यांनी केली.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहास प्रारंभ

## संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन; १४० पुस्तकांसह ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले तसेच विशेष ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटनही पार पडले.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक समता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी, या सप्ताहाचे उद्घाटन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राचे अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, अध्यासन समन्वयक डॉ. गौतम कांबळे, ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. अनिल घनवट, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे तसेच विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यापीठाच्या कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्रोत केंद्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार, साहित्य व सामाजिक चळवळींवर आधारित विशेष ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. १४ एप्रिलपर्यंत सर्वांसाठी खुले असलेल्या या प्रदर्शनात एकूण १४० ग्रंथांचा समावेश असून, भारतीय संविधान, 'बहिष्कृत भारत', 'मूकनायक', डॉ. आंबेडकर यांचे लेखन व भाषण खंड तसेच 'सोलापूरचे ऋणानुबंध' यांसारख्या महत्त्वपूर्ण पुस्तकांचा समावेश आहे.

यावेळी प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा आणि राजाभाऊ सरवदे यांनी आपल्या मनोगतातून सप्ताहाच्या शुभेच्छा देत, १४ एप्रिलपर्यंत आयोजित विविध कार्यक्रमांमध्ये विद्यार्थी, प्राध्यापक व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले.

# 'मार्ग हा मुक्तीचा' ग्रंथाचे रविवारी होणार प्रकाशन

## श्री जगद्गुरू पंचाचार्यांचे मिळणार दिव्य सान्निध्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

श्रीमत् काशी ज्ञानसिंहासनाधीश्वर 'विद्यावाचस्पती' श्री १००८ जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी 'वीरशैवपंचसूत्रीयम्' हे संस्कृत महाकाव्य रचले. या जागतिक दार्शनिक ग्रंथाचा मराठी अनुवाद 'मार्ग हा मुक्तीचा' या ग्रंथाचे प्रकाशन होणार असल्याची माहिती डॉ. अनिल सर्जे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



श्री जगदूरू पंचाचार्य यांच्या अमृत हस्ते हा समारंभ रविवार दि. १२ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ४ वाजता वेळापूर येथे होणार आहे. या ग्रंथाचा अनुवाद आणि संपादन श्री काशी विश्वाराध्य संत साहित्य संशोधन केंद्राचे संचालक डॉ. अनिल सर्जे यांनी केले आहे. श्री ष. ब्र. १०८ मुक्तेश्वर शिवाचार्य वेळापूरकर महाराज यांचा जन्म अमृत महोत्सव आणि पट्टाभिषेक सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने होत असलेल्या धर्मसभेत प्रकाशन सोहळा होणार आहे. मूळ संस्कृत ग्रंथातील स्वतः रचलेले श्लोक सामान्य कन्नड भाषिकांना समजावेत म्हणून परमपूज्य महास्वामीजींनी यावर कन्नड प्रवचने लिहिली. या कन्नड ग्रंथाचा मराठी अनुवाद 'मार्ग हा मुक्तीचा' आहे.

'वीरशैव अभंगगाथा' हा तीन खंडांचा प्रकल्प आहे. पहिल्या खंडाचे संपादन डॉ. शे. दे. पसारकर यांनी केले आहे. ७६८ पानांच्या या ग्रंथात आठ अभंगकारांच्या ४१५६ अभंगांचा समावेश आहे. वेळापूर येथील कार्यक्रमात 'वीरशैव अभंगगाथा' खंड दोनचा लोकार्पण सोहळा श्री जगद्रूरू पंचाचार्यांच्या अमृतहस्ते होणार आहे. या गाथेम ध्ये काशीनाथ सुपेकर, विश्वनाथ सुपेकर, बार्शी, श्रीगुरू गंगाधर स्वामी वडांगळीकर नाशिक, श्रीगुरू शंकर मृगेंद्र, श्री बुद्धिमठ अमरावती, गुरुभक्त बाळाबुवा काशीनाथ कबाडी, वडांगळी, नाशिक, चन्नप्पा वारद, नळेगाव, लातूर या संतांचे अभंग आहेत. ७४४ पानांचा हा ग्रंथ असून ४४०७ अभंगांचा समावेश आहे. या ग्रंथाचे संपादन उषा शेषनारायण (काडोदे) पसारकर यांनी केले आहे. सहाय्यक संपादन दौलतराव साखरे आणि डॉ. अनिल सर्जे यांनी केले आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन वेदांताचार्य श्री ष. ब्र. सदाशिव शिवाचार्य स्वामीजी वेळापूरकर यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस श्री गुड्डापूर दानम्मा देवी मंदिर समितीचे विश्वस्त सिद्धया स्वामी हिरेमठ, काशीपीठाचे शिष्यवृत्ती विभाग प्रमुख रेवणसिद्ध वाडकर, श्री काशी विद्यापीठ परीक्षा विभाग प्रमुख राजेंद्र बलसुरे, सिद्धू हिरेमठ आदी उपस्थित होते.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### वखारिया विद्यालयात आदर्श शिक्षक नागनाथ शेरकर यांचा सत्कार

**बार्शी, दि. ८ एप्रिल-**

उपळे दुमाला येथील वखारिया विद्यालयात जि. प. शाळा मुले येथील सहशिक्षक नागनाथ शेरकर यांना बार्शी तालुका पंचायत समिती यांच्याकडून आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला. त्याबद्दल विद्यालयात नागनाथ शेरकर यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि पुस्तकांचा संच भेट देऊन सत्कार करण्यात आला. प्रारंभी आदर्श शिक्षक नागनाथ शेरकर, केंद्रप्रमुख तथा केंद्रीय मुख्याध्यापक हनुमंत सोनवणे आणि विद्यालयाचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांचे हस्ते कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. दयानंद रेवडकर यांच्या हस्ते नागनाथ शेरकर आणि केंद्रप्रमुख हनुमंत सोनवणे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी नागनाथ शेरकर यांनी सत्कार स्वीकारताना कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी स्थापन केलेल्या या विद्यालयातून माझे शिक्षण झाले. ज्या विद्यालयात शिक्षण घेतले त्याच विद्यालयाकडून माझा सत्कार होणे हे मी भाग्याचे समजतो. मी जो काही आज आहे ते माझी आई आणि माझे गुरुजन यांनी केलेल्या संस्कारामुळेच मी अंधश्रद्धा मानत नाही. परंतु माझी श्रद्धा माझे आई वडील गुरुजन आणि माजी विद्यार्थी यांची वर नक्की आहे अशी भावना व्यक्त केली. प्रास्ताविक एल.एन. महाले यांनी केले तर सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख आर. आर.लंकेश्वर यांनी तर आभार रेवणसिद्ध दुलंगे यांनी मानले.



### मनपा प्राथमिक शिक्षण मंडळातर्फे आ. देवेंद्र कोठे यांचा सत्कार

**सोलापूर, दि.८ एप्रिल-**

आ. देवेंद्र कोठे यांचा सत्कार सोलापूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षणाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, सतीशकुमार दरेकर, यल्लालिंग चाबुकस्वार, विलास शिंदे, भालचंद्र साखरे आदी उपस्थित होते.



### जनता बँकेच्या उपाध्यक्षपदी फेरनिवड झाल्याबद्दल ॲड. कुलकर्णी यांचा सन्मान

**माळशिरस, दि. ८ एप्रिल-**

श्री शंकर कारखान्याचे व्हाइस चेअरमन,श्रीरामदेव देवस्थान समितीचे अध्यक्ष,हनुमान शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष, ॲड. मिलिंद कुलकर्णी यांची जनता बँकेच्या उपाध्यक्षपदी फेरनिवड झाल्याबद्दल सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेचे संचालक धनंजय मस्के, नंदकुमार घाडगे, डॉ.उदय पवार,मुख्याध्यापक धनंजय केसकर, पाटबंधारे विभागाचे विपिन ननवरे, सर्जेराव चव्हाण आदी उपस्थित होते



### वटवृक्ष देवस्थान समितीची सेवा पाहून धन्य झालो : जिल्हाधिकारी

**अक्कलकोट, दि. ८ एप्रिल-**

श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीची भक्ती, सेवा, उपक्रम पाहून धन्य झालो असल्याचे मनोगत सोलापूर जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस.यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरास भेट देवून श्री स्वामी समर्थांचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीच्या सेवा कार्याबद्दल बोलताना सोलापूर जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस.यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांना श्री स्वामी समर्थांच्या १४८ व्या पुण्यतिथी महोत्सवास व श्री स्वामी समर्थांच्या ऐतिहासिक व पारंपारीक पालखी सोहळ्यास उपस्थित राहण्यास निमंत्रीत केले. यावेळी तहसीलदार विनायक मगर, गटविकास अधिकारी शंकरराव कवीतके, अक्कलकोट नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रमाकांत डाके, उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दीपक भिताडे, अक्कलकोचे मंडल अधिकारी जुबेर नदाफ, तलाठी एस.डोईफोडे, मंदीर समितीचे विश्वस्त महेश गोगी, दर्शन घाटगे, श्रीशैल गवंडी, रमेश शिंदे, प्रा.शिवशरण अचलेर, श्रीकांत मलवे, विपूल जाधव उपस्थित होते.

# ग्रामीण मुलींना मिळणार मोफत एमएससीआयटी, टॅली प्रशिक्षण

**सोलापूर जिल्हा परिषदेचा मोठा निर्णय**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

ग्रामीण भागातील मुलींना डिजिटल युगाशी जोडत त्यांना रोजगारक्षम बनविण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषदेने महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले आहे. महिला व बालविकास विभागामार्फत इयत्ता सातवी उत्तीर्ण मुलींसाठी एमएस-सीआयटी आणि टॅलीचे मोफत संगणक प्रशिक्षण देण्याची योजना राबविण्यात येत असून, २०२६-२७ या वर्षात तब्बल ४ हजार मुलींना या योजनेचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे ही योजना ग्रामीण मुलींसाठी शिक्षणाबरोबरच रोजगाराच्या नव्या संधी उघडणारी ठरत असून, डिजिटल सक्षमीकरणाकडे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.



या योजनेसाठी ग्रामीण भागातील इयत्ता सातवी उत्तीर्ण मुली पात्र ठरणार आहेत. मात्र, लाभ घेण्यासाठी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न दीड लाख रुपयांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. अनुसूचित जातींसह सर्व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलींना या योजनेत प्राधान्य दिले जाते. निवड झालेल्या मुलींना गावातील किंवा जवळील संगणक प्रशिक्षण केंद्रांवर दररोज एमएस-सीआयटी व टॅलीचे प्रशिक्षण दिले जाईल. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर शासकीय तसेच खासगी क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, हा योजनेचा मुख्य उद्देश आहे.

दरम्यान, योजनेसाठी अर्ज प्रक्रिया जून-जुलै महिन्यात सुरू होणार आहे. पंचायत समितीतील महिला व बालविकास विभागाच्या कार्यालयात अर्ज सादर करता येईल. अर्जांची छाननी करून पात्र मुलींची निवड केली जाईल.

ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये प्रशिक्षणाला सुरुवात होऊन जानेवारीअखेर ते पूर्ण होणार आहे. या प्रशिक्षणासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नसून, जिल्हा परिषदेमार्फत सर्व खर्च उचलण्यात येणार आहे. प्रशिक्षणानंतर परीक्षा 'एमकेसीएल'च्या अधिकृत केंद्रांवर घेतली जाईल.


> दरवर्षी सुमारे ४ हजार मुलींना एमएस-सीआयटी व टॅलीचे मोफत प्रशिक्षण दिले जाते. लाभार्थी निवडीसाठी स्वतंत्र समिती कार्यरत असून, एजन्सीद्वारे प्रशिक्षण व परीक्षा प्रक्रिया राबविली जाते.
>
> **– प्रसाद मिरकले,**
> जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी, सोलापूर

# माढा नगरपंचायत विकासकामांसाठी ४.५० कोटी निधी मंजूर

**महिनाभरात अग्निशामक गाडी मिळणार : नगराध्यक्षा ॲड. मिनल साठे**

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ८ एप्रिल-**

माढा नगरपंचायतच्या विकास कामासाठी जिल्हा नियोजन समितीतून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती योजनेअंतर्गत विकास कामासाठी २ कोटी ६२ लाख रुपये निधी मंजूर झाला असून अग्निशामक कक्ष व अग्निशामक गाडीसाठी १ कोटी ९० लाख रुपये निधी मंजूर असून लवकरच माढा नगरपंचायतसाठी अग्निशामक गाडी मिळणार असल्याचे माढा नगरपंचायतच्या नगराध्यक्षा ॲड. मिनल साठे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. येत्या दोन तीन दिवसात माढा जाधववाडी रोड लगत असलेल्या कचरा डेपो येथे अग्निशामक कक्षाचे उद्घाटन नगरपंचायतच्या वतीने करण्यात येणार आहे.



माढा शहराच्या विकास कामासाठी जिल्हा नियोजन समितीतून मंजूर झालेल्या निधीतून ग्रामदैवत श्री माढेश्वरी मंदिराच्या समोरील बाजूस असलेल्या मातंगाई मंदिर सुशोभीकरण व संरक्षण भिंत तसेच प्रभाग क्रमांक १३ व १० येथील सभामंडप सुशोभीकरण प्रभाग क्रमांक ४ व ५ म्हसोबा पार सभामंडप तसेच शहरातील इनलाईन गटार, पेवर ब्लॉक, स्ट्रीट लाईट, रस्ते व इतर विकास कामे या निधीतून केली जाणार आहेत. त्याचबरोबर १ कोटी रुपये अग्निशामक कक्ष इमारत व ९० लाख रुपये अग्निशामक गाडीसाठी वापरण्यात येणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले आहे. माढा नगरपंचायतीकडून वरील निधी मिळवण्यासाठी प्रस्ताव पाठवून पाठपुरावा केला असला तरी हा निधी उपलब्ध करून देण्यासाठी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे माजी आमदार बबनराव शिंदे व माजी आमदार राजेंद्र राऊत यांचे सहकार्य मिळाले. राज्य शासनाच्या धोरणानुसार नगरपंचायत क्षेत्रातील अंगणवाडी इमारती व त्याचे देखभाल ह्या नगरपंचायतीकडे वर्ग करण्यात असल्याने शहरातील नवीन अंगणवाडी इमारत व देखभालीसाठी आम्ही प्रस्ताव पाठवून निधीची मागणी करणार असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले आहे. या पत्रकार परिषदेस मुख्याधिकारी नेहा कंठे, उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, सभापती रेशमा लंकेश्वर, निर्मला थोरात, नगरसेवक अजिनाथ माळी उपस्थित होते.

> माढा नगरपंचायतीच्या विकास कामासाठी जिल्हा नियोजन समितीतून २ कोटी ६१ लाख व अग्निशामक कक्ष व अग्निशामक गाडीसाठी १ कोटी ९० लाख रुपये निधी मंजूर झाला असल्याने आम्हाला मोठे समाधान आहे. हा निधी मंजुरीसाठी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, माढ्याचे माजी आमदार बबनराव शिंदे व बार्शीचे माजी आमदार राजेंद्र राऊत यांचे मोठा सहकार्य यात लाभले असून त्यांच्या सहकार्यामुळेच हा निधी माढा नगरपंचायतीस मिळाला आहे. त्यामुळे आम्ही नगरपंचायतीच्या वतीने त्यांचे मनापासून आभार मानतो. पुढील काळात देखील ते असेच मदत करतील ही अपेक्षा करते.
>
> **–ॲड. मिनल साठे,** नगराध्यक्षा माढा

## फुले-आंबेडकर जयंतीनिमित्त बार्शीत स्वच्छता मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ एप्रिल-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त वृक्ष संवर्धन समिती, बार्शीतर्फे स्वच्छता मोहीम झाली. बार्शीतील कोर्ट परिसरात असलेल्या पुतळा पार्क येथे या स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी सहा ते आठ या वेळेत चाललेल्या या मोहिमेत संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. त्यानंतर महापुरुषांचे पुतळे स्वच्छ पाण्याने धुण्यात आले. शेवटी महापुरुषांच्या पुतळ्याला हार घालून त्यांना अभिवादन करण्यात आले. लहान मुले महिला यांनी देखील या स्वच्छता मोहिमेत उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला. मागील सात वर्षापासून वृक्ष संवर्धन समितीच्या माध्यमातून अनेक वृक्ष लावून ती जगवण्यात आली आहेत.

स्वच्छ बार्शी सुंदर बार्शी आणि हरित बार्शीचा वसा घेतलेल्या या समितीमार्फत अविरतपणे दररोज सकाळी दोन तास श्रमदान केले जाते आणि प्रत्येक वर्षी महापुरुषांच्या जयंतीनिमित्त येथील परिसर स्वच्छ करुन महापुरुषांना अभिवादन केले जाते. स्वच्छता मोहिमेचे हे पाचवे वर्ष आहे.

सध्या राज्यात पुतळ्यावरुन सुरु असलेल्या दूषित वातावरणात बार्शीतील वृक्ष संवर्धन समितीने एक आदर्श पायंडा पाडला आहे. याचे शहरभरातून कौतुक होत आहे.

## करमाळ्यात १५ मेपासून स्नेहगंगामाई आळंदीकर यांच्या शिव महापुराण कथेचे आयोजन

**श्रेणिक खाटेर यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ८ एप्रिल-**

येथील भागवत कथा ज्ञानयज्ञ समिती व संत गजानन महाराज मंदिर समिती यांच्या संयुक्त विद्यमाने स्नेहगंगा माई आळंदीकर यांच्या शिव महापुराण कथेचे भव्य आयोजन १५ ते २१ मे या कालावधीत करण्यात येणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते श्रेणिकशेठ खाटेर यांनी दिली आहे.

करमाळा शहरात यापूर्वी ओतूरकर महाराजांची भागवत कथा, पंडित प्रदीप कुमार मिश्रा यांची शिव महापुराण कथा, रामराव ढोक महाराज यांची रामकथा तसेच भगवानजी शर्मा यांची १९९९ मध्ये भागवत कथा व २००१ मध्ये रामकथा, आणि अनुराधा दीदी यांची २०२४ मध्ये भागवत कथा यांचा समावेश आहे. या धार्मिक परंपरेला पुढे नेत अधिकमासाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील भाविकांना शिव महापुराण कथेचा लाभ मिळावा आणि पुण्यसंचय व्हावा, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

या संदर्भात सोमवार, ५ एप्रिल रोजी संत गजानन महाराज मंदिर करमाळा येथे नियोजन बैठक पार पडली. या बैठकीस श्रेणिकशेठ खाटेर, विठ्ठलराव भणगे, कुरुलकर मॅडम, नगरसेवक दीपक चव्हाण रवींद्र विद्वत, चरणसिंग परदेशी, नारायण पवार, विजय देशपांडे, बबलू कुलकर्णी, पत्रकार दिनेश मडके, गिरीश शहा, दादासाहेब तनपुरे, प्रितम वीर शंकर रासकर, , राम टांगडे, सचिन सोरटे, संगीताताई खाटेर, हनुमान परदेशी, संदीप चुंग, आशिष बोरा, दिनेश मुथ्था, वैभव दोशी कांलिदी धोकेटे, कालीदास घोगरे, आडकर सर, विनोद कानडे, दिलीप शिरगिरे, मुळे सर, सुरेश आटोळे, देवकर काका उपस्थित होते.

बैठकीत शिव महापुराण कथा भव्य आणि दिव्य स्वरूपात करण्याचा संकल्प करण्यात आला. करमाळा तालुक्यातील सर्व भाविक भक्तांनी या धार्मिक सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन भागवत कथा ज्ञानयज्ञ समिती व संत गजानन महाराज मंदिर समिती यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जयंती गुरु शिष्याची; पंढरपुरात भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ एप्रिल-**

पंढरपुरात महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्ताने मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र नवनिर्माण सेना व भीम शक्ती सांस्कृतिक बहुउद्देशीय संस्था यांच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रभागाच्या नगरसेविका माधुरी धोत्रे यांनी केले आहे.



शनिवार (दि.११) सकाळी १० वाजता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या हस्ते व नगरसेवक विनायक देवमारे अध्यक्षतेखाली आणि माजी नगरसेवक शिवाजी मस्के, समाजसेवक पृथ्वीराज भोसले, संतोष धोत्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात येणार आहे.

सोमवारी (दि.१३) रात्री १२ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या हस्ते नगरसेविका माधुरी धोत्रे यांच्या अध्यक्षतेखाली आणि नगरसेवक लोकेश यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. तर मंगळवारी (दि.१४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनी प्रतिमेचे पूजन व रॅलीचे उद्घाटन भैरवनाथ शुगरचे चेअरमन अनिल सावंत यांच्या हस्ते ज्ञानेश्वर ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली आणि नगरसेवक अक्षय गंगेकर, नगरसेवक प्रसाद कळसे, समाजसेवक नानासाहेब कदम, माजी नगरसेवक धनंजय कोताळकर, समाजसेवक सुमित शिंदे, अर्जुन माळवदे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

या बरोबरच मंगळवारी सायंकाळी ७ वाजता संविधान पुस्तकांचे वाटप नगरसेवक संजय बंदपट्टे यांच्या हस्ते मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

### महिलांसाठी होम मिनिस्टर

शुक्रवारी (दि.१७)सायंकाळी ६.०० वाजता महिलांसाठी होम मिनिस्टर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्ष प्रणिता भालके यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी ज्योती संतोष सर्वगोड, विद्या सर्वगोड या उपस्थित राहणार असून नगरसेविका माधुरी धोत्रे, नगरसेविका प्रणिती घाडगे, नगरसेविका रुक्मिणी धोत्रे, नगरसेविका स्मिता फत्तेपुरकर, नगरसेविका साधना धोत्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

### सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन

गुरुवारी (दि.१६) सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मनसे नेते दिलीप धोत्रे तर प्रमुख उपस्थिती म्हणून आमदार अभिजीत पाटील, युवक नेते भगीरथ भालके, भैरवनाथ शुगरचे चेअरमन अनिल सावंत, गट नेते नगरसेवक नागेश भोसले, तीर्थक्षेत्र आघाडीचे अध्यक्ष सुधीर धुमाळ, संतोष सुळे, किरणराज घाडगे, आदित्य फत्तेपुरकर, सुधीर धोत्रे, दत्ता भोसले, बाबा चव्हाण, गणेश उबाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

### भव्य मिरवणूकीचे आयोजन

दरम्यान सोमवारी (दि. २०) सायंकाळी ६ वाजता भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले असून मिरवणुकीची सुरुवात मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या हस्ते पुष्पहार घालून होणार आहे. या कार्यक्रमासाठी पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे, ज्येष्ठ नेते सुधीर भोसले, समाजसेवक बाबा चव्हाण, मनसे शहर उपाध्यक्ष गणेश उबाळे हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

# गॅसधारक नागरिकांनी ई केवायसी व बुकिंगची माहिती घेण्यासाठी रांगा लावू नये

**जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांचे आवाहन**

**जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व एलपीजीचा तुटवडा नाही**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

शहरात बीपीसीएल, आयओसीएल व एचपीसीएल या तीन गॅस कंपनीच्या २० गॅस एजन्सी कार्यरत आहेत. यातील सात गॅस एजन्सी समोर नागरिक ई-केवायसी साठी तसेच गॅस सिलेंडर साठी मोठ्या प्रमाणावर गर्दी करत असल्याचे निदर्शनास येत आहे. तरी नागरिकांनी घरी बसून क्यू आर कोडच्या माध्यमातून ई केवायसी करावी व गॅस कंपन्यांनी गर्दी होणाऱ्या गॅस एजन्सींना वाढीव गॅस सिलेंडर पुरवठा करून त्या एजन्सीनी गॅस सिलेंडरचा पुरवठा घरपोच करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी दिले आहेत.

शहर-जिल्ह्यातील गॅस एजन्सी समोर गर्दी होऊ नये यासाठी प्रशासनाने २३ मार्च रोजी स्पष्ट आदेश दिले होते. तरीही सोलापूर शहरातील काही ठिकाणी गॅस एजन्सी समोर सिलेंडरसाठी रांगा लागत आहेत. तसेच एजन्सीच्या म्हणण्याप्रमाणे ई केवायसीसाठी नागरिक मोठ्या प्रमाणावर येत असल्याने ई-केवायसीसाठी प्रशासनाच्या वतीने क्यूआर कोड उपलब्ध करून देण्यात येत आहे. यासाठी नागरिकांनी घरी बसूनच ऑनलाइन ई-केवायसी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

जिल्ह्याच्या एलपीजी गॅस पुरवठामध्ये बदल झालेला नाही, परंतु पॅनिक बुकिंग मुळे गॅस सिलेंडरच्या मागणीत अडीच पट वाढ झालेली आहे. नेहमीपेक्षा जास्त मागणी रोज वाढू लागली आहे. त्यामुळे सिलेंडरचा पुरवठा करण्यास वेळ लागत आहे. पॅनिक बुकिंग कमी झाल्यानंतर लोकांना गॅस सिलेंडर वेळेत मिळणार आहे. सोलापूर शहर व जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या अफवावर विश्वास ठेवू नये व गरज नसताना बुकिंग करू नये. सोलापूर जिल्ह्यासाठी पेट्रोल, डिझेल व एलपीजी मागणीप्रमाणे साठा उपलब्ध होत आहे. गॅस एजन्सी समोर सिलेंडरसाठी येऊ नये, ऑनलाइन बुकिंग करावे व घरपोच सिलिंडर उपलब्ध करून घ्यावा.



गॅस एजन्सीमध्ये ई-केवायसी करण्यासाठी तसेच बुकिंगची माहिती विचारण्यासाठी ग्राहकांची गर्दी होत असल्याने जिल्हा प्रशासनाकडून ग्राहकांसाठी तक्रार निवारण केंद्र उभारले जात असून, यासाठी पुरवठा विभागाचे तीन कर्मचारी तसेच एचपीसीएल बीपीसीएल व आयओसीएल या कंपनीचा एक एक प्रतिनिधी नियुक्त करण्यात आल्याचीही माहिती जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिली.

## चोरट्याने चोरून नेले मंगळसूत्र

**सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

अवंती नगर, येथे मेडिकल दुकानाच्या समोर दोन अज्ञात चोरट्यानी १ लाख ५४ हजार ५८८ रुपयांचे मंगळसूत्र, सोन्याचे दागिने चोरून नेले आहे.

दि. ७ एप्रिल रोजी अवंती नगर, येथे मेडप्लस मेडिकल दुकानाच्या समोर असलेल्या कॉर्नर येथे अज्ञात चोरट्याने ३३.४१० ग्रॅम वजनाचे दोन वाट्या असलेले १ लाख ५४ हजार ५८८ रुपयांचे मनी मंगळसूत्र, सोन्याचे दागिने हे विजयालक्ष्मी धोंडीराम सावळे, वय ६६, रा. बी १५ अवंती नगर, जुना पुना नाका, सोलापूर यांचे चोरून नेले आहे. याबाबत ७ एप्रिल रोजी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दोन अज्ञात चोरट्यान विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास क्षीरसागर करत आहेत.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नेवरे येथे गाथा भजन, अखंड हरिनाम सप्ताह १९ एप्रिलपासून

**श्रीपूर, दि ८ एप्रिल-**

नेवरे (ता.माळशिरस) येथे १९ ते २६ एप्रिल या कालावधीमध्ये श्रीगुरु विठ्ठल महाराज देहूकर फड यांच्या आशिर्वादाने तसेच बापूसाहेब महाराज देहूकर यांचे मार्गदर्शनाखाली अक्षय्य तृतीयेच्या मुहुर्तावर नेवरे व कोंठरपट्टा (ता.माळशिरस) ग्रामस्थांच्या वतीने संतश्रेष्ठ तुकाराम महाराज गाथा भजन व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे.

यामध्ये रविवारी (दि. १९) श्रीराम अभंग (वडापुरी), सोमवार (दि. २०) जगन्नाथ देशमुख (पंढरपूर ) मंगळवार (दि. २१) अनिरुद्ध निंबाळकर (बिटरगाव ) बुधवार (दि.२२) श्रीगुरु पुंडलिक देहूकर (श्रीक्षेत्र देहू ) गुरुवार ( दि. २३) अनिल पाटील (बार्शी), शुकवार (दि २४) गोविंद भोसले (नेवरे), शनिवार (दि. २५) ज्ञानेश्वर कदम (आळंदी देवाची) यांची किर्तन सेवा होणार आहे. रविवार (दि.२६) सोहम देहूकर मळोली यांचे काल्याचे किर्तन व महाप्रसादाने सोहळ्याची सांगता होईल. तसेच भिवाजी झुरळे, ज्ञानेश्वर सुमंत (श्रीपूर), शंकर गोसावी (नेमतवाडी), हनुमंत जाधव (जाधववाडी), श्रीहरी साळुंखे (खेळ भाळवणी), दादासाहेब गिरीगोसावी (महाळुंग ) दौलत गायकवाड (उंबरे वेळापूर) यांची प्रवचन सेवा होईल. याबरोबरच पहाटे ४ ते ६ काकडा भजन, स. ८ ते दु १२ गाथा भजन, दु. ४ ते ५ प्रवचन, दु . ५ ते ६ हरीपाठ, सायं. ७ ते ९ हरी किर्तन व हरी जागर असे धार्मिक कार्यक्रम होतील. व्यासपीठ चालक म्हणून गोविंद भोसले, अंगत सांगवे (बिटरगाव) हे सेवा बजावणार आहेत. संपर्कासाठी सुनिल भोसले (९८३४८२६६३३) गोविंद भोसले, आण्णा बोबडे यांच्याशी संपर्क साधावा.





# ऐतिहासिक पाऊल! सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशन अंध महिला क्रिकेट संघाचे 'पालकत्व' स्वीकारणार

**चेअरमन रणजितसिंह मोहिते-पाटील यांची माहिती**

**असा निर्णय घेणारी महाराष्ट्रातील एकमेव क्रिकेट संघटना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ एप्रिल -**

दिव्यांग खेळाडूंना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनने एक क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. सोलापूर जिल्ह्याचा स्वतंत्र अंध मुला-मुलींचा क्रिकेट संघ तयार करण्यासोबतच, अंध महिला क्रिकेट संघाचे संपूर्ण पालकत्व स्वीकारण्याचा ऐतिहासिक निर्णय असोसिएशनचे चेअरमन रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी घेतला आहे. अशा प्रकारे महिला अंध क्रिकेट संघाचे पालकत्व स्वीकारणारी सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशन ही महाराष्ट्रातील पहिली आणि एकमेव संघटना आहे.





भारतीय अंध महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार आणि टी-२० विश्वचषक विजेती खेळाडू गंगा संभाजी कदम हिने रणजितसिंह मोहिते-पाटील यांची भेट घेऊन जिल्ह्यातील अंध खेळाडूंच्या अडचणी मांडल्या होत्या. सोलापूरच्या ग्रामीण भागात गुणवत्ता असूनही केवळ संधी आणि अधिकृत पाठबळाअभावी हे खेळाडू मागे राहत असल्याची खंत तिने व्यक्त केली होती. त्यानुसार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी या पत्राची गंभीर दखल घेत केवळ संघ स्थापनेचे आश्वासन दिले नाही, तर या संघाची संपूर्ण जबाबदारी आणि 'पालकत्व' स्वीकारण्याचा शब्द दिला. यामुळे आता महिला अंध क्रिकेटपटूंना जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या छत्राखाली सराव, दर्जेदार किट, प्रशिक्षक आणि मैदानाची सोय उपलब्ध होणार आहे. स्वतः गंगा कदम या खेळाडूंना मार्गदर्शन करण्यासाठी सज्ज असून, सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या या भूमिकेमुळे दिव्यांग खेळाडूंसाठी प्रगतीचे नवे दरवाजे उघडले गेले आहेत.

### अंध खेळाडूंचा आत्मविश्वास वाढणार

**महिला सक्षमीकरण**
महिला अंध क्रिकेट संघाला हक्काचे पालकत्व मिळाल्याने खेळाडूंचा आत्मविश्वास वाढेल.


**नवे खेळाडू घडणार**
गंगा कदम प्रमाणेच सोलापूरचे इतर खेळाडूही आता आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकू शकतील.

**शासकीय संधी**
अधिकृत संघामुळे या खेळाडूंना भविष्यात नोकरी आणि इतर शासकीय सवलती मिळणे सुलभ होईल.

# शेअर बाजारात गुंतवणुकीचे आमिष; डॉक्टरची ५२ लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ एप्रिल -**

शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास दरमहा १० टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून एका डॉक्टरची ५२ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार बार्शीमध्ये उघडकीस आला आहे. याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात एका संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




डॉ. मिलिंद बिभीषण चौधरी (वय- ३९, रा. फुले प्लॉट, बार्शी) यांनी या संदर्भात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरुन संदीप दिलीप वायचळ, रा. बार्शी याच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. संदीप वायचळ याने आपण 'टम स्टॉक ब्रोकर' आणि 'मोनार्क शेअर मार्केट' कंपनीचे ब्रोकर व एजंट असल्याचे भासवून डॉ. चौधरी यांचा विश्वास संपादन केला. जानेवारी २०२२ ते मे २०२२ या कालावधीत त्याने डॉक्टरांना शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवण्यास प्रवृत्त केले. गुंतवणूक केल्यास दरमहा १० टक्के परतावा आणि ३ लाख रुपये बोनस देऊ, असे आमिष त्याने दाखवले होते.

या आमिषाला बळी पडून डॉक्टरांनी वेळोवेळी एकूण ५२ लाख रुपये संशयित आरोपीकडे सुपूर्द केले. मात्र, मुदत संपल्यानंतरही परतावा किंवा मुद्दल न मिळाल्याने डॉक्टरांनी आपले पैसे परत मागितले.

पैसे परत मागितले असता, आरोपीने पैसे देण्यास टाळाटाळ केली. इतकेच नव्हे तर, पैसे मागितल्यास मी आत्महत्या करेन आणि तुला या केसमध्ये अडकवेन, अशी धमकीही त्याने डॉक्टरांना दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक महेश गळगटे करत आहेत.

## महत्त्वाचे



### शेवरे येथे कायदेशीर सहाय्य शिबिर

**श्रीपूर, दि. ८ एप्रिल-**

शेवरे (ता. पंढरपूर) येथे कायदेशीर सहाय्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचा मुख्य उद्देश ग्रामस्थांमध्ये कायद्याबाबत जागरूकता निर्माण व्हावी व त्यांना त्यांच्या हक्कांची माहिती व्हावी हा होता. कार्यक्रमाचे आयोजन कर्मवीर औदुंबर पाटील लॉ कॉलेजच्या प्राचार्य सुरांजली सोनकांबळे व प्राध्यापिका भक्ती दुधाते यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी उपस्थित कायद्याचे ज्ञान घेत असलेल्या जुनिअर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. सुरांजली सोनकांबळे यांनी केले. विविध कायदे विषयांवर मार्गदर्शन करताना विशेषतः महिलांचे हक्क, बालविवाह प्रतिबंध, घरगुती हिंसाचार कायदा, तसेच नागरिकांचे मूलभूत अधिकार यांविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, लहान वयात विवाह न करण्याचे फायदे आणि स्वतःच्या हक्कांबद्दल जागरूक राहण्याचे मार्गदर्शन प्रा. भक्ती दुधाते यांनी केले. कार्यक्रमासाठी माजी विद्यार्थी ॲड. भारत मास्के यांचे सहकार्य लाभले. आभार प्रा. भक्ति दुधाने यांनी मानले.



### भाविकांच्या सेवेला वटवृक्ष मंदिर समितीचे नेहमीच प्राधान्य : न्यायमूर्ती पाटील

**अक्कलकोट, दि. ८ एप्रिल-**

येथील श्री स्वामी समर्थांचे मूळस्थान असलेल्या श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे कार्य हे सेवाभावी वृत्तीने व समर्पित कार्याने चालते, म्हणून भाविकांच्या सोई सुविधांना व भाविकांच्या सेवेला वटवृक्ष मंदिर समितीचे नेहमीच प्राधान्य असल्याचे मनोगत मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संदेश पाटील यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संदेश पाटील व त्यांच्या समवेत असलेले दिल्ली येथील अनुपसिंह, जिल्हा सरकारी वकील प्रदिपसिंह राजपूत यांचा सन्मान केला. यावेळी न्यायमूर्ती संदेश पाटील बोलत होते. याप्रसंगी प्रथमेश इंगळे, उद्योजक मनोज कोळी, ॲड. अमोघसिंह, ॲड. प्रदीपसिंह रजपूत, नायब तहसीलदार संजय भंडारे, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, बाळासाहेब एकबोटे, अंकुश केत, शिवशरण अचलेर, अमर पाटील, खाजप्पा झंपले, विपूल जाधव, संतोष जमगे उपस्थित होते.

### किरकोळ कारणावरून तरुणाला मारहाण

**अक्कलकोट, दि. ८ एप्रिल-**

कांदलगाव येथे किरकोळ कारणावरून एका ३० वर्षीय तरुणाला लाकडी काठी आणि दगडाने बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी सुरज सतीश करंडे (वय-३०, रा. कांदलगाव) यांनी तिघांविरुद्ध तक्रार दिली असून, सध्या त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुरज करंडे हे सोमवारी सकाळी ७:३० च्या सुमारास गावातील जिल्हा परिषद शाळेसमोर थांबले होते. यावेळी गावातीलच बालाजी अशोक मुकटे हा त्यांच्याकडे रागाने पाहत होता. 'माझ्याकडे रागाने का पाहतोस? असे विचारल्याचा राग मनात धरुन बालाजी मुकटे याने सुरज यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वाद वाढत असतानाच बालाजीचा भाऊ नेताजी मुकटे व परशुराम मुकटे त्या ठिकाणी आले. या तिघांनी मिळून सुरज यांना हाताने मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर बालाजी मुकटे याने सुरज यांना खाली पाडून त्यांच्या डोक्यात दगडाने प्रहार केला. तसेच परशुराम मुकटे याने तेथे पडलेल्या लाकडी काठीने सुरज यांच्या उजव्या पायाच्या मांडीवर व पाठीवर मारुन त्यांना गंभीर जखमी केले. 'आमच्या नादी लागू नको, तुला जिवंत सोडणार नाही' अशी धमकी यावेळी देण्यात आली. सुरज करडे यांनी तिघांविरोधात तालुका पोलीसात तक्रार दाखल केली असून पोलीस तपास करीत आहेत.

# वटवृक्ष मंदिरात वीणा सप्ताहास सुरुवात



**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि ८ एप्रिल-**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने स्वामी समर्थांच्या १४८व्या पुण्यतिथी महोत्सवातील अखंड नामवीणा सप्ताहाची सुरुवात बुधवारी पहाटे ६ वाजता झाली.

देवस्थानच्या गाभारा मंडपात मोठया भक्ती भावाने व अपार श्रध्देने तथा सत्संग महिला भजनी मंडळ यांचे पारंपारीक भजन व नामस्मरणाने मंदीर समितीचे चेअरमन महेश इंगळे, प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते वीणा सप्ताहाचे शुभारंभ करण्यात आले. अखंड नामवीणा सप्ताहाचा समाप्ती सोहळा श्री स्वामी समर्थांच्या पुण्यतिथी रोजी रोजी सकाळी ७ वाजता देवस्थानच्या ज्योतीबा मंडपात चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते होईल. प्रारंभी या वीणा सप्ताह महोत्सवाच्या सुरुवातीस मंदार पुजारी यांच्या अधिपत्त्याखाली व्यंकटेश पुजारी यांच्या हस्ते मुख्य गाभाऱ्यात वीणापूजन होऊन सत्संग महिला भजनी मंडळ यांचे भजन झाले. तदनंतर यांचे पुरोहित व्यंकटेश पुजारी यांच्या हस्ते महेश इंगळे व प्रथमेश इंगळे यांच्या हाती वीणा देण्यात आले. श्री स्वामी समर्थांच्या पुण्यतिथी महोत्सवात अखंड नामविणा सप्ताहास अनन्य साधारण महत्व आहे. सतत ७ दिवस हा वीणा खाली न ठेवता मुखाने स्वामी नाम घेत अखंड चालू ठेवणेची परंपरा आज देखील देवस्थानने जपली आहे. इंगळे परिवाराच्या वतीने वीणा सप्ताहाची सुरुवात करण्याची ही चौथी पिढी आहे.

याप्रसंगी इरपा हिंडोळे, कौशल्या जाजू, प्रदीप हिंडोळे, अक्षय सरदेशमुख, बाबर, निर्मलाताई हिंडोळे, सुरेखा तेली, स्वाती गंभीरे, भंडारे, प्रसाद सोनार, बाळासाहेब घाटगे, प्रसन्न हत्ते, ज्ञानेश्वर भोसले, श्रीशैल गवंडी, सागर गोंडाळ, श्रीपाद सरदेशमुख, सिद्धाराम कुंभार, नागनाथ गुंजले, गिरीश पवार, संजय पवार, संतोष पराणे उपस्थित होते.



# असमाधानकारक कामात सुधारणा करा

**पंचायत समितीच्या सभेत सभापती डॉ. शुभम आगावणे यांच्या सूचना**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.८ एप्रिल-**

ज्या विभागाचे काम असमाधानकारक आहे त्यांना त्या कामामध्ये सुधारणा करण्याच्या सुचना पंचायत समितीच्या पहिल्या सभेत सभापती डॉ.शुभम आगावणे यांनी दिले. पंचायत समिती पंढरपूर येथील शेतकी भवन सभागृहामध्ये ४ वर्षानंत्तर पहिली मासिक सर्वसाधारण सभा सोमवारी (दि.६) सभापती डॉ.आगावणे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी त्यांनी या सूचना दिला.

तसेच जे राज्य शासनाचे खातेप्रमुख सभेस गैरहजर होते. त्यांच्या बाबतीत पुढील मासिक सभा त्यांच्या कार्यालयात जाऊन घेण्याच्या सुचना उपसभापती प्रमोद देशमुख यांनी दिल्या. यावेळी सचिव गट विकास अधिकारी अमोल जाधव, पंचायत समिती सदस्य शहाजी मुळे, राहुल पुरवत, पुनम पवार, महादेव जाधव, विजया भोसले, सावली गायकवाड, ज्योती पांढरे, रंजना शिंदे, निखिल गोसावी, प्रमिला झांबरे, विजय शिंदे, आक्काबाई लोखंडे, वंदना फाटे, प्रियांका जाधव उपस्थित होते.

या सभेचे कामकाज सहाय्यक प्रशासन अधिकारी शहाजहान तांबोळी, वरिष्ठ सहाय्यक महेश वैद्य, कनिष्ठ सहाय्यक प्रशांत हिल्लाल यांनी पाहिले.

# शिवशक्ती बँकेची निव्वळ थकबाकी शून्य टक्के

**चेअरमन डॉ.प्रकाश बुरगूटे यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ एप्रिल-**



बार्शीतील शिवशक्ती बँकेची ३१ मार्च २०२६ पर्यंत थकबाकी शून्य टक्के झाली असल्याने बँकेने पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी शिवशक्ती बँकेचे चेअरमन डॉ. प्रकाश बुरगूटे यांनी बोलताना सांगितले की, गेल्या काही महिन्यांपूर्वी सोलापूर जिल्ह्यातील काही बँकांवर रिझर्व बँकेची अचानक कारवाई झाल्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील सर्व को-ऑपरेटिव्ह बँकावर अडचणी आल्या होत्या. ठेवीदार गडबडुन गेल्याने व काही अफवा पसरल्याने त्याचा परिणाम आपल्या बँकेवरही झाला होता.

बँकेची स्थापना १९९९ची असून बँकेचे कार्यक्षेत्र हे सोलापूर व धाराशिव जिल्हा असून २५ वर्षांपासून सर्वसामान्यांची बँक, तत्पर सेवा, ठेवीदाराचे हित जोपासत कार्यरत आहे. सहकारी बँकिग क्षेत्रासाठी सध्या कठीण स्थिती असताना मार्च २०२६ अखेर बँकेच्या अथक प्रयत्नातून चांगले निकष आले आहेत. सर्वांच्या सहकार्याने आपल्या बँकेचा निव्वळ एन.पी.ए. शून्य टक्के तर सीआरएआर ९.१६% आणि ठोबळ नफा ३.६९ कोटी झालेला आहे. तसेच बँक डीआयसीजीसीकडे ठेवीचा संरक्षण विमा हप्ते नियमित भरत आहे. बँकेचे मार्गदर्शक डॉ. बी. वाय. यादव, चेअरमन डॉ. प्रकाश बुरगूटे, संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली व कर्मचारी यांच्या अथक प्रयत्नाने शून्य टक्के एन.पी.ए. आणण्याचे ध्येय पुर्ण केले आहे. बँक ही सर्वसामान्य जनतेची असुन यापुढेही शाखा विस्तार, ठेवीदाराचे हित, व्यावसायिकांना कर्ज रुपाने आर्थिक मदत करण्यास तप्तर राहणार आहे. बँकेस श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी, सर्व सहकारी पतसंस्था, शहरातील सहकारी, सरकारी बँका यांनी सहकार्य केले. तसेच सर्व सभासद, ठेवीदार व कर्जदार यांचे विश्वासाला बँक कधीही तडा जाऊ देणार नाही व बँकेने सर्व तंत्रज्ञानाचा सविस्तर वापर करुन ग्राहकांना जास्तीत जास्त जलद सेवा देवून तितक्याच जोमाने काम करुन बँक प्रगतीपथावर ठेवण्याचे काम चेअरमन, सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वचनबध्द राहील, असे यावेळी बोलताना डॉ. बुरगूटे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

या पत्रकार परिषदेस बँकेचे मार्गदर्शक डॉ. बी. वाय. यादव, चेअरमन डॉ. प्रकाश बुरगुटे, व्हाईस चेअरमन मोरे, संचालक मंडळ, सरव्यवस्थापक भारत उमाटे, सहा. सरव्यवस्थापक गणेश बारंगुळे, शाखाधिकारी समाधान राऊत, विजय शिखरे व पदाधिकारी उपस्थित होते.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त समाजोपयोगी उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ एप्रिल-**

येथील भीम टायगर मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्था, आर.पी.आय.(आठवले) तसेच बहुजन हिताय मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्था, बार्शी यांच्यावतीने बौद्ध विहाराला सहा फॅन भेट देण्यात आले.

कार्यक्रमावेळी भीम टायगर मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक शंकर वाघमारे, आर.पी.आय. (आठवले) गटाचे शहराध्यक्ष ॲड. अविनाश गायकवाड, बहुजन हिताय मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक ॲड. प्रसन्नजीत नाईकनवरे, नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टिसचे तालुका अध्यक्ष सनी गायकवाड यांच्यासह दीपक काकडे, मक्रोज बोकेफोडे, अशोक बोकेफोडे, दीपक बोकेफोडे, राजेंद्र कदम, दयावान लकेश्वर, ॲड. धीरज कांबळे, अभिषेक अय्यर, वैभव काकडे, निलेश वाघमारे, भालचंद्र राजगुरु, कपिल बोकेफोडे उपस्थित होते.

# वैरागमध्ये 'मटका किंग'चा उच्छाद

## प्रशासनाचे 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष की मटका माफियांना अभय?

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ८ एप्रिल-**

सोलापूर जिल्ह्यातील व्यापारपेठेचे मुख्य केंद्र असलेल्या वैराग शहरात सध्या अवैध मटका व्यवसायाने अक्षरशः कळस गाठला आहे. दिवसेंदिवस फोफावत चाललेल्या या काळ्या धंद्यामुळे वैरागचे सामाजिक स्वास्थ धोक्यात आले असून, प्रशासन मात्र याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करत असल्याचा खळबळजनक आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. पोलीस प्रशासनाला सर्व काही माहित असूनही ठोस कारवाई का होत नाही? असा संतप्त सवाल वैरागमधील सर्वसामान्यांमधून विचारला जात आहे.




**'सेटिंग'च्या जोरावर अड्डे जोमात?**

वैराग पोलीस ठाण्याच्या अगदी हाकेच्या अंतरावर मटका अड्डे दिवसाढवळ्या सुरू आहेत. मटका माफियांचे जाळे शहरात इतके घट्ट झाले आहे की, तिथे कायद्याची भीती उरलेली नाही. पोलीस केवळ नावापुरती कारवाई करतात की खरोखर 'सेटिंग'वरच जास्त भर दिला जातोय, अशी शंका आता शहरात उपस्थित केली जात आहे. वरदहस्त नेमका कोणाचा? हा प्रश्न आता प्रत्येक वैरागकर विचारत आहे.

**कुटुंबांची आर्थिक कोंडी, युवकांचे भविष्य धोक्यात**

या अवैध व्यवसायाचे परिणाम अत्यंत भयावह असून समाजाच्या मुळावर उठले आहेत. झटपट श्रीमंत होण्याच्या आमिषाने शालेय आणि महाविद्यालयीन तरुण या विळख्यात अडकले आहेत. कष्टकरी आणि शेतमजूर आपली कष्टाची कमाई मटक्यात उडवत असल्याने अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. आर्थिक ओढताणीमुळे घराघरांत भांडणे होत असून अनेक संसार देशोधडीला लागले आहेत.

**प्रशासन नेमकं करतंय काय?**

स्थानिक नागरिकांनी आपला संताप व्यक्त करताना म्हटले आहे की, पोलीस बीट अमंलदारांपासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांना हे अड्डे कुठे चालतात हे माहिती आहे. तरीही केवळ आश्वासनांपलीकडे काहीच मिळत नाही. युवकांचे भविष्य डोळ्यादेखत उद्धवस्त होत असताना प्रशासन गप्प का? वैरागच्या जनतेला आता केवळ पोकळ आश्वासने नको आहेत, तर शासनाकडून प्रत्यक्ष आणि कठोर कारवाईची अपेक्षा आहे.

### कुणाचीही गय केली जाणार नाही!

वैराग पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैध धंद्यांविरुद्ध आमची मोहीम सतत सुरू आहे. जे छुप्या पद्धतीने मटका अड्डे किंवा दुकाने चालवली जात आहेत, त्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. भविष्यातही ही कारवाई अधिक तीव्र केली जाईल. यामध्ये कुणाचीही गय केली जाणार नाही. अवैध धंदे चालवणाऱ्यांवर आमची करडी नजर आहे.कडक कारवाई केली जाईल

**- कुंदन गावडे,**
**पोलीस निरीक्षक, वैराग**